म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. नं. १५२

# भारतभाग्योदय

अथवा

## नागपूर येथील

### ७ व्या राष्ट्रीयसभेचें साद्यंत वर्णन

व

### मागील ६ राष्ट्रीयसभांची संक्षिप्त माहिती.

—:o:—

"The Soundest Triumph of British Administration, and a Crown of Glory to the British Nation."
—RAJA SIR T. MADHAW ROW, K. C. S. I.

हें लहानसें पुस्तक

राष्ट्रीयसभेच्या एका दक्षिणप्रांतस्थ प्रतिनिधीनें

लोकहितार्थ तयार केलें

तें

लाभ !


चुकूं नये.

## रा. रा. व्ही. रेळे आणि मंडळी,

('महाराष्ट्रकोकिल' मासिक पुस्तकाचे प्रकाशक पुस्तक.)

२ री सुतारगल्ली, गि

संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाई साहे
...वसाहेब झांशीवाले हे—ह्या मासिक पुस्तकांत झांशी
सिविल—...र्ता देत असतात. तो इतिहास इतका मनोरम, महत्वाचा
चटकदार आहे की त्या ...योगानें हजारों वाचक तल्लीन होऊन गेले आहेत !
याशिवाय, ह्या मासिक पुस्तकांत, प्रसिद्ध पुरुषांचीं सचित्र चरित्रें, नीतिपर
लोकोत्तर चमत्कार, सुंदर काव्यें, निरनिराळ्या प्राण्यांचीं वर्णनें, स्थलवर्णनें,
चमत्कार, नानाप्रकारची ऐतिहासिक माहिती, आख्यायिका, निरनिराळ्या
लोकांची चमत्कारिक माहिती, कादंबऱ्या, पुस्तकपरीक्षण, इ. इ. इ. अनेक
...प्रमाणे प्रसिद्ध होतात.
...प लोकांस किती पसंत पडतात ह्याचें प्रमाण ह्या मासिक पुस्तकाच्या
...नच दिसून येईल हें मासिक पुस्तक प्रसिद्ध होऊन अवघे १०... झाले
...स २,००० जवळ वर्गणीदार होत आले आहेत. ह्या संख्ये
जहागिरदार, सरदार, इत्यादि मोठे लोक, व हायकोर्टाचे जज्ज,



# सचित्र क्याटलाग.

हिंदुलोकांत आजपर्यंत कधींही प्रसिद्ध न झालेला असा घड्याळांचे किमतींचा इ. स. १८९२ चा सचित्र क्याटलाग. अर्धा आण्याचें टिकिट आल्यास फुकट पाठवूं.


ह्या क्याटलागमध्यें सर्व जातींचीं क्लॉक्स; चांदीचीं, मेटलचीं, व सोन्याचीं घड्याळें; टाईम पिसेस; वगैरेच्या व वॉचमेकरचे उपयोगीं पडणाऱ्या हत्यारांच्या अगदीं हुबेहुब अशा सुमारें २०० सुंदर चित्रांचा समावेश केला आहे.

ज्या कोणा बाहेरगांवच्या लोकांस मनाप्रमाणें घड्याळें घ्यावयाचीं असतील त्यांनीं हा क्याटलाग पाहून हुबेहुब घड्याळें मागवावीं.

**हरि केशव गोखले, शांतारामाची चाळ, कांदेवाडी, मुंबई.**

## नवीन शोध ! नवीन शोध !! नवीन शोध !!!

## [illegible]ारलेला जर्मन विजेचा कंबरपट्टा.



किंमत

गु
नवे

## खात्रीचा माल घेऊन व्यापार करा.

कद पितांबरांचे आमचे माग आहेत, तेव्हां इतरांपेक्षां सवंग आणि खात्रीचा माल देऊं. आमचा एजन्सीचा धंदा फार वर्षांपासून असल्यामुळें माल चांगला पण कसोशीनें खरेदा करून सोईच्या मार्गे व्यवस्थित पाठविण्याची पूर्ण माहिती आहे. कद, पितांबर, मुगटे, सुती व रेशमी लुगडीं, धोतरजोडे, जडावाचे जिन्नस, बेलिया, अत्तरें, कस्तुरी, गंगाजल, इत्यादि माल शेंकडों व्यापारी आमच्याकडून मागवून फायदा करून घेतात. भरपूर माहितीचा मोठा क्याटलाग अर्धा आण्याचे तिकिट आल्यास फुकट पाठवूं.

पत्ता.— भैरव बापू खाडीलकर, बनारस सिटी.

अपूर्व ] लक्षपूर्वक वाचून तर पहा. [ लाभ !

मराठी वाचतां येणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें ही संधि दवडूं नये.

## महाराष्ट्र कोकिल.

( अति स्वस्त, सुंदर आणि नियमित मासिक पुस्तक. )

—:०:—

१ सुप्रसिद्ध व महापराक्रमी झांशी संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाई साहेब ह्यांचे दत्तक पुत्र-श्रीमंत दामोदररावसाहेब झांशीवाले हे-ह्या मासिक पुस्तकांत झांशी संस्थानच्या इतिहासाची माहिती देत असतात. तो इतिहास इतका मनोरम, महत्वाचा आणि चटकदार आहे कीं त्या योगानें हजारों वाचक तल्लीन होऊन गेले आहेत !

२ त्याशिवाय. ह्या मासिक पुस्तकांत, प्रसिद्ध पुरुषांचीं सचित्र चरित्रें, नीतिपर निबंध, लोकोत्तर चमत्कार, सुंदर काव्यें, निरनिराळ्या प्राण्यांचीं वर्णनें, स्थलवर्णनें, शास्त्रीय चमत्कार. नानाप्रकारची ऐतिहासिक माहिती, आख्यायिका, निरनिराळ्या देशांतल्या लोकांची चमत्कारिक माहिती, कादंबऱ्या. पुस्तकपरीक्षण, इ. इ. इ. अनेक विषय सवडीप्रमाणें प्रसिद्ध होतात.

३ हे विषय लोकांस किती पसंत पडतात ह्याचें प्रमाण ह्या मासिक पुस्तकाच्या शीघ्र प्रसारावरूनच दिसून येईल हें मासिक पुस्तक प्रसिद्ध होऊन अवघे १० महिने झाले नाहींत तों त्यास २,००० जवळ वर्गणीदार होत आले आहेत. ह्या संख्येंत संस्थानिक, जहागिरदार, सरदार, इत्यादि मोठे लोक, व हायकोर्टाचे जज्ज,

३ कलेक्टर्स, कमिशनर्स, मामलेदार, तहशीलदार, वगैरे मोठमोठे अधिकारी, प्रोफेसर्स, हेड मास्टर्स, फेलोज, डाक्टर्स, वगैरे विद्वान लोक आश्रयदाते असून ते सर्व, मोठ्या प्रेमानें, कोकिलांतील विषय वाचतात.

४ ह्या मासिक पुस्तकाचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर म्हणजे पंजाब, काश्मीर, राजपुताना, वायव्य प्रांत, बंगाल, आसाम, सिंध, गुजराथ, मुंबई इलाखा, महाराष्ट्र, कानडा प्रांत, मद्रास इलाखा, म्हैसूर, त्रावणकोर, मध्य प्रांत, मध्य हिंदुस्थान, निजाम हैदराबाद, बलुचिस्थान, ब्रम्ह देश, वगैरे सर्व प्रांतांमध्यें असून ह्या मासिक पुस्तकांतील विषयांचें हिंदीमध्यें भाषांतर होत असतें. ह्यावरून हें पुस्तक किती लोकप्रिय झालें आहे ह्याची कल्पना सहज होईल.

५ ह्या मासिक पुस्तकाच्या चांगुलपणासंबंधानें अनेक वजनदार व लोकमान्य मराठी व हिंदी पत्रांतून सुंदर अभिप्राय आले आहेत. त्याप्रमाणें अनेक विद्वानांचे व थोर पुरुषांचे इतके उत्तम अभिप्राय आले आहेत कीं त्यांचें एक निराळें फार मोठें स्वतंत्र पुस्तकच होईल.

६ ह्या मासिक पुस्तकास जे कोणी वर्गणीदार होतील त्यांचा अनेक प्रकारानें जो फायदा होतो, तो येणेंप्रमाणें:—एकतर त्यांस अल्प किंमतींत सुंदर लेख वाचावयास मिळतात, दुसरा वर्षाच्या काठीं त्यांस कांहीं तरी नवीन पुस्तक बक्षिस मिळतें, ( चालू वर्षी 'भारतभाग्योदय' बक्षिस देण्यांत आलें आहे ), आणि तिसरा अत्यंत मोठा फायदा हा कीं, अनेक प्रकारचीं पुस्तकें ( पुस्तक प्रकाशकांजवळ विक्रीस असतील तीं ) कांहीं तरी कमी किंमतीनें विकत मिळतात. तात्पर्य, वर्षाच्या काठीं ह्या सर्व गोष्टींचा विचार केला तर हें मासिक पुस्तक फुकट मिळाल्याप्रमाणें होतें !

७ पुस्तकाचा सांचा डेमी अष्टपत्री असून दरमहा पृष्ठसंख्या ३२ असते. छपाई फार सुंदर, कागद मोहरेदार, आणि बांधणी मजबूत असते. ह्याशिवाय मोठमोठ्या गृहस्थांचीं सुंदर चित्रें येतात, तीं निराळींच.

८ वरील सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे प्रत्येक मनुष्यास ह्या पुस्तकास आश्रय देण्याची इच्छा होईल अशी उमेद आहे. प्रत्येक मराठी वाचतां येणाऱ्या गृहस्थानें ह्या पुस्तकाच्या निदान एका प्रतीस तरी अवश्य आश्रय द्यावा अशी आमची सविनय प्रार्थना आहे. जसजसा जास्त आश्रय मिळेल तसतसा आह्मी नानाप्रकारानें वाचकांचा लाभ करून देऊं.

९ पुस्तकाची सालीना आगाऊ वर्गणी बाहेर गांवीं ८० ख. सह अवघी रु. १८ ≡ व मुंबईंत रु. १ आहे. मासल्याकरितां अंक पाहिजे असल्यास ८ ≡ आण्यांच्या तिकिटा पाठविल्या पाहिजेत. व्हील्यूपेएबलनें अंक पाठविले जातील. वर्गणी आल्यावांचून नुसत्या पत्रावर अंक पाठविले जाणार नाहींत. मागील अंक मिळतील.

☞ वर्गणी पाठविणें व इतर पत्रव्यवहार करणें तो सर्व खालील पत्त्यावर करावा:—

**पत्ता:—रा. रा. व्ही. रेळे आणि मंडळी,**

'महाराष्ट्रकोकिल'चे प्रकाशक,

गिरगांव पोस्ट, मुंबई.

२८

# भा र त भा ग्यो द य.

अथवा

## नागपूर येथील

### ७ व्या राष्ट्रीयसभेचें साद्यंत वर्णन

व

### मागील ६ राष्ट्रीयसभांची संक्षिप्त माहिती.

———:o:———

" The Soundest Triumph of British Administration, and a Crown of Glory to the British Nation. "
—RAJA SIR T. MADHAW ROW, K. C. S. I.

———

हें लहानसें पुस्तक

**राष्ट्रीयसभेच्या एका दक्षिणप्रांतस्थ प्रतिनिधीनें**

लोकंहितार्थ तयार केलें

तें

**व्ही. रेळे आणि मंडळी,**

**'महाराष्ट्रकोकिल' मासिक पुस्तकाचे प्रकाशक,**

२ री सुतारगल्ली, खेतवाडी, मुंबई,

यांनीं

सिविल-मिलिटरी आर्फनेज प्रेसांत छापून प्रसिद्ध केलें.

———

एप्रिल सन १८९२.

———

प्रति ५,०००.

———

**किंमत दोन आणे.**

———

( सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यांनीं राखून ठेविले आहेत. )

# प्रस्तावना.

### श्लोक.

**जशी आनंदा दे परम रमणीया त्रिभुवनीं ॥**
**सुनंदा स्नेहार्द्री भरतकुलकल्याणजननी ।**
**सभा राष्ट्रीया ती सकल सुखदा हो गुणगणीं । १॥**

हिंदुस्थानची राष्ट्रीयसभा हा केवळ कल्पतरु आहे. तत्सन्निध गेले—त्याचा आश्रय केला—कीं आपल्या इच्छित कामना परिपूर्ण व्हावयाच्या हें अगदीं ठरल्यासारखें आहे. परंतु, ह्या कल्पतरूवर **भारत**वासी जनांची जितकी निष्ठा बसावी—त्यांना तो जितका प्राणप्रिय वाटावा—आणि त्यांनीं तदभिवृद्ध्यर्थ—तत्संरक्षणार्थ व तदभ्युदयार्थ जितके परिश्रम करावेत तितके अद्यापि दृश्य होत नाहींत, असें ह्मणण्यास साधारणपणें कांहीं हरकत नाहीं. तेव्हां, अशी स्थिति कां असावी? असा एक मोठा प्रश्न आपल्यापुढें उपस्थित होतो. त्याचीं कारणें अनंत आहेत; तरी त्यांतल्या त्यांत दोन कारणें फार महत्वाचीं आहेत. तीं हीं कीं, परोत्कर्षाऽसहिष्णु जन ( विशेषतः **आंग्लो-इंडियन** मंडळी ) ह्या कल्पतरूला 'काटेतरू' म्हणून भासविण्याचा प्रयत्न करितात, आणि ज्यांना ह्या कल्पद्रुमाची खरी माहिती आहे ते लोक, ती सर्व देशबंधूंस प्रेमपूर्वक व विस्तारपूर्वक सादर करून, त्यांचीं मनें वळविण्याचा चांगला प्रयत्न करीत नाहींत. ह्या दोन कारणांपैकीं पहिल्या कारणाचें बहुतेक महत्व नाहींसें झालें आहे, आणि त्याप्रमाणें दुसऱ्या कारणाचें महत्त्व नाहींसें होण्याचा प्रयत्न सुरू आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

आतां, ह्या प्रयत्नास प्रत्येकानें द्रव्यद्वारें, शब्दद्वारें अथवा लेखनद्वारें हातभार लावला पाहिजे. त्यावांचून तो फलद्रुप होणार नाहीं, असें वाटल्यावरून आम्हीही ही वेडीवांकडी अल्प सेवा मोठ्या प्रेमभावानें केली आहे. ती आमच्या महाराष्ट्रीय प्रियबांधवांस पसंत पडून, तिच्या योगानें त्यांच्या मनांत राष्ट्रीयसभेचें सत्यस्वरूप प्रतिबिंबित होवो, व त्यांच्या ठिकाणीं राष्ट्रीयसभेविषयीं खरी भक्ति अल्पशीतरी उत्पन्न होवो, अशी आमची परमेश्वरास प्रार्थना आहे.

ह्या पुस्तकाच्या शेवटीं राष्ट्रीयसभेच्या संबंधानें ज्या कविता घातल्या आहेत त्या आमचे प्रियमित्र **रा० रा० एकनाथपंत भांडारे** ह्यांनीं तयार केल्या म्हणून त्यांचे आभार मानल्यावांचून आम्हांस राहवत नाहीं. तसेंच, सातव्या राष्ट्रीयसभेची हकीकत लिहिण्यास ज्या इतर वृत्तपत्रादि साधनांचें अल्प साहाय्य झालें त्यांचेही आम्हावर फार उपकार आहेत.

**" भारतभाग्योदय " लिहिणार**
**( दक्षिणप्रांतस्थ राष्ट्रसभाप्रतिनिधि ).**

# भा र त भा ग्यो द य.

**श्लोक.**

आयातोयमसंशयं खलुलसद्भाग्योदयोऽस्याभुवो ।
जाता पश्यत सुष्टु राष्ट्रपरिषत्प्राची सुरक्ताभृशम् ॥
शश्वत्खंडित सर्ववस्तुनिचयः सध्दर्मचंडद्युतिः ।
माभूत्किंतु कदापि कोऽपि सविता तां वारुणीं सेविता ॥ १ ॥

**राष्ट्रीयसभा** हा पंचाक्षरात्मक शब्द सर्व **भरतखंड**वासी लोकांस अत्यंत प्रिय झाला आहे. ह्याचें कारण त्या शब्दाच्या अंगीं तसेंच कांहीं विलक्षण सामर्थ्य आहे. तें सामर्थ्य निरनिराळ्या महात्म्यांच्या अमृत स्त्रवणाऱ्या वाणी मधून आजमित्तीस जगतीतलावर प्रसृत होऊन सर्वश्रुत झालें आहे. त्या सामर्थ्याचा प्रभाव विशेषतः सुधारणाशैलशिखरीं पोहोंचलेल्या राष्ट्रांना पूर्णपणें ज्ञात आहे. तो हाच कीं, कालचक्राच्या फेऱ्यामध्यें सांपडून ज्या राष्ट्राला अवनत स्थिति प्राप्त झालेली असते, त्याला उन्नत स्थितीप्रत पोहोंचविणें. हें सामर्थ्य खरोखर अत्यंत अद्भुत होय. आजपर्यंत कालचक्राचा प्रभाव अगदीं अतर्क्य ह्मणून जी कल्पना मनुष्यमात्राच्या मेंदूमध्यें अगदीं खिळून गेली होती, आणि कालशक्तीची गोष्ट निघाली कीं,' सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः' म्हणून म्हणण्याची त्यास पाळी येत असे, ती आज अगदीं बंद झाली आहे, आणि प्रत्येकास ' संहतिः कार्य साधिका ' हें तत्व उत्तम प्रकारें अवगत होऊन, संघशक्तीपुढें कालशक्ति कांहींच नव्हे, असें वाटूं लागलें आहे. ही समाधान मानण्यासारखी गोष्ट आहे. हें संघशक्तीचें महात्म्य **हिंदु** लोकांस पूर्णपणें कळूं लागून ज्या दिवशीं त्यांनीं त्या तत्त्वान्वयें स्वदेशोन्नतिप्रीत्यर्थ ' राष्ट्रीयसभा ' नामक सत्कृत्याचा पाया घातला तो **भारत**वर्षाचा भाग्योदयकाल होय असें ह्मणण्यास हरकत नाहीं. म्हणून आम्हीं मोठ्या आनंदानें ह्या पुस्तकास " **भारतभाग्योदय** " असेंच नांव दिलें आहे.

**हिंदुस्थान**ची राष्ट्रीयसभा ही काय आहे, हें आज सांगावयाचें मुळींच प्रयोजन राहिलें नाहीं, आजपर्यंत तिचे सहा समारंभ **हिंदुस्थानां**तील निरनिराळ्या प्रख्यात शहरांमध्यें होऊन तिचा उद्देश व कृति सर्वांस महशूर झाली आहे. एवढेंच नव्हे पण तिचें स्वरूपही आजमित्तीस थाळसेदार होऊन तिचा सातवा समारंभ **नागपूर** येथें होण्याचें ठरलें आहे. त्या समारंभाची साद्यंत पण संक्षिप्त हकीकत वाचण्याची पुष्कळांस उत्कंठा आहे, असें आम्हांस अनेक मित्रांनीं सुचविल्यावरून आह्मी ती येथें थोडक्यांत सादर करितों.

# समारंभाची हकीकत.

गेल्या वर्षी—म्हणजे सन १८९० साली—**कलकत्ता** येथें भरलेल्या सहाव्या राष्ट्रीयसभे- मध्यें पुढील सालची राष्ट्रीयसभा **नागपूर** किंवा **मद्रास** येथें भरवावी, असा ठराव झाला होता. त्याप्रमाणें **नागपूर**कर मंडळीनें हें देशसेवेचें काम मोठ्या आनंदानें स्वीकारून सन १८९१ सालचीं राष्ट्रीयसभा **नागपूर** येथें भरेल असें सर्व देशबंधूंस विदित करून **नागपूर** येथें येण्याबद्दल त्यांना पाचारणही केलें. **नागपूर** प्रांत पूर्वी **भोंसले** नामक महापराक्रमी व स्वातंत्र्यप्रिय **मराठे** सरदाराकडे असून कांहीं कालपर्यंत त्या प्रांतानें आपल्या पुत्रांस स्वराज्यसुखाचा अप्रतिम लाभही दिला होता. तेव्हां, इतिहासामध्यें गाजलेल्या अशा प्रसिद्ध ठिकाणीं राष्ट्रीयसभेचा समारंभ होणें विशेष अशक्य होतें असें नाहीं. तेथें पूर्वी हजारपांचशेंच काय पण पांचपांच दहादहा हजार शूर आर्यपुत्र आपल्या मातृभूमीसाठीं प्राण देण्यास एकत्र झालेले दिसत असत. हें इतिहासावरून चांगलें व्यक्त होतें. तत्कालीन् आर्यपुत्र आपलें शौर्यबळ तरवारीचें पाणी गाजवून दाखवीत असत, आणि सांप्रत कालीन् आर्यपुत्र आपलें ज्ञानशौर्य राजनिष्ठेच्या जोरावर व वाणीच्या मृदुपणावर दाखवीत आहेत. हें पाहून **नागपुरा**स आपल्या पूर्व स्थितीमध्यें व प्रस्तुत स्थितीमध्यें महदंतर पडलें आहे असें वाटेल, म्हणून प्रस्तुत कालीन् आर्यपुत्रांवरील प्रीति त्याच्यानें कमी करवेल काय? छे! त्याच्या हातून ती कदापि लवमात्र कमी होणार नाहीं. मग त्यानें पुत्रवात्सल्याचें आपलें ब्रीद राखिलें असेल ह्यांत आश्चर्य तें काय?

**नागपूर**च्या लोकांनीं राष्ट्रीयसभेच्या समारंभाची तयारी करण्यास पुष्कळ दिवसां- पासून प्रारंभ केला होता. त्यामध्यें **मि० सी. नारायण स्वामी नायडू, प्रो. भगीरथप्रसाद, प्रो. कृष्णराव देशपांडे, रा. सा. गोपाळराव भिडे, रा. रा. राजारामपंत दीक्षित** ही मंडळी अग्रेसर असून **वऱ्हाड** प्रांतांतील **रा. रा. मुधोळकर, रा. सा. देवराव विनायक** आणि **रा. रा. जोशी** हे त्रिवर्ग त्यांस साह्य करण्यास तत्पर असत. इतर मंडळीही पुष्कळ होती, पण त्यांचा येथें नामनिर्देश करणें अशक्य होय. **नागपूर** व **वऱ्हाड** ह्या दोन्ही प्रांतांतील मंडळीनें ‘ रिसेप्शन कमिटी ’ म्हणून एक व्यवस्थापक व स्वागत मंडळी नेमून तिचें अध्यक्षपद **नारायण स्वामी नायडू** यांस दिलें होतें, व त्या कमिटीच्या चिटनिसीचें काम **प्रो. भगीरथ- प्रसाद** यांणीं स्वीकारिलें होतें. ह्या सर्व मंडळीनें अंतःकरणपूर्वक अश्रांत परिश्रम करून डिसेंबरच्या २७ व्या तारखेपर्यंत सभेची सर्व प्रकारची जय्यत तयारी केली होती. **नाग- पूर** येथें राष्ट्रीयसभेचा अप्रतिम समारंभ होणार ही वार्ता **मध्य प्रांता**मध्यें चोहोंकडे पसरून प्रत्येकास तद्दर्शनाची अत्यंत लालसा उत्पन्न झाली होती. शिवाय, राष्ट्रीयसभेचे पुरस्कर्ते **ह्यूम साहेब** चालू वर्षी राष्ट्रीयसभेत शेवटची भेट देऊन **विलायते**स जाणार अशी

बातमी सर्वत्र प्रसिद्ध झाल्यामुळें त्या महात्म्याचें पुण्यप्रददर्शन घ्यावें, अशी इच्छा सर्व ठिकाणच्या देशभक्तांच्या अंतःकरणांत उत्पन्न होऊन जो तो मोठ्या आनंदानें **नागपुरास** जाण्याचा विचार करूं लागला. भिन्नभिन्न प्रांतांतून सार्वजनिक सभा होऊन लोकांच्यातर्फे मुखत्यार निवडले गेले, ते येणेंप्रमाणें:–

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कलकत्ता ... | ११९ | बांकीपूर... ... | ६८ | नगर ... ... | २२ |
| डाका ... ... | १ | मुझफरपूर ... | १७ | पुणें ... ... | ६६ |
| फरीदपूर ... | ६ | अलहाबाद ... | ६८ | मुंबई ... ... | ३५ |
| बारीसाल ... | ४ | लखनौ ... ... | ३० | उमरावती ... | २७३ |
| राजशाई ... | १७ | लाहोर ... ... | १७ | नागपूर... ... | ३२१ |
| रामपूर ... ... | १३ | कराची ... ... | ५ | जबलपूर ... | ६७ |
| भागलपूर ... | १२ | सुरत ... ... | ४ | मद्रास* ... | २७ |
| हजारीबाग... | ९ | सोलापूर ... | ३१ | | |

एकंदर १,२४२†

ह्या मुखत्यारांशिवाय प्रेक्षकसमूहही विशेष येणार असल्यामुळें त्यांच्याकरितां तिकिटें काढून त्यांच्या बसण्याच्या जागेची अगोदरपासूनच व्यवस्था करण्यांत आली होती.

डिसेंबर महिन्याचे पहिले तीन आठवडे संपून चवथ्या आठवड्यास प्रारंभ मात्र झाला तों **नागपुरास** अश्रुतपूर्व चमत्कारिक देखावा दृष्टीस पडूं लागला. **नागपूर** शहरापासून अल्प अंतरावर **लालबाग** ह्या नांवाची एक विस्तृत व अफाट जागा **श्रीमंत नवलोजीराव गुजर** ह्यांच्या मालकीची आहे. ती **मि. सी. व्ही. नायडू** ब्यारिस्टर ह्यांनीं तीन वर्षांकरितां भाड्यानें घेतली होती. ती त्यांनीं राष्ट्रीयसभेच्या समारंभाकरितां मोठ्या आनंदानें फुकट दिली. हीच जागा ह्या सर्व चमत्काराची रंगभूमि होय. जी पूर्वी ओसाड व निर्जन दिसत होती, ती प्रस्तुत नगराकृति बनून मनुष्यांनीं गजबजून गेलेली दिसत आहे. जेथें गवतांचे ढीग पडलेले दिसत असत, तेथें आतां भव्य मंडप आणि सुंदर गृहपंक्ति दिसूं लागली. जेथें एखादें लहानसें लांकडी फाटक किंवा कुंपणाचा झोंपा होता, तेथें सुंदर नक्षिदार **दिल्ली** दरवाजा दृष्टीस पडूं लागला. जेथें सर्व कंटक वास करीत असून तेथें जाणारांस आपल्या तीक्ष्ण प्रतापानें त्रस्त करीत, तेथें आज साफ रस्ता दिसत असून जागोजाग वेत्रासनें दिसूं लागलीं. जेथें पर्जन्याचे जलतुषार उडून नैसर्गिक शोभा दिसत असे, तेथें आज मनुष्यकृतीनें तयार केलेल्या जलकुंडांतील सुंदर जलतुषार थुईथुई उडून आनंदमद वाटूं लागले. जेथें

* ह्याशिवाय आणखीही कांहीं ठिकाणांहून मुखत्यार आले होते.

† १,२४२ पैकीं बरेच मुखत्यार आले नाहींत. फक्त ८१२ मुखत्यार आले होते.

अज्ञान गोपाल आपलीं गोधनें चारतांना दृष्टीस पडत, तेथें सज्ञान द्वारपाल चमकूं लागले; जेथें पक्ष्यांचा मधुर स्वर किंवा गोपालांचा वेणुरव ऐकूं येत असे, तेथें आतां सुस्वर वाद्यनाद दुमदुमूं लागला. तात्पर्य, कांहीं कालापूर्वी **लालबागेस** जें अरण्यस्वरूप दिसत होतें तें तिच्या पूर्व पुण्याईनें अल्प कालांत नाहींसें होऊन आज तिला रमणीय प्रासाद स्वरूप प्राप्त झालें आहे, आणि ती सर्व प्रांतांतील आर्यपुत्रांच्या पादरजानें पावन होत आहे, हें तिचें केवढें भाग्य बरें ?

**लालबागेची** सर्व जागा जरी पुष्कळ मोठी होती तरी तिच्या मध्यभागीं १६५ फूट लांब व ११० फूट रुंद असा एक सभामंडप बांधला होता. व त्यासभोंवतीं थोड्याशा अंतरानें–पण मोठ्या व्यवस्थेनें–एक नमुन्याच्या चाळी बांधल्या होत्या. स्टेशनावरून आलें म्हणजे ज्या दरवाजानें प्रवेश करावयाचा त्या दरवाज्याच्या ठिकाणीं एक मोठी, भव्य, सुंदर आणि विशाल अशी नक्षीदार कमान उभारली होती. ती पाहतांच मोठा आनंद वाटून आपण मोठ्या राजवाड्यांत जात आहों कीं काय? असा भास होई. त्या कमानीवर चित्रविचित्र रंगाची वेलपत्ती असून तिच्या शिरोभागावरील कामही फारच सुरेख केलें होतें. मध्यंतरीं दीपमाला लावण्याची तजवीज केली होती. कमानीच्या रस्त्याकडील बाजूस "**इंडियन न्याशनल कांग्रेस**" अशी इंग्रजी सुवर्णाक्षरें लाविलीं होतीं, व आंतील–मंडपाकडील–बाजूस "**गॉड सेव्ह दि कीन-एंप्रेस**" अशीं सुंदर सुवर्णमुद्रांकित अक्षरें लाविलीं होतीं. ती योजना फारच सयुक्तिक व राष्ट्रीय-सभेचें राजनिष्ठ स्वरूपदर्शक होती, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. कारण राष्ट्रीय-सभेच्या आंत जमलेल्या सर्व राजनिष्ठ प्रजाजनांला '**महाराणीसाहेबांस परमेश्वर चिरायु करो**' असें म्हणण्याचीं तीं अक्षरें वाचतांना मोठी उत्सुकता वाटे. ह्या महाद्वारांतून आंत गेलें म्हणजे प्रथम राष्ट्रीयसभेचीं कार्यालयें दृष्टीस पडत. येथें राष्ट्रीय-सभेचें वाचनगृह, येथें मुखत्यारांचीं नांवें नोंदण्याची कचेरी, येथें दवाखाना, येथें स्वागत-मंडळीची कचेरी, येथें कांग्रेसचें पोस्ट आफीस, अशीं अनेक कार्यालयें पाहून मनास जो आनंद वाटे तो सांगतां येत नाहीं. ह्या सर्व कार्यालयांमधून फारच मौज दृष्टीस पडे. जे मोठे विद्वान्, धनवान् आणि अधिकारसंपन्न असे लोक असत, ते ह्या ठिकाणीं मानपान एकीकडे ठेवून प्रेमभावानें पाहिजे तें काम करीत आहेत, असें दृष्टीस पडे. जे रावसाहेब मोठ्या प्रयत्नानेंही पानसुपारीस यावयाचे नाहींत, ते येथें दूतत्व करितांना दृष्टीस पडत. जे ग्राज्युएट इझि चेयरवर पडलेले असावयाचे, ते येथें चाहाचा प्याला घेऊन प्रतिनिधींपुढें भक्तिपुरस्सर शागिर्दी करीत आहेत, असें दिसे. खरोखर, हा अप्रतिम देखावा लक्षावधि रुपये खर्च करून कोणी विवक्षित स्थळीं पाहूं म्हणेल तर त्यास दिसेल काय?

तात्पर्य, सर्व **लालबागेमध्यें** मंगलरूपानें राजवैभव प्रत्यक्ष नांदत आहे कीं काय? असा

भास होई. चोहोंकडे हजारों स्वेच्छासेवक इकडूनतिकडे व तिकडूनइकडे धूम खेपा घालीत. ती त्यांची उल्हासवृत्तिप्रदर्शक अपूर्व गडबड ता० २६ दिसेंबरपासून तेथें सुरू झाली. त्याच दिवसापासून **जी. आय. पी.** रेलवेनें व **बी. एन्.** रेलवेनें भिन्नभिन्न ठिकाणांहून आलेल्या मुखत्यारांचे वृंद सभागृहांमध्यें शोभूं लागले. ता० २७ रोजीं मुखत्यारांची विशेष गर्दी झाली. वरचेवर येणाऱ्या अग्निरथांतून अनेक देशांतल्या लोकांचे समूह **नागपूर** स्टेशनावर उतरूं लागले. तेथें स्वागतमंडळीचे कांहीं लोक व स्वेच्छासेवक त्यांचा सत्कार करण्यास अगदीं तत्पर उभे असत. ता० २७ रोजीं रात्रीं **जी. आय. पी.** रेलवेची जी गाडी **नागपूर** स्टेशनावर आली तींत **मद्रास, दक्षिण प्रांत** व **मुंबई** येथील अनेक सभासद होते. ती गाडी स्टेशनावर येऊन स्थित होतांच 'डेलिगेटस्,' 'डेलिगेटस्' म्हणून एकच घोष होऊं लागला. प्रत्येक डब्याजवळ स्वेच्छासेवक मुखत्यारांचें सामान घेण्याची त्वरा करूं लागले! त्यांच्यावरील व्यवस्थापक प्रांताप्रांताचीं नांवें विचारून, त्याल्या भागांकरितां नेमलेले स्वेच्छासेवक त्यांच्या दिमतीस देऊन व त्यांस उत्तम वाहनें देऊन सभास्थानीं घेऊन गेले.

दुसरे दिवशीं प्रभातकाल झाला नाहीं तोंच राष्ट्रीयसभेच्या विषयाची जिकडे तिकडे चर्चा सुरूं झाली. कोणी अंगावर शालजोडी पांघरून मुखप्रक्षालन करीत असतांनाच आपल्या प्रांतांतील जंगलाचीं दुःखें सांगत आहे, तर कोणी चाहा पितांनाच **दक्षिणें**तील दुष्काळाचें भयंकर स्वरूप वर्णन करीत आहे, असा अप्रतिम देखावा दृष्टीस पडूं लागला. इतक्यांत **सूर्यनारायण** देदिप्यमान् होऊन आपलीं सुंदर किरणें मंडपामधून प्रकाशित करूं लागला. त्यांच्या प्रतापानें **नागपूर**च्या गुलाबी (?) थंडीचा अंमल कमी होऊं लागला. पक्षी सभास्थानीं असलेल्या वृक्षांवर सुंदर शब्द करूं लागले. **नागपूर सितावर्डी** येथून अनेक मोठमोठे गृहस्थ स्नानसंध्या आटोपून व उंची पोषाख परिधान करून सभास्थानीं प्राप्त झाले, व मोठ्या आनंदानें स्वीकृत कार्यास लागूं लागले. कित्येक मोठमोठे नगरवासी गृहस्थ भिन्नभिन्न प्रांतांतील स्वदेशबंधूंचें दर्शन घेण्यास उत्सुक होऊन मोठ्या उत्कंठेनें वारंवार येत आहेत असें दिसूं लागलें. त्याप्रमाणेंच आकाशमार्गानें पक्षीही इकडून तिकडे उडूं लागून मंजुळ गाणें गाऊं लागले. पक्षांचा स्वर जाणण्याची विद्या शिकलेला तेथें जर कोणी गृहस्थ असता तर त्यास असें दिसून आलें असतें कीं, हा पक्षीगण देखील **नागपूर**च्या लोकांस पुढील शब्द मागत आहे:—

## साकया.

**आलें आलें सुमंत्रमंडळ ह्या देशाचें सारं ॥**
**वाजत गाजत साजत आणा आज तया संभारें ॥१॥**

प्रेमळ चित्तें उदार हस्तें स्वागत बांधव त्यांचें ॥
करा घरोघर रथ्यामाजीं, मंदिरिं कीं देवांचें ॥ २ ॥
सडा फुलांचा घाला त्यांच्या रस्त्यावरती सारे ॥
सान थोर त्या सर्वा सजवा प्रेम सुमांच्या हारें ॥३॥

असो. अशा प्रकारें जिकडे तिकडे मंगलप्रद एकच दंगल उडून गेली. इतक्यांत ९॥ वाजून गेले, व 'जेवणाची तयारी झाली आहे, भोजनास चलावें' ह्मणून पाचारण होऊं लागलें. भोजनाची व्यवस्था चांगल्या प्रकारची केली होती इतकें सांगितलें म्हणजे पुरें आहे. (कारण भोजनसमारंभाचें विशेष वर्णन कित्येकांस अप्रिय होण्याचा संभव आहे ! ) तरी एक विशेष गोष्ट—जी इतर ठिकाणीं दृष्टीस पडली नाहीं अशी—ह्या स्थळीं सांगितल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. ती हीच कीं **नागपूर** येथील मंडळीनें मुखत्यारांच्या स्वागतपर अशा कांहीं कविता नवीन तयार करवून, त्या भोजनप्रसंगीं सुस्वर गाणारांकडून मंजूळ वाद्यांच्या नादावर म्हणवून दाखविल्या. असो.

भोजनोत्तर **दक्षिण प्रांतां**तील सर्व मुखत्यार मंडळीस **रा. रा. बाळ गंगाधर टिळक, डेक्कन** कांग्रेस स्टांडिंग कमिटीचे सेक्रेटरी, यांचें पाचारण झाल्यावर ती तेथीलच एका लहानशा तंबूमध्यें गेली, व तेथें सर्वानुमतें सबजेक्टस् कमिटी ( विषय नेमणारी मंडळी ) मध्यें प्रत्येक जिल्ह्यांतून कोण मुखत्यार घ्यावयाचे हें ठरवून त्या मुखत्यारांची यादी **ह्यूम साहेबां**कडे पाठविण्यांत आली. नंतर सर्व मंडळी सभामंडपाकडे गेली.

ह्या मंडपाची शोभा तर अवर्णनीयच होती. ह्यासभोंवतीं लावलेल्या सोनेरी झालरीवर सूर्याचे किरण पडून त्या इतक्या चकाकत असत कीं, तिकडे पाहतांच नेत्र दिपून जात. मंडपावर चौफेर विविध रंगांचीं निशाणें व पताका लावल्या होत्या. त्या वायूच्या लहरींसरशीं फडकत असत. मंडपाच्या आंत उत्तम प्रकारचें शुभ्र छत देऊन त्यासभोंवतीं झालरी सोडल्या होत्या. सभामंडपाचे सर्व स्तंभ चित्रविचित्र रंगाच्या पटांनीं वेष्टिलेले असून त्यावर **चक्रवर्तिनी महाराणी व्हिक्टोरिया. प्रिन्स ऑफ वेल्स, ह्यूम साहेब** वगैरेंच्या मोठमोठ्या सुंदर तसबिरा लाविल्या होत्या. मध्य भागाच्यासभोंवतीं प्रेक्षकांकरितां ह्मणून ज्या जागा नेमिल्या होत्या, त्यांच्यावरील बाजूस सुंदर कमानी लाविल्या होत्या. सर्व मंडपामध्यें हंड्या, झुंबरें वगैरे अनेक बिलवरी सामान टांगलें होतें. अध्यक्ष, प्रतिनिधि व प्रेक्षक ह्या सर्वांच्या बसावयाच्या जागा उत्तम प्रकारें तयार केल्या होत्या. वर्तमानपत्रांचे जे लघुलेखनपटु बातमीदार आले होते, त्यांना बसण्याकरितां अध्यक्षांच्या पुढें खालील बाजूस खुर्च्या व टेबलें ठेविलीं होतीं, व सर्व सभामंडपासभोंवतीं जागजागीं अनेक फुलझाडांच्या कुंड्या ठेविल्या होत्या. मंडपामध्येंही मध्यस्थानीं कांहीं विविध रंगांचे पुष्पगुच्छ नेत्रांचें रंजन करीत असत. तात्पर्य, मंडपामध्यें गेलें असतां अत्यंत आल्हाद वाटून अंतःकरण अगदीं रमून जात असे. असो.

# दिवस १ ला.

## (सोमवार, ता० २८ वी डिसेंबर १८९१.)

दोन वाजावयाची वेळ आली. सर्व मंडप **हिंदुस्थानां**तील भिन्नभिन्न ठिकाणांहून आलेल्या प्रतिनिधिमंडळानें आणि प्रेक्षकसमुहानें अगदीं भरून गेला. **दक्षिणें**तील **राव** आणि **पंत** यांच्या विविध रंगांच्या पगड्या, **मद्रासे**कडील **अय्यर** आणि **नायडू** यांचे जरीकांठी रुमाल, **वऱ्हाडां**तील लोकांचीं चमत्कारिक पागोटीं, **उत्तर प्रांतां**तल्या **मुसलमान** लोकांच्या शुभ्र व रंगीत टोप्या, **बंगाली बाबूं**च्या वस्त्रहीन डोक्यांवरील कृष्ण रंगी कचभार, आणि **सिंधी** लोकांच्या किनारदार उंच टोप्या ह्या सर्वांची अप्रतिम शोभा दिसूं लागली. वरचेवर येणाऱ्या प्रतिनिधींस योग्य स्थानीं स्थित करण्याकरितां नेमलेली व्यवस्थापक मंडळी हिरव्या, तांबड्या आणि सोनेरी अशा तीन रंगांच्या कापडाचे तयार केलेले पट्टे आपल्या गळयामध्यें परिधान करून आणि एक सुंदरशी काठी हस्ताचे ठायीं धारण करून, राष्ट्रीयशांततेचें संरक्षण करण्यास तत्पर आहों असें दर्शवीत, सभास्थानांतील अनेक जागीं चमकूं लागली. इतक्यांत, मुख्य द्वारांतून राष्ट्रीयसभेचे अत्यंत प्रिय भक्त आल्याचें वृत्त समजतांच सर्व प्रतिनिधिवृंद आणि प्रेक्षकसमुदाय तद्दर्शनोत्सुक होऊन तिकडे पाहूं लागला, तों, " बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी," "पंडित अयोध्यानाथ," "पंडित मदनमोहन," "बाबू डब्ल्यू. सी. बानर्जी," " मि. नारायण स्वामी नायडू," "मि. फेरोजशाहा मेहता," "मि. डी. ई. वाचा," " मि. ह्यूम," "राव बहादूर आनंदाचार्लू" इत्यादि नांवांचा घोष, आणि प्रत्येक वेळीं टाळ्यांचा गजर ऐकूं येऊं लागला. इतक्यांत दोन वाजले, आणि रीतीप्रमाणें **नागपूर** स्वागतमंडळीचे अध्यक्ष **मि. सी. नारायण स्वामी** हे, सातव्या राष्ट्रीयसभेस विविध प्रांतांतून आलेल्या प्रतिनिधिमंडळाचें स्वागत करण्याकरितां ( व्याख्यात्याकरितां मुद्दाम तयार केलेल्या ) उच्चासनावर जाऊन उभे राहिले. ते तेथें जाऊन पोहोंचले नाहींत तोंच आनंदप्रदर्शक टाळ्यांचा गजर झाला. अगोदर **नायडूं**चें अंतःकरण स्वदेशप्रीतीनें तुडुंब भरलेलें असल्यामुळें तद्दर्शनानें झालेला आनंद टाळ्यांच्या रूपानें प्रतिनिधिमंडळानें प्रदर्शित करितांच **नायडूं**चें हृदयांतील प्रेमसंचय उचंबळून गेला, आणि त्यांच्या मुखांतून उद्गत होणाऱ्या शब्दांस अमृतमय करूं लागला, तों खरोखरच त्यांच्या मुखांतून अमृतोपम प्रेमळ शब्द निघूं लागले. ते म्हणाले :—

" मद्देशबांधवहो, **नागपूर** स्वागतमंडळीचा अध्यक्ष ह्या नात्यानें सातव्या राष्ट्रीयसभेस प्राप्त झालेल्या प्रतिनिधिमंडळाचें स्वागत करण्याचें आनंददायक कर्तव्य मजकडे आलें आहे. हें कर्तव्य बजावण्यास मी अगदीं अपात्र आहें. तथापि, तें मी अत्यंत प्रेमपूर्वक व अंतःकरणपुरस्सर करीत आहें. आजपर्यंत राष्ट्रीयसभेचे महा समारंभ **मुंबई, कलकत्ता** आणि **मद्रास** इत्यादि भयंकर तुफानाच्या जागीं पार पडून, ती आज आर्या-

र्ताचें मध्यस्थान जें **नागपूर**, तेथें येऊन पोहोंचली आहे. आतां, परमेश्वरकृपेनें येथूनच **हिंदुस्थान**देशाच्या प्रत्येक कोनाकोपऱ्यांत तिचें बल वृद्धि पावून प्रसृत होवो, अशी मी आशा करितों, एवढेंच नव्हे पण राष्ट्रीयसभेचे करुणोद्गार **इंग्लंडा**मध्यें विदित करून, तेथून समान हक्क संपादन करून दुःखपरिमुक्त व्हावयाचें जें अत्यंत महत्वाचें काम आहे, तें करण्याकरितां **हिंदुस्थान**देशांतून कांहीं मंडळी पाठविण्याचा जो विचार चालला आहे तो येथेंच परिपक्व होवो. अशी माझी इच्छा आहे. ( टाळ्या ).

आमचा प्रांत लहान, आमचें **नागपूर** शहरही लहान, आमचीं साधनें अल्प, विद्याप्रसारही अल्पल्प, त्यामुळें **हिंदुस्थानां**तील इतर शहरांमध्यें जे राष्ट्रीयसभेचे सांवत्सरिक उत्सव झाले, त्या वेळीं आपला आदरसत्कार जसा मोठ्या थाटानें झाला असेल तसा येथें होणार नाहीं हें साहजिक आहे. (ह्या वेळीं सर्व प्रतिनिधींच्या मुखांतून " तसें कांहीं नाहीं " म्हणून उद्गार निघाले. ) तथापि, मी खात्रीनें सांगतों कीं, इतर प्रांतांपेक्षां **मध्य प्रांतां**तील लोकांस आपणां सर्वांच्या आगमनानें अत्यंत आनंद झाला असून, त्यांनीं आपल्या स्वागतार्थ यथाशक्त्या प्रयत्न करण्यांत अत्यंत औत्सुक्य दर्शविलें आहे. तेव्हां, प्रिय मित्र हो, आपलें स्वागत असो ( Welcome ) असें सहस्र वेळां म्हणून, आमच्या व्यवस्थेमध्यें ज्या कांहीं उणीवी असतील त्यांबद्दल क्षमा करा, आणि आपल्या नम्र देशबांधवांनीं मोठ्या मनोभावानें केलेली सेवा गोड मानून घ्या, ही आपणांस सविनय प्रार्थना करितों. ( टाळ्या. ) "

अशा प्रकारें स्वागतपर प्रेमळ भाषण करून **नारायण स्वामी** हे राष्ट्रीयसभा ही किती राजनिष्ठ आहे, व तिचें कर्तव्य किती पवित्र आहे, ह्याचें विवेचन करावयास लागले.

त्यांत त्यांनीं सांगितलें कीं, **इंग्रजी** राज्याविषयीं आमच्या मनांत अत्यंत प्रेमभाव वसत आहे. त्यामुळें **आंग्ल**राष्ट्राच्या कृपेनें आम्हांस मिळालेल्या अनंत सुखप्रद गोष्टी आम्ही कधींही विसरणार नाहीं. आमच्या सरकारची राज्यपद्धति जरी उत्तम आहे तरी तींत पुष्कळ सुधारणा होणें इष्ट आहे. ह्या सुधारणा कोणत्या प्रकारें केल्या असतां **इंग्रजी** राज्यपद्धतींतील दोष नाहींसे होतील, व प्रजाजनांस सुख मिळेल, हें विपुल लोक शिक्षणाच्या योगानें आम्हांस चांगलें समजूं लागलें आहे. आम्ही **ग्रेट ब्रिटन**ची राजनिष्ठ प्रजा आहों, आणि **हिंदुस्थान** व **इंग्लंड** ह्यांचें चिरकाल ऐक्य असावें, अशी आमची अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. तेव्हां, हें ऐक्य कायम राहण्यास **इंग्रजी** राज्यपद्धतींतील दोष—निर्भिडपणें, योग्य व कायदेशीर मार्गानें—व्यक्त करणें अत्यंत अवश्यक असून त्यांत दोन्ही देशांचें हित केल्याप्रमाणें होणार आहे. हे दोष नाहींसे करून योग्य सुधारणा करण्याबद्दल तनुमनधनेंकरून झटणारी अशी 'राष्ट्रीयसभा' ही संस्था आहे. ही खरोखर उपयुक्त आहे, व तिच्या योगानें राज्यकर्त्यांस चांगली मदत होत आहे, व ही गोष्ट या देशांतील व **विलायतें**तील पुष्कळ विचारी आणि

सत्यप्रिय लोकांच्या अनुभवास पूर्णपणें येऊन चुकली आहे, एवढेंच नव्हे तर ते राष्ट्रीयसभेचें म्हणणें अति शांतपणानें ऐकूं लागले आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. **हिंदुस्थान**चे प्रस्तुतचे व्हाईसराय–**लार्ड ल्यान्सडौन**–ह्यांनीं राष्ट्रीयसभेचा कायदेशीरपणा मान्य करून तिला सरकारी नोकराशिवाय पाहिजे त्यास सभासद होण्याची पूर्ण मोकळीक आहे, अशा अर्थाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे, ही गोष्ट समाधान मानण्यासारखी होय ह्यांत शंका नाहीं.

आतां, आपणांस आपलें कर्तव्य शांतपणानें केलें पाहिजे. आपल्या मार्गांतील बरेच अडथळे नाहींसे झाले आहेत, तरी आपले प्रयत्न कळकळीनें शेवटास नेले पाहिजेत. आपल्या देशांतील लहान मोठ्या सर्व **युरोपियन** अधिकाऱ्यांची आपण अशी खात्री करून दिली पाहिजे कीं, आमची राष्ट्रीयसभा जें काय मागत आहे तें अत्यंत उत्तम अशा सुविचाराचें फल आहे, एवढेंच नव्हे पण अधिकारी वर्गांतील अत्यंत सुजाण गृहस्थांपेक्षांही हे **हिंदुस्थानां**तील स्वकर्तव्यदक्ष निस्सीम देशभक्त ज्या गरजा व्यक्त करून दाखवीत आहेत, त्या यथायोग्य आहेत. त्याचप्रमाणें, आमचीं दुःखें व आमच्या एकपष्टमांश लोकांची अत्यंत शोचनीय स्थिति, **विलायते**तील सर्व लोकांस समजावून देऊन त्यांचें साह्य आपण घेतलें पाहिजे, आणि पार्लमेन्टकडून आपलें दुःखविमोचन करविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. **ह्यूम साहेबांचे** "जसे लोक तशा प्रकारची त्यांना राज्यपद्धति मिळते" हे शब्द आपणांस पूर्णपणें लक्षांत ठेवून वागलें पाहिजे. ह्याकरितां आपण आपली गृहस्थिति सुधारून मोठमोठ्या गोष्टी प्राप्त करून घेण्याची इच्छा बाळगली पाहिजे, आणि आपण चांगल्या राज्यपद्धतीस पात्र आहोंत, एवढेंच नव्हे पण ज्या **पुराण**प्रसिद्ध देशांतील विख्यात पूर्वजांपासून आपण जन्म पावलों आहों त्यांची कीर्ति कायम राखून खरे आर्यपुत्र म्हणून सिद्ध करून दाखविलें पाहिजे. (टाळ्यांचा गजर.) ह्यानंतर **मध्य प्रांता**चे चीफ कमिशनर–**मि. म्याकडोनल्ड**—आणि **वऱ्हाड प्रांता**चे कमिशनर–**कर्नल केनेथ म्याकंझी**—ह्यांनीं कोणत्याही प्रकारें राष्ट्रीयसभेच्या कामास अडथळा न आणतां उलट लेखनद्वारें व भाषणद्वारें सरकारी कामदारांनीं खुशाल राष्ट्रीयसभेस जावें असें उघडपणें प्रसिद्ध करून राष्ट्रीयसभेबद्दल आपली पूज्य बुद्धि आणि स्वतःचें मानसिक औदार्य प्रदर्शित केलें, ह्याबद्दल **मि० नारायण स्वामी** ह्यांनीं ह्या उभय सद्गृहस्थांचे आभार मानिले, एवढेंच नव्हे पण **नायडू** यांणीं स्पष्टपणें असें सांगितलें कीं, अशा प्रकारचे कामदार जर सर्व **हिंदुस्थान**भर असतील, तर राष्ट्रीयसभेची मग अवश्यकताच राहणार नाहीं; पण असे थोर मनाचे सेवक फार क्वचित्! म्हणून, पुनः त्यांनीं चीफ कमिशनर–**मि० म्याकडोनल्ड**–आणि **मध्य प्रांतां**तील सर्व अधिकारी ह्यांच्या नांवानें त्रिवार आभार प्रदर्शक टाळ्यांची गर्जना करून आपलें भाषण संपविलें. **मध्य प्रांतां**तील सरकारी कामदारांचें हें अनुकरणीय सद्वर्तन ऐकून सर्व प्रांतांतील प्रतिनिधींस

अत्यंत संतोष झाला, आणि ते त्यांचे फारफार अभिनंदन करूं लागले. इतक्यांत **राय-दुर्गाप्रसाद** नामक एक गृहस्थ **नारायण स्वामींच्या** भाषणाचा सारांश **उर्दु** भाषेमध्यें सांगण्याकरितां व्यासपीठावर दाखल झाले, आणि त्यांनीं आपल्या आवेशयुक्त मधुर स्वरांत तो **आंग्ल**भाषानभिज्ञ जनांस विदित केला. नंतर मग

## अध्यक्षाची योजना

होऊन सातव्या राष्ट्रीयसभेच्या मुख्य कर्तव्यास प्रारंभ झाला. **अलहाबादेचे** सुप्रसिद्ध गृहस्थ **ऑनरेबल पंडित अयोध्यानाथ** हे स्वस्थानीं उभे राहिले. त्यांची ती भव्य मूर्ति अवलोकन करितांच सर्वत्रांस आनंद झाला. **पंडितजी** यांनीं आपल्या गंभीर व आवेशयुक्त वाणीनें, "राष्ट्रीयसभेच्या बाळपणापासून सेवा करणारे तिचे कट्टे भक्त **राय बहादूर पी. आनंदाचार्लू-मद्रास** येथील हायकोर्टाचे सुप्रसिद्ध वकील व नामांकित गृहस्थ-यांनीं सातव्या राष्ट्रीयसभेचें अध्यक्षस्थान सुशोभित करावें" अशी सूचना केली. त्याबरोबर टाळ्यांचा मोठा गजर झाला. व **मुंबईचे** प्रसिद्ध ब्यारिस्टर-**मि० फेरोजशाहा मेथा**-हे **पंडितजींच्या** सूचनेस अनुमोदन देण्याकरितां उठून उभे राहिले. त्यांनीं अनुमोदन देतांना अल्प शब्दांत गोड वाणीनें असें सांगितलें कीं, "आजचे सभेचें अध्यक्षपद खुद्द **पंडित अयोध्यानाथ** ह्यांच्याकडेस गेलें असतें, तर सर्व प्रतिनिधिमंडळास फार आनंद झाला असता. पण **पंडितजींनीं** मोठ्या नम्रपणानें त्या मानाचा स्वीकार केला नाहीं ! तथापि तो, **मद्रासच्या** सुप्रसिद्ध व स्वदेशकार्यरत अशा योग्य गृहस्थासच देण्याची त्यांनीं जी सूचना केली आहे, ती फार चांगली असल्यामुळें मी मोठ्या आनंदानें तिला संमति देतों." **फेरोजशाहा मेथा** ह्यांची **पंडितजींच्या** सूचनेस संमति मिळतांच सर्व प्रतिनिधिमंडळानें संतोष प्रदर्शक टाळ्यांचा मोठा गजर केला. त्या योगानें सर्व सभामंडप अगदीं दणाणून गेला. तो टाळ्यांचा गुरुघोष होत असतांना **राय बहादूर आनंदाचार्लू** ह्यांची लहानशी मूर्ति व्याख्यानपीठावर उभी राहिली.

**आनंदाचार्लू** हे अंमळ ठेंगणे असल्यामुळें व्याख्यानपीठावरून त्यांचें फक्त मुखच दृष्टीस पडत होतें, तरी तें अत्यंत तेजस्वी दिसे. त्यांचा अंगवर्ण काळसर होता, तरी त्यांच्या हृदयांत वसत असलेल्या स्वदेशप्रेमानें तो अत्यंत प्रकाशमान् झाला आहे असें वाटे. त्यांच्या मुखावर जे किंचित् घर्मबिंदु आले होते, ते त्यांच्या हृदयांत वास करीत असलेल्या स्वदेशप्रीतीचें प्रत्यक्ष दर्शन देत असत, कारण, त्यांच्या प्रेमळ शब्दांमधून आपला पूर्ण समावेश होणार नाहीं ह्मणून स्वदेशप्रीति घर्मरूप धारण करून त्यांच्या मुखावर अवतृत झाली होती. सूर्यविकासित नवकमलावर दंवबिंदु पडून जशी त्यास टवटवी येते, तशी ह्या मुखकमलावर घर्मबिंदूंनीं सतेजता आणिली होती. व्यासपीठाच्या वरील भागीं टांगलेलीं हंड्याझुंबरें, **आनंदाचार्लूंच्या** सन्निधागमनानें संतोष झाला आहे. हें प्रदर्शित करण्याकरितां मंद गतींत डुलत होतीं, आणि "आनंदाचार्लू" या

कर्णमनोहर नांवाचा जयघोष करण्याकरितां विलवरी झाडांचे लोलक मंजुळ रव करीत असत, आणि मंडपाच्या छतास लावलेल्या लांब झालरी **आनंदाचार्लूं**चें सान्निध्यसुख घेण्याचा डौल दाखवून खरोखरच मोठमोठ्यानें हालत असत. तात्पर्य, निर्जीव वस्तूंना देखील अशा महात्म्यांच्या दर्शनानें अत्यंत आनंद झाला आहे, असें दिसत होतें. मग प्रत्यक्ष, विद्वान्, स्वदेशाभिमानी, आणि परोपकारप्रिय अशा भिन्नभिन्न प्रांतांतील महाजनांला किती आनंद वाटत असेल ह्याची कल्पनाच करवत नाहीं. तेव्हां, व्यर्थ त्यांच्या आनंदातिशयाचें वर्णन करण्याचे भरीस तरी कां पडावें? असो. आनंदमूर्ति **राय बहादूर आनंदाचार्लू** ह्यांनीं व्याख्यानपीठावर येऊन आपल्या अस्खलित वाणीनें जें सुंदर भाषण केलें, तें येणेंप्रमाणें :—

## अध्यक्षांचें भाषण.

" प्रियदेशबांधवहो, आजच्या प्रसंगीं आपण मला अध्यक्षस्थान दिलें याबद्दल मी आपला फारफार आभारी आहें. हें स्थान माझ्यापेक्षां अधिक योग्य अशा सद्गृहस्थास मिळून तें अधिक विराजमान् व्हावयाचें, परंतु दोन अदृष्टपूर्व गोष्टींच्या योगानें तसें घडून आलें नाहीं. त्या गोष्टी ह्या कीं, **नामदार पंडित अयोध्यानाथ** हे आपल्या सर्वांच्या आणि माझ्या दुर्दैवानें **मद्रासी** गृहस्थ नाहींत. त्यांनीं **मद्र**जनांवर अनुग्रह करून ह्या बहुमानाचा स्वीकार केला असतां तर मग मी त्या परहितदक्ष, उदात्त, स्वाभिमानी आणि स्पष्टवादी अशा निस्सीम राष्ट्रसभाभक्ताशीं आपली तुलना करून घेण्याच्या संकटांत मुळींच पडलों नसतों ! पण, ह्या अपूर्ण व विविधविचारपरिप्लुत जगतामध्यें स्वकर्तव्य बजावण्याची पाळी योग्य मनुष्यावरच येते असें नाहीं. त्यामुळें आणि सर्व स्वदेशबांधवांनीं एक मतानें केलेली आज्ञा शिरसावंद्य करणें हें उचित असल्यामुळें मला ह्या पदाचा स्वीकार करणें भाग पडलें. माझी ह्या स्थानीं कां योजना झाली ह्याचें दुसरें कारण माझे विद्वान् मित्र **दिवाण बहादूर सुब्रह्मण्य अय्यर** ह्यांना **मद्रास** हायकोर्टामध्यें न्यायाधिशाची जागा मिळाली हें होय. सकृद्दर्शनीं ही गोष्ट किंचित् दुःखास्पद आहे असें कोणासही वाटेल. परंतु, माझ्या मतानें राष्ट्रीयसभेचा संबंध पाहूं गेलें असतां, ही गोष्ट खरोखर खेद मानण्यासारखी नसून उलट संतोषदायकच आहे. कारण, ज्या गृहस्थाच्या अंगीं अनंत सद्गुण आहेत अशा गृहस्थाच्या ठिकाणीं देशसेवा करण्याची प्रबल इच्छा असणें हा गुण राजसेवेंतील बहुमानाची जागा संपादन करण्याविषयींच्या महत्त्वाकांक्षेविरुद्ध नाहीं असें ह्यावरून उत्तम प्रकारें सिद्ध होत नाहीं काय? त्यांतून **सुब्रह्मण्य अय्यर** हे गृहस्थ सरकारी नोकरीकरितां लोकसेवेपासून पराङ्मुख झाले होते असें मुळींच नसून उलट, त्यांना सरकारचा आश्रय मिळाला तरी तो संपतांच ते पूर्ववत अंतःकरणपूर्वक देशसेवेस झटणारे गृहस्थ असल्यामुळें, ते राजसेवा व लोकसेवा ह्या दोन्ही कर्तव्यांकडे सारखें लक्ष पुरवितात,

अशी त्यांची ख्याति आहे. ह्यामुळें, अशा बुद्धिमान् पुरुषास सरकारनें मोठी हुद्याची जागा दिली हा आपल्या राष्ट्रीयसभेस मोठा मान मिळाला असेंच समजलें पाहिजे. असो. येथपर्यंत मी स्वतःसंबंधानें चार शब्द बोललों. परंतु, ह्याच प्रसंगीं आपल्या राष्ट्रीय-सभेचें गेल्या वर्षांत जें भयंकर नुकसान झालें त्याचें स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. हें नुकसान म्हणजे **ब्राडला** साहेबांचा मृत्यु! हे गृहस्थ आपल्या राष्ट्रीयसभेचे मोठे पुरस्कर्ते असून राष्ट्रीयसभेच्या मागण्यांतील जो प्रमुख विषय—कायदे-कौन्सिलाची सुधारणा—तो त्यांनीं हातीं घेतला असून त्याला यश प्राप्त होण्याचा बराच संभव होता. **ब्राडला** साहेब हे केवळ परोपकृतीचा मूर्तिमंत पुतळा होते, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. आम्हीं कायदेकौन्सिलाची सुधारणा करण्याबद्दल सर-कारच्या कानीं पुष्कळ कंठशोष केला. परंतु **ब्राडला** साहेबांनीं स्वहितत्याग करून आमचें हें काम हातीं घेई तोंपर्यंत आमचा कंठशोष केवळ अरण्यरुदनवत् होता. पुढें, **ब्राडला** साहेब परलोकवासी होतांच, तें कायदेकौन्सिलाचें बिलही **लॉर्ड क्रॉस** ह्यांनीं मागें घेतलें. ह्यावरून, **ब्राडला** साहेबांचें महत्व किती होतें हें चांगलें व्यक्त होईल. **ब्राडला** साहे-बांनीं आम्हांस असें वचन दिलें होतें कीं, **हिंदुस्थानचें** हित करण्याबद्दल पार्लमेन्ट सभेमध्यें जें पर्वताएवढें मोठें व अत्यंत बिकट कर्तव्य सिद्धीस न्यावयाचें आहे, तें बजावण्याचा मी अल्पमा तरी प्रयत्न करीन. परंतु, हें त्यांचें मोठ्या विचाराचें वचन शेवटास जाण्यापूर्वीच त्यांच्यावर दुष्ट काळानें झडप घालून त्यांस ह्या नश्वर जगांतून ओढून नेलें! ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे!! **ब्राडला** साहेबांनीं अल्प काळामध्यें **हिंदु-स्थाना**बद्दल जी कळकळ दाखविली, आणि जे अश्रांत परिश्रम केले, त्यावरून त्यांच्यासारखा महात्मा पुरुष आपणांस पुनः मिळेल कीं नाहीं ह्याची फार शंका आहे. खरो-खर अशा पुरुषाचें, त्याच्या विलक्षण गुणांस आणि निरपेक्ष बुद्धीनें केलेल्या परोपकृतीस शोभेल असें स्मारक करण्याबद्दल आम्हीं बराच दिरंग लाविला आहे, व त्याबद्दल आमचे शत्रु आमच्यावर कृतघ्नतेचा दोषारोपही करीत आहेत. ज्या इलाख्यांतून मी येथें प्राप्त झालों आहे. त्या इलाख्यांत दुष्काळ आणि तदनुषंगिक अनंत अडचणी ह्यांनीं लोकांवर इतका कहर उडवून दिला आहे कीं, त्यांच्यापुढें हें कर्तव्य करण्यास ते अगदीं असमर्थ आहेत, हें मी आपणांस स्वानुभवावरून सांगतों. लोकांच्या हक्कांचें रक्षण करण्यांत सतत तत्पर राहणाऱ्या पुरुषांचें, धनाढ्य लोकांनींच स्मारक करावें, हें फक्त त्यांचेंच कर्तव्य नसून, **ब्राडला** साहेब ज्या साधारण वर्गापैकींच मी एक आहे असें सांगण्यांत गर्व मानीत असत, त्या साधारण जनसमुहानेंही त्यांच्या स्मारकास हातभार लावणें त्यांचें कर्तव्य आहे. तथापि, मित्र हो, आमच्या इलाख्या-मध्यें—उशिरां तर खरीच—पण आतांशीं पर्जन्यवृष्टि होण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. ही पर्जन्याची कृपादृष्टि अशीच वृद्धि पावून, त्यांतील जलबिंदु-प्रमाणेंच प्रत्येक व्यक्तीकडून थोडीथोडी मदत होऊन त्या वर्गणीनें **ब्राडला** स्मारक

कमिटीचा खजिना तेव्हांच भरून जावो, अशी मी आशा करितों. थोड्या महिन्यामध्यें ही माझी विनंति लोकसमुहाकडून पूर्णपणें शेवटास जाऊन माझी इच्छा सफल होईल, ह्यांत मला लवमात्रही शंका वाटत नाहीं.

मित्र हो, आणखीही दुसऱ्या दोन मोठ्या गृहस्थांच्या मृत्युसंबंधानें मला येथें दुःखोद्गार काढल्यावांचून राहवत नाहीं. हे दोन्ही गृहस्थ राष्ट्रीयसभेच्या स्वागतमंडळीचे अध्यक्ष असून ते गत वर्षांतच परलोकवासी झाले आहेत! ते **राजा सर टी. माधवराव** आणि **डा॰ राजेंद्रलाल मित्र** हे होत. पैकीं दुसरे गृहस्थ हे अत्यंत विद्वान् व बहुश्रुत ज्ञानसंपन्न असे असून, राजा व रायबहादूर ह्या पदवीद्वयानें जरी त्यांच्या नांवाची प्रभा चमकत होती तरी त्यांच्या गुणांची उज्वल कीर्ति त्यांच्या अगोदरच सर्वत्र प्रकाशमान झाली होती. ह्या उभय गृहस्थांनीं राष्ट्रीयसभेच्या प्रमुख पदांचा अंगीकार करून अंतःकरणपूर्वक तत्प्रीत्यर्थ जी सेवा केली तिच्याबद्दल आह्मीं त्यांचे कृतज्ञताबुद्धीनें आमरण उपकार मानले पाहिजेत.

ह्या दोहोंहूनही एका अलौकिक पुरुषासंबंधानें आज आपणांस आपली अत्यंत पूज्य बुद्धि प्रदर्शित केली पाहिजे. हे गृहस्थ **हिंदुस्थान**चे परम हितचिंतक **मि.ए.ओ. ह्यूम** हे होत. सुदैवानें आज ते आपल्याजवळ बसले आहेत. ( टाळ्यांचा गजर. ) ह्या गृहस्थांनीं आपलें तनमनधन खर्च करून **हिंदुस्थान**च्या हितार्थ जे अविश्रांत परिश्रम केले आहेत, त्यांयोगानें ते आपणा सर्वांच्या प्रीतीस व कृतज्ञतापूर्वक उपकारप्रदर्शनास पूर्ण पात्र झाले आहेत, एवढेंच नव्हे पण आपले पुत्रपौत्रही त्यांबद्दल त्यांस धन्यवाद देतील अशी मी आशा करितों.

**ह्यूम** साहेब राष्ट्रीयसभेच्या प्रमुख चिटणिसीची जागा सोडून देऊन ते **हिंदुस्थानां**तील आपल्या कामास आतां शेवटचा रामराम करणार म्हणून त्यांनीं आपणांस सूचना दिली आहे. पण तिनें आह्मांस अगदीं आश्चर्यचकित करून सोडलें आहे. अहो, ज्यांनीं रात्रंदिवस **हिंदुस्थाना**करितां कळकळ बाळगून मोठ्या प्रेमभावानें अनेक कष्ट केले, आणि ज्यांचें नांव **लॉर्ड रिपन** साहेबांप्रमाणें प्रत्येकांच्या घरींदारीं नांदत आहे, एवढेंच नव्हे पण ज्यांच्या सुंदर चित्रानें आमचीं घरें शोभिवंत होऊन ज्यांचें हास्य व प्रसन्न मुख हें आम्हांस आनंदवीत आहे, ते महोदर पुरुष **मि. ह्यूम** हे होत, हें बोलून दाखवावयास पाहिजे काय? त्यांची निरपेक्ष बुद्धि इतकी दूरदर्शी व पक्ति आहे, आणि त्यांच्या परोपकार गुणांबद्दल माझी इतकी पूज्यबुद्धि आहे कीं, माझ्या कल्पनातरंगाची गति येथपर्यंत जाऊन पोहोंचते कीं, भाषाशब्दोत्पत्तिशास्त्रवेत्ते कांहींही ह्मणोत, पण **ह्यूमेन** हा इंग्रजी शब्द (ह्याचा अर्थ दयाळू असा आहे) **ह्यूम** ह्या शब्दापासूनच निघाला आहे, असें म्हणण्यास मी तयार आहें! (टाळ्या.) तेव्हां, असे गृहस्थ **हिंदुस्थान**च्या राष्ट्रीयसभेच्या चिटणिसीचा राजीनामा देणार ही गोष्ट ऐकून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं बरें? खरोखर म्हटलें तर **ह्यूम** साहेबांचा हा राजीनामा मान्य करण्यास आम्हीं

अगदीं तयार असलें पाहिजे होतें, पण आम्हांस इंग्रजसरकारच्या राज्यपद्धतीनें जी संवय लाविली आहे, त्या योगानें आम्ही अगदीं परावलंबनप्रिय झालों आहों. सरकार सर्व राज्यकारभार आणि तत्संबंधीं सर्व काळज्या आपल्या स्वतःच्या शिरावर घेत असल्यामुळें आम्हांस स्वतः कोणतीच गोष्ट आंगच्या जोरानें करण्याची संवय नाहीं! राष्ट्रीयसभेची ही जर दुसरी किंवा तिसरी बैठक असती, तर खरोखर मी अगदीं निराश होऊन पुढें काय होणार ह्या विचारानें अगदीं गोंधळून गेलों असतों. परंतु, ह्यूम साहेब यांणीं दूरदर्शीपणानें व अविश्रांत परिश्रमांनीं आपल्या सूचनेमध्यें आम्हांस असें आश्वासन दिलें आहे कीं, राष्ट्रीयसभेच्या महत्वाच्या कामाचा एक भाग आतां संपला आहे. तिचा पाया आतां पूर्णपणें उभारला जाऊन तिचे हेतु लोकांस चांगले अवगत झाले आहेत, आणि आजची सातवी सभा ही नवीन विषयांचा ऊहापोह करण्याकरितां अवश्य नसून फक्त मागील सभांनीं ठरविलेले विषय मान्य करून त्यावर शिक्कामोर्तब करण्याकरितांच आहे. ह्याबद्दल मी त्यांचे आभार मानितों.

खरोखर, ह्यूम साहेबांचे हे शब्द अति थोर आणि उत्तेजनपर असे आहेत. ह्या शब्दांच्या प्रत्येक अक्षराचा आपण विचार केला पाहिजे. आपणास प्रथमतः कायकाय काम करावयाचें होतें ह्याचा विचार करण्याकरितां आपण राष्ट्रीयसभेच्या कारकीर्दीचें थोडेंसें सिंहावलोकन करूं. जनरल सेक्रेटरीच्या म्हणण्याप्रमाणें पूर्वी आम्हांस अति मोठें काम करावयाचें होतें. प्रथमतः आमचे स्वतःचे विचार बरोबर आहेत कीं नाहींत ह्याचा निर्णय करून नंतर ते राष्ट्रीयसभेच्या शत्रूंस स्पष्ट करून दाखवावयाचे होते. तसेंच, वारंवार त्या विषयावर ऊहापोह करून आम्हांस प्राप्त करून घेण्यासारख्या गोष्टी कोणत्या आहेत तें पहावयाचें होतें, आणि आमच्या देशास कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत ह्याचा निर्णय करावयाचा होता. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांचें थोडक्यांत आणि स्पष्ट रीतीनें एक स्वरूपपत्र तयार करावयाचें होतें. तात्पर्य, आपला हा कार्यक्रम सिद्धीस जाईपर्यंत हिंदुस्थानांतील सर्व सुधारक आणि हितचिंतक मंडळींना ज्या एका झेंड्याखालीं जमतां येईल असा झेंडा संस्थापित करावयाचा होता. आणि, शेवटीं तो कार्यक्रम आम्हांस अशा रीतीनें दप्तरीं दाखल करून ठेवावयाचा होता कीं, परकीय सत्ताधारी पुरुषांना किंवा आमच्या घरभेद्यांना त्याला बिलकुल धक्का लावतां येऊं नये, किंवा त्यांतील उद्दिष्ट हेतूपेक्षां भलताच अर्थ त्यांत उत्पन्न करितां येऊं नये.

आतां, आपण आपल्या पूर्व स्थितीकडे थोडेंसें अवलोकन करूं. ज्या वेळीं आपण हें राष्ट्रकार्य मुंबापुरींत प्रथमतः हातीं घेतलें, त्यावेळीं आपली संख्या ८० पेक्षांही कमी होती. त्या वेळीं आम्हांस हिंदुस्थानांतील लोकांमध्यें धर्मसंबंधीं व जातीसंबंधीं जें द्वैतभाव आणि जी मत्सरबुद्धि वास करीत होती तिचा होईल तितका नाश करून राष्ट्रीयऐक्याची वृद्धि करण्याचा प्रयत्न करावयाचा होता. ही पहिल्या राष्ट्रसभेची स्थिति झाली.

आतां दुसरी राष्ट्रीयसभा **कलकत्ता** येथें भरली. त्या वेळेस आपले महा विद्वान् आणि प्राक्कालीन विषयशोधपनटु **डा. राजेंद्रलाल मित्र** ह्यांनीं मोठ्या आनंदानें असे उद्गार काढिले कीं, जें आमचें राष्ट्र भिन्नभिन्न जातींच्या योगानें अगदीं विभागून गेलें होतें, तें एकत्र होणें म्हणजे केवळ स्वप्नवत् वाटत असे; पण हें स्वप्न माझ्या आयुष्यांत अगदीं खरें होत चाललें आहे. नंतर, आपली तिसरी सभा **मद्रास** येथें जमली होती. त्या वेळीं **हिंदुस्थान**चा एक भाग अगदीं अंधःकारामध्यें आहे म्हणून जो आमच्यावर कलंक होता तो आह्मीं त्या वेळीं नाहींसा करून टाकिला. त्या ठिकाणीं जमलेला लोकसमूह पूर्वीपेक्षां मोठा असून त्यांत सर्व जातींचे आणि सर्व धर्मांचे लोक आले होते. एवढेंच नव्हे पण त्यांत **मुसलमानां**ची संख्या पूर्वीपेक्षां अधिक प्रमाणानें होती. त्या वेळीं त्यांची राष्ट्रसभेविषयींची भक्ति विशेष दिसून येऊन ही संस्था आपल्या नांवाला अगदीं अनुरूप अशी भासूं लागली. त्याच वेळीं ह्या संस्थेचीं मुळेंही खंबीर होऊन तीं जास्त प्रसृत होऊं लागलीं व ह्या संस्थेला खरें राष्ट्रीयत्व प्राप्त झालें, असें सिद्ध झालें. त्या सभेनें जो अभेद्य पाया घालून दिला, त्याच्याच आधारावर ह्या सभेचे पुढील समारंभ आजपर्यंत होत जाऊन त्यांचा यशचंद्र शुक्लेंदुवत् वृद्धि पावून तो उत्तम प्रकारें प्रकाशित झाला आहे असें सर्वांस वाटूं लागलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सुसंस्थापित व अत्यंत विशाल अशा राष्ट्रसभारूपी व्यूहाची योग्यता व सामर्थ्य कमी करण्याच्या उद्देशानें सर्वत्र 'राष्ट्रीयत्व' ह्या शब्दावर वादविवाद सुरू झाला होता. पण तो एक दृष्ट्या पांडित्यदर्शक होता व एक दृष्ट्या अज्ञानदर्शक होता; त्याचप्रमाणें तो चातुर्यदर्शक होता व मौर्ख्यदर्शकही होता. एक वेळ सर्वसाधारण धर्मस्वरूप हेंच राष्ट्रीयत्वोत्पादक असें समजत; एक वेळ त्यास भाषासाम्य व एक वेळ राष्ट्रांतील जातिभेद नाहींसा होऊन त्यांस रोटीव्यवहार व बेटीव्यवहार यांचा हक्क असणें अशीं, प्रत्येक वेळां निरनिराळीं कारणें दाखवीत. परंतु, हीं सर्व अविचारमूलक व कुहेतुजन्य कारणें आतां अगदीं नष्ट झालीं आहेत. कारण, त्या वेळीं एका उघडउघड गोष्टीचा कोणी विचार केला नव्हता. तो हा कीं, भाषेंतील प्रत्येक शब्द बव्हर्थी असून त्याचा एका विशिष्ट प्रसंगीं जो अर्थ युक्त दिसतो तोच इतर प्रसंगीं असमंजस व अनुपयुक्त होतो. माझ्या मतानें, **संस्कृता**मध्यें ज्या प्रमाणें सत्ताधीश राजा ह्या शब्दाला प्रजा हा शब्द सापेक्ष आहे, त्याप्रमाणेंच प्रजा ह्या शब्दास 'राष्ट्रीयत्व' हा शब्द समानार्थक घ्यावा, म्हणजे प्रजा शब्दाचे जरी अनेक अर्थ असले तरी राज्यप्रकरणीं त्याचा सरळ व सर्वमान्य जो एकच अर्थ तो ग्राह्य मानावा लागतो. त्याप्रमाणेंच 'राष्ट्रीयत्व' ह्या शब्दाचे जरी विविध अर्थ असले तरी प्रजा शब्दाशीं साम्यता पावतांना एक 'संघ' असाच अर्थ योग्य मानावा म्हणजे झालें. ह्या 'संघ' अर्थाची विशेष व्याख्या 'न्याशनल रिव्ह्यू'मध्यें एका निबंधकारानें जी केली आहे, ती येणेंप्रमाणें:—एकाच देशांतील रहिवासी,

एकाच राज्यशक्तीची आज्ञा मानणारे, एकाच कायद्याखालीं राहणारे, एकाच सत्ताधीशास करभार देणारे, आणि एकाच प्रकारच्या राज्यपद्धतीनें प्राप्त होणाऱ्या सुखदुःखाचा उपभोग घेणारे, आणि एकाच मनोवृत्तीच्या प्रवृत्तीनें सम हक्क मागण्यास आणि दुःखभार कमी होण्यास झटणारे जे लोक त्यांचा समाज. प्रथमतः आपण ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, ह्या संघरूपी वृक्षाचें मूल अशा लोकांचें बनलें आहे कीं, ज्यांनीं युगेंच्या युगें एकाच देशांत वास करून तद्देशीयत्व प्राप्त करून घेतलें आहे. त्याप्रमाणें ह्या लोकांमध्यें मूळचें स्वरूप पुष्कळ आहे, व कालभिन्नत्वामुळें कलम केलेल्या वृक्षास ज्या प्रमाणें परसंमेलन होतें त्याप्रमाणें ह्या संघवृक्षास बाह्यदेशस्थांचें संमेलन झालें आहे, आणि हे लोक जरी थोडेसे भिन्न भावानें अथवा तुटकपणानें राहत असलेले अद्यापि दिसतात, तरी ते संमेलनशक्तीनें एकच आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तेव्हां, हेंच राष्ट्रीयत्व ह्या शब्दाचें प्रमाण घेतल्यास **हिंदुस्थानां**तील सर्व लोकांत राष्ट्रीयत्व पूर्ण वास करीत आहे, हें सिद्ध होतें. आतां, हें लक्षणच जर मान्य केलें नाहीं तर मग सृष्टीतलावरील कोणत्याही राष्ट्रास एक राष्ट्रीयत्व आहे असें मुळीं मानतांच येणार नाहीं ! (टाळ्या).

सर्वसाधारण भाषा, धर्म, रोटीव्यवहार, व बेटीव्यवहार हे सर्व प्रकार हीं मोठीं महत्वाचीं साधनें आहेत. ह्या साधनांच्या योगानें सदुद्योग करण्यास सोपें जाऊन आणि सर्वसाधारण उद्देश सिद्धीस नेण्यास मोठी मदत होते हें खरें आहे. तथापि, हीं साधनेंच राष्ट्रास राष्ट्रीयत्व प्राप्त करून देण्यास अत्यावश्यक होत असें मानणें कोत्या बुद्धीचें दर्शक होय. आजपर्यंत एतत्संबंधीं प्रचलित मत बरोबर आहे असें मानून आपण चालत आलों, तसेंच आपण पुढेंही चाललें पाहिजे. कारण, ह्या मार्गाचें अवलंबन करून आज सात वर्षें झालीं नाहींत तोंच आमच्यामध्यें फार दिवसांपासून वास करीत असलेलें परस्परांविषयींचें भिन्नत्व आणि विविधधर्मपंथजनित व इतर द्वैतभाव थोडथोडा कमी होऊन, आपण सर्व **हिंदु**लोक एका कुटुंबांतील मनुष्यें आहोंत असें आपण मानूं लागलों आहों, आणि हा आपल्या राष्ट्रीयसभेचा एक उत्तम परिणाम होय. (टाळ्या.) राष्ट्रीयसभेनें ह्या संबंधानें आजपर्यंत जें काम केलें आहे तें अत्यंत अभिनंदनीय आहे, ह्यांत शंका नाहीं. आजपर्यंत राष्ट्रीयसभेच्या योगानें आपणांस जीं फळें प्राप्त झालीं आहेत, त्यांवरून मी असें भविष्य सांगतों कीं, अल्प काळामध्यें राष्ट्रीयसभेच्या योगानें आपलें बंधुत्वाचें नातें दृढ होऊन आपण सर्व अत्यंत प्रिय मित्र आहोंत असें आपणांस वाटूं लागेल !

बांधवहो, हा जरी आपणांस अदृश्य लाभ झाला आहे, तरी त्याप्रमाणें कांहीं दृश्य फायदेही झाले आहेत. हे फायदे व्यक्त करण्यास मला फारसे श्रम घेण्याचें कारण नाहीं. ज्या वेळीं आपण **मुंबई** येथें प्रथमतः एकत्र जमलों, त्या वेळीं **हिंदुस्थान** सरकारच्या मुख्य अधिकाऱ्यांनीं आपणांस एक वजनदार आणि विद्वान्

लोकांची एक मंडळी आहे, असें ह्मटलें होतें. त्याचप्रमाणें गेल्या वर्षीं जी आपली कलकत्ता येथें सभा झाली, त्या वेळीं आपल्या व्हाईसराय साहेबांनीं ही मंडळी सर्वसंमत कायदेशीर साधनांनीं, कायदेशीर काम, सर्वमान्य नियमांप्रमाणें करणारी आहे, असें उघड बोलून दाखविलें. खरोखर, व्हाईसराय साहेबांनीं इतकें मान्य केलें ही मोठी महत्वाची गोष्ट आहे. आतां, सरकारानें आपल्या सभेकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे आहे तितकें दिलें किंवा नाहीं; तसेंच इंग्लंडांतील अति मोठ्या, अति वजनदार, व अति लोकप्रिय पक्षाशीं आम्हीं साम्यता पावतों किंवा नाहीं ह्याची अद्यापि पुष्कळ शंका आहे. तरी आमच्या संबंधानें राज्यकर्त्यांचें मत बरेंच बदलूं लागलें आहे, व आह्मीं ज्या सुधारणा मागत आहोंत त्यांजकडे त्यांचें अत्यल्प लक्ष जाऊं लागलें आहे, हें आपणांस लॉर्ड क्रॉस साहेबांनीं पुढें आणलेल्या बिलावरून व्यक्त होईल. त्याचप्रमाणें एतद्देशीयांचा सिव्हिल सर्व्हिसमध्यें शिरकाव, वायव्य प्रांताकरितां स्वतंत्र कायदेकौन्सिल, कायदेकौन्सिलांतील सभासद योग्य असून त्यांची विशेष संख्या, ह्या सर्व गोष्टींबद्दल आपला जो प्रयत्न चालला आहे त्यांचें सर्व श्रेय आपणांकडेसच आहे. हीं सर्व आपल्या प्रयत्नाच्या दृश्य फलांचीं उदाहरणें होत. ह्यांबद्दल आपण अभिमान बाळगिला पाहिजे. (टाळ्या.)

परंतु, वरील सर्व आनंद मानण्यासारख्या गोष्टी असून आतां आपणांस एक दुःख-दायक गोष्ट सांगणें राहिली आहे. ती आपल्या महत्वाच्या हक्काबद्दलची होय. ती-बद्दल ह्या देशांमध्यें आपणांस गोड गोड शब्द आणि इंग्लंडामध्यें पार्लमेंट सभेपुढें येऊन पुनः अंतर्धान पावलेलें लॉर्ड क्रॉस ह्यांजें बिल, ह्यापलीकडे आपणांस कांहीं मिळालें नाहीं! आम्हीं कितीही काळपर्यंत ह्या देशामध्यें हक्क संपादन करण्याबद्दल प्रयत्न केला तरी तो यशस्वी होईलसें वाटत नाहीं; ह्याचें खरें कारण, अलहाबाद येथील राष्ट्रीयसभेचे प्रेसिडेन्ट मि. यूल यांनीं सांगितल्याप्रमाणें असें आहे कीं, "हिंदुस्थान सरकारच्या हातीं त्या संबंधानें कांहीं सत्ता नाहीं. लंडन येथील कौन्सिलासही कांहीं अधिकार नाहीं. फक्त 'हौस ऑफ कामन्स' ह्या सभेला काय तो अधिकार आहे. पण ती सभा तो अधिकार अमलांत आणण्याची हयगय करिते किंवा मुळींच नाकारिते."

यूल साहेबांच्या शेवटल्या वाक्यावरून त्यांच्या मनांत जो अर्थ सांगावयाचा होता त्यापेक्षां ज्यास्त अर्थ व्यक्त होतो ह्यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें त्यांनीं सांगितलें कीं, पार्लमेन्टचे ६५० सभासद, जे हिंदुस्थानच्या हक्काचे आणि स्वातंत्र्याचे पालक आहेत, त्यांनीं "परमेश्वरानें दिलेली जबाबदारी, त्यांस वाटेल ती व्यवस्था करण्याकरितां पुनः परमेश्वरावर परत सोंपविली आहे." ह्या त्यांच्या शब्दांवरून जो अर्थ निघतो तितका त्यांच्या मनामध्येंही नव्हता, पण ह्या वाक्यानंतर त्यांनीं लागलेंच असें स्पष्टीकरण केलें कीं, पार्लमेंटाच्या सभासदांना हिंदुस्थानासंबंधानें हवी

तितकी माहिती नसते आणि पुरेसा वेळ नसतो, त्यामुळें ह्यांच्यापुढें जे प्रश्न जातात, त्यांचा योग्य निकाल लागत नाहीं !

आतां ह्यास कोणता उपाय योजावा ? आणि तो उपाय शोधून काढून तो साध्य करून घेण्याची अवश्यकता कोणास आहे ? ह्या प्रश्नांचें उत्तर असें आहे कीं, **हिंदुस्थाना**च्या कामाकाजास अत्यंत उपयुक्त होईल इतकी माहिती **ब्रिटिश** लोकांना देणें हा वरील गोष्टीस अत्युत्तम उपाय आहे. तो उपाय शोधून काढून अमलांत आणणें हें प्रथमतः आपलें स्वतःचें कर्तव्य आहे. नंतर त्याला मान देणें हें **इंग्लंडां**तल्या विचारी लोकांचें व शेवटीं तेथील प्रतिनिधींचें कर्तव्य आहे. हें आमचें कर्तव्य करण्याचा आम्हीं अंशतः प्रयत्न केला आहे. '**ब्रिटिश** कांग्रेस कमिटी ' म्हणून जी **लंडन**मध्यें उदार व कळकळीच्या गृहस्थांची एक मंडळी संस्थापित झाली आहे, ती आमच्या ह्या प्रयत्नाचें द्वार होय. ह्या संस्थेचे सर्व सभासद आमच्याकरितां निरिच्छ बुद्धीनें झटत असून, **डिग्बी**सारखे हुशार गृहस्थ तिचे चिटणीस आहेत. **डिग्बी** साहेबांचे, **हिंदुस्थाना**संबंधानें भरपूर माहिती मिळवून वेळच्यावेळीं चाललेले निष्ठावंत प्रयत्न पाहून, **इंग्लंडां**तील आमच्या मित्रवर्गास अत्यंत आनंद वाटत आहे, व ते त्याबद्दल **डिग्बी** साहेबांचें अभिनंदन करीत आहेत. व जे आमचे शत्रु **इंग्लंडां**तील गैर माहित लोकांना, **हिंदुस्थाना**संबंधानें असत्य व निराधार गोष्टी सांगून आपणांस मोठे कृतकृत्य समजतात, त्यांना **डिग्बी** साहेबांचे हे प्रयत्न अवलोकन करून, हृदयस्थानांत विषदिग्ध शर प्रवेश झाल्याप्रमाणें दुःख होत आहे! तात्पर्य, **डिग्बी** साहेब व **ब्रिटिश** कांग्रेस कामिटीचे इतर सभासद ह्यांच्यासारखे हुशार, निरपेक्ष आणि परोपकाररत असे सत्पुरुष आमच्या हितकृत्यास हातभार लावण्यास कधींही मिळणार नाहींत, आणि त्यांनीं आपल्या बहुमोल वेळांतील अनेक स्वकार्यें एकीकडे सारून आमच्याकरितां जे परिश्रम करून यश संपादन केलें तसें यशही दुसऱ्या कोणास कधींही मिळणार नाहीं! ह्या गोष्टी मीं आपल्या शब्दांनीं सांगितल्या पाहिजेत असें नाहीं. अशा महोदार पुरुषांची संख्या पुष्कळ वाढत जाईल अशीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत, आणि आमचें जें कर्तव्य आहे, तें जर आम्हीं केलें तर ह्या मंडळीचें आपणांस चांगलें पाठबळ मिळून त्यांचा आपणांस चांगला उपयोग होईल ह्यांत शंका नाहीं.

पार्लमेन्ट सभेमध्यें **ब्रिटिश** लोकांच्या नैसर्गिक औदार्यानें " इंडियन पार्टी " ह्मणजे **हिंदुस्थाना**चा पक्ष घेणारी मंडळी ह्मणून एक नवीन मंडळी संस्थापित झाली आहे. **मि० चार्लस् ब्राडला** हें ह्या मंडळीचें दिव्य शिरोरत्न होतें. पण निर्दय काळानें त्या अमल्य रत्नाचा स्वाहा केल्यामुळें तिचें कोंदण अद्यापि रिकामें पडलें आहे. तें कोंदण आतां नूतन रत्नानें युक्त करणें, आणि त्या संस्थेला आपल्या बहु संख्येनें आणि महत्वानें उत्तम प्रकारचें पाठबळ देणें, हें सर्वस्वी आपल्यावरच अवलंबून

आहे. तें काम आपण केलें तर बरें, नाहींपेक्षां आजपर्यंत झालेला प्रयत्न व्यर्थ होऊन, ब्राडला नव्हते, कांग्रेस नव्हती, व रिपन नव्हते, त्या अज्ञान तमोमय २५ वर्षांमागील स्थितीमध्यें पुनः गेल्यासारखें होईल. ( टाळ्या. )

इंग्लंडांतील 'ब्रिटिश कांग्रेस कमिटीचा' आपणांस कळकळीचा व सुविचारयुक्त असा उपदेश आहे कीं, आपल्या कामाचें आदिस्थान आतां लंडन हेंच करावें. पार्लमेंटांतील हिंदुस्थानच्या वतीच्या मंडळीचेंही असचें मत आहे. त्याचप्रमाणें विलायतेमध्यें आपल्या देशांतून गेलेल्या प्रतिनिधिमंडळीचाही तोच मनोदय आहे. आतां ह्या गोष्टीच्या उपयुक्ततेबद्दल जर कोणांस शंका येत असेल तर त्यांनीं, लॉर्ड डफरिन साहेबांनीं प्रत्यक्ष कायदेकौन्सिलांत निवडणुकीचें तत्व घालावें अशी शिफारस केली, व त्यावर पुनः लॉर्ड क्रॉस साहेबांनीं तोंडमिळवणी करण्याकरितां एक बिल आणिलें पण ह्या सर्वांचा परिणाम शून्यवत् झाला, ह्या गोष्टींचा विचार केला ह्मणजे त्यांची ती शंका दूर होईल. शिवाय लॉर्ड डफरिनसारख्या चतुर मुत्सद्यांच्या सूचनेस जर अशा रीतीनें वाटाण्याच्या अक्षता लागतात, तर मग प्रस्तुतचे व्हाईसराय ( ह्यांनीं आपल्या सभेस कायदेशीर काम करणाऱ्या मंडळीची सभा म्हणून म्हटलें आहे. ) किंवा त्यांच्यामागून येणारे दुसरे व्हाईसराय अशा प्रकारची शिफारस करून आपला अपमान करून घेण्यास तत्पर होतील, ही आशाच करणें नको !! तेव्हां ह्या सर्व गोष्टींवरून असें सिद्ध होतें कीं, आपल्या उद्देशाचें आंग्लजनांस पूर्ण स्पष्टीकरण करून त्यांस आपल्या स्थितीचें सत्यज्ञान करून देण्याकरितां आपण राष्ट्रीयसभेची पताका खांद्यावर घेऊन विलायतेची यात्रा करावी, ह्मणजे त्यायोगानें आमचे निंदक जे आपल्या दुर्मुखांनीं " राजद्रोही, " " आंग्लद्वेष्टे " म्हणून आमच्यावर दुःशब्दांचा वर्षाव करितात, त्यांची अगदीं वाताहत होऊन, तसल्या दुर्गुणांचा आमच्या अंगीं लेशमात्रही गंध नाहीं हें चांगलें सिद्ध होईल. किती लोक चमत्कारिक पद्वा ! ब्रिटिश राज्यामुळें उदयास आलेले व त्याच्याच चिरस्थायीपणावर आपला प्राण ठेवणारें असे जे राष्ट्रसभेचे पुढारी, ते असा अधारमूलाचा छेद करून कधींतरी आत्मघात करतील काय ? ( टाळ्या .)

लंडन येथें राष्ट्रीयसभा भरविण्याचा विचार आपणांस बंद ठेवून किंवा लांबणीवर टाकून अगदीं उपयोग नाहीं. ह्याकरितां माझी आपणांस अशी सविनय विनंति आहे कीं, आपण ह्या गोष्टीचा नीट विचार करून शेवटीं जें योग्य कर्तव्य करावयाचा आपला निर्णय होईल तें मोठ्या बाण्यानें सिद्धीस नेण्याचा निश्चय करा. ह्या संबंधानें दुसऱ्या कांहीं महत्वाच्या अडचणी नाहींत असें माझें ह्मणणें नाहीं. ह्यास जातिबहिष्काराची एक मोठी अडचण आहे, व ती नुसत्या वाक्पांडित्यानें दूर होणारी नव्हे, तिच्याबद्दल आपणांस चांगला विचारच केला पाहिजे.

परदेशगमनासंबंधानें प्राचीन काळीं प्रस्तुतपेक्षां कडक निर्बंध होते कीं काय ? ह्या गोष्टीचें शांतपणानें व विकाररहित चित्तानें शोधन केलें पाहिजे. त्याचप्रमाणें पूर्वी जे प्रदेश स्मृतीच्या आज्ञेप्रमाणें **आर्यांस** गमनवर्ज्य होते तेच पुढें कालांतरानें गमनयोग्य झाले कीं काय ? समुद्रपर्यटणासंबंधानें **उत्तर हिंदुस्थान** व **दक्षिण हिंदुस्थान** ह्यांच्यामध्यें भेद मानला जात नसून, जेथें रूढि होती तेथें ते हिंदुधर्माविरुद्ध मानले जात नव्हते कीं काय ? इत्यादि गोष्टींचा विचार केला पाहिजे. तसेंच, पुढील गोष्टीचाही विचार करणें फार महत्वाचें आहे. जगामध्यें राहून ज्या गृहस्थाश्रमी मनुष्यास राजकीय किंवा सामाजिक सुधारणा करण्याबद्दल प्रयत्न करणें अवश्य आहे, त्यास स्मृतीची आज्ञा सर्वथैव पाळणें दुरापस्त आहे. तेव्हां, त्याला त्या बाबतींत थोडीशी सवलत मिळेल कीं नाहीं ? कारण, संसारास वंदन करून निघालेल्या चतुर्थाश्रमी मनुष्यास राजकीय आणि सामाजिक गोष्टींत पडण्याचें मुळींच प्रयोजन नसून त्यास फक्त परमार्थाचीच कांस धरावी लागते. तेव्हां, त्यास स्मृतीचीं बंधनें असून नसून सारखींच होत. पण गृहस्थाचें तसें नाहीं.

ह्या वरील गोष्टींचा विचार करून जर आपण आपल्याला योग्य दिसेल त्या अनुकूल पक्षानें वागलों. तर तें आपणास मोठें भूषणास्पद होईल. आणि असें वागण्यांत जर आपल्या आप्तस्वकियांनीं आपला त्याग केला व बहिष्कृत केलें तरी हरकत नाहीं, कारण त्या योगानें आपण आपल्या देशाचें व खुद्द आपणावर बहिष्कार टाकणारांचेंच कल्याण करण्यास झटलों असें होऊन आपली अत्यंत कीर्ति होईल. परंतु अशा प्रकारचा समाजछल व जातिबहिष्कार फार दिवस टिकत नाहीं. आपण योजिलेलें कार्य अत्यंत न्याय्य व पवित्र आहे. आपल्या कार्याचीं मूलतत्वें आणि कृतिपद्धति एकनिष्ठ व सत्य आहेत, आणि लोककल्याण करण्याचे प्रसंग आपणांस अनंत आहेत, त्यामुळें आमचे दुष्ट शत्रुदेखील कालांतरानें आम्हांस मित्र मानूं लागतील, व बंधुजन आम्हांस आमचे सामाजिक हक्क पुनः परत देऊन आह्मांस मोठ्या आनंदानें आपल्यामध्यें घेतील गत गोष्टींच्या उदाहरणावरून माझा असा पक्का ग्रह होऊन चुकला आहे. तथापि, अनिष्ट प्रसंग जर अशा लोकांवर आलाच तर हिंदुधर्माच्या तत्वास अनुसरून मग राष्ट्रसभाभक्तांची एक निराळी जातच होईल, व मग ह्या बहिष्काराच्या योगानें त्या जातीस जास्त बळकटी येऊन ती जास्त हितकारक होईल. असें झाल्यास दिवसानुदिवस वृद्धि पावत जाणाऱ्या ऐक्याचें विस्तारशील रूप दृष्टीस पडेल. व शेवटीं सर्वांस असें दिसून येईल कीं, ह्या सामाजिक ऐक्यानें सर्वांचें ऐहिक व पारमार्थिक कल्याणच होणार आहे. ( टाळ्या. )

**लंडन** येथें सभा भरविण्यांत आपणांस यश येऊन कायदेकौन्सिलामध्यें आपले लोकनियुक्त सभासद घेण्याची योजना झाली तर त्या योगानें खऱ्या सुधारणेस अप्रत्यक्ष रीतीनें चांगली मदत होणार आहे. प्रस्तुत नष्टप्राय झालेले जे कायदे आहेत, व ज्यांचा लोकांना भीति दाखविण्यापलीकडे कांहीं उपयोग नाहीं, असे कायदे लोकनियुक्त सभासदांच्या

योगानें सुधारले जातील. कारण, तशा कायद्यांत हात घालण्यास सरकारास भीति वाटते, व त्यांच्या अनुयायी सभासदांना त्याबद्दल "होस होय" ठोकून द्यावा लागतो. त्यांतून सरकारानें किंवा त्यांच्या उपकारबद्ध सभासदांनीं त्या बाबतींत थोडासा आपला वर्तनक्रम बदलला तर त्यांना लोकप्रियतेस मुकावें लागून तीक्ष्ण निंदा-प्रहार सहन करावे लागतात. कारण, थोड्याशा लोकांना एकच हलकल्लोळ करून देऊन सर्व समाज तद्विरुद्ध आहे असें तेव्हांच दाखवितां येतें. प्रस्तुतच्या स्थितिमानावरून कोणत्याही गोष्टीस लोकमत अनुकूल आहे कीं प्रतिकूल आहे, हें समजणें फार कठीण आहे. वर्तमानपत्रें नेहमीं अनिश्चयात्मक लेख लिहितात, आणि कोणत्याही गोष्टीचा निर्णय करण्याकरितां जर कमिशन नेमिलें तर त्याला फार वेळ नसल्यामुळें व पुष्कळ साक्षी घेण्याचें अशक्य असल्यामुळें त्याच्या हातूनही व्हावा तसा निकाल होत नाहीं. तेव्हां, आह्मी ह्मणतों त्याप्रमाणें जर कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त प्रतिनिधींची योजना झाली, तर मग हा घोटाळा मुळींच राहणार नाहीं. कारण, अशा लोकनियुक्त सभासदांना मग लोकमतानुकूल्य पाहून वागणें भाग पडेल. व तसें झालें ह्मणजे, साहजिकच कोणत्याही कायद्यासंबंधानें बहुमत अनुकूल वा प्रतिकूल आहे हें चांगल्या रीतीनें सिद्ध होऊन सरकारास त्याप्रमाणें बहुमतसंमत कायदे करण्यास ठीक पडेल, व त्या योगानें तें लोकांच्या दोषारोपांतून मुक्त होईल.

**लंडन** येथें कांग्रेस भरविण्याचा विचार कसाही होवो, परंतु **हिंदुस्थानां**तील लोकांच्या अंतःकरणांत राष्ट्रीयसभेची माहिती पूर्ण ठसविली पाहिजे. व त्याबद्दल आपणांस पुष्कळ खटपट केली पाहिजे. अद्यापि, आपणांस तत्संबंधानें पुष्कळ गोष्टी करावयाच्या आहेत. आपल्या प्रयत्नांस नुकतेंच कोठेंसें यश येत जाऊन फक्त लोकांची उत्साहबुद्धि थोडीथोडी जागृत होऊं लागली आहे. तरी, आम्ही जे काय प्रयत्न करितों ते वरकरणी असतात, असें लोकांचें प्रचलित मत आहे. ह्याकरितां आपल्या राष्ट्रांतील सर्व लोकांस राष्ट्रीयसभेचे निस्सीम भक्त बनविले पाहिजे. **पाश्चिमात्य** ज्ञानानें उच्चप्रतीच्या लोकांच्या अंतःकरणांतील अज्ञानांधकार आतां नष्ट झाला आहे. त्याचप्रमाणें त्या ज्ञानाचा प्रकाश खालच्या प्रतीच्या लोकांच्या हृदयांत चमकूं लागला पाहिजे. तें काम सर्वस्वी आपल्यावर अवलंबून आहे. आपण आतां सर्व लोकांस असें खात्रीपूर्वक सांगितलें पाहिजे कीं, **इंग्रज** सरकारचें राज्य हें आतां परक्या लोकांचें आहे असें मुळींच नसून पूर्वींचे **क्षत्रिय** राजे तेच आतांचे **ब्रिटिश** सरकार होय. खरोखर असें लोकांना सांगणें हें आपलें अत्यंत पवित्र असें कर्तव्य आहे

( टाळ्यांचा गजर. )

असो आपण अशा रीतीनें राजकीय गोष्टीचा विचार करावयास लागलों म्हणजे, ज्या लोकांना पूर्वी कधीं असा प्रयत्न करण्याची दिशा माहित नव्हती, ते आह्मांस कांहींतरी व्यर्थ काथ्याकूट करितात, म्हणून दोष देतील, पण तिकडे आपण बिलकुल लक्ष देऊं नये.

कारण, इंग्लंडची प्रजा ह्या नात्यानें आपला जो योग्य हक्क असेल तो आपण संपादन करणें आणि आपल्या देशबांधवांना प्रचंड **महाभारतांत** वर्णिलेल्या प्राचीन हक्कांचा लाभ करून देणें हें आपलें कर्तव्यच आहे. ( टाळ्या.)

इतकें भाषण झाल्यानंतर **रा० ब० आनंदाचार्लू** त्यांनीं, सर्व सभासदांनीं आपलें भाषण शांतपणानें व स्वस्थ चित्तानें श्रवण केलें ह्याबद्दल त्यांचे फार आभार मानिले, व आभार मानितांना त्यांनीं मोठ्या चटकदार शब्दांनीं असें सांगितलें कीं, " जे हक्क युद्ध करून संपादन करावयाचे ते आपण आज शांतपणानें संपादन करीत आहोंत. तेव्हां ते कमी महत्वाचे आहेत, असें मुळींच नाहीं. " शांततादेवीच्या प्रसादानें प्राप्त झालेली विजयश्री कमी महत्वाची नसते " ही कविवाणी अगदीं सत्य आहे. तेव्हां त्याप्रमाणें शांततेनें विजय संपादन करण्याची रणभूमि हा राष्ट्रीयसभेचा भव्य मंडपच होय, असें समजून

"For freedom's battle once begun,
Though baffled oft, is ever won."

ह्या कव्योक्तीप्रमाणें आपण विजयाची आशा करावी " हे शब्द **रा. ब. आनंदाचार्लूंच्या** मुखांतून बाहेर पडतांच सर्वांस यशोवैभव प्राप्तीची महदाशा उत्पन्न होऊन त्यांचीं अंतःकरणें उत्साहानें भरून गेलीं. त्या वेळीं वक्त्याच्या मुखांतून स्वकर्तव्यश्रेष्ठत्वप्रदर्शनार्थ निघालेले शेवटचे उद्गार श्रोत्यांच्या अंतःकरणांत पूर्ण ठसले जाऊन आनंदभरानें त्यांस डुलवूं लागले. म्हणजे शब्दश्रवणानें मनावर जो ठसा उत्पन्न व्हावयाचा तो अंतःकरणामध्यें उत्पन्न झालेल्या यशसूचक महदाशेनें अगोदरच उत्पन्न केला. इतक्यांत, अध्यक्षांचें भाषण समाप्त होऊन ते व्याख्यानपिठावरून खालीं उतरले, आणि स्वस्थानाप्रत आले.

**रा० ब० आनंदाचार्लू** यांचें भाषण संपल्यानंतर, टाळ्यांचा अति मोठा गजर होत आहे, तोंच ते अध्यक्षाकरितां मध्यंतरीं ठेविलेल्या रौप्यासनावर येऊन विराजित झाले. त्यावेळीं सभा मंडपाची रंगभूमि फारच शोभिवंत दिसूं लागली. व तेथें सर्व इलाख्यांतील स्वदेशहितचिंतक लोकाग्रणी एकत्र स्थित झालेले पाहून मोठें समाधान वाटूं लागलें. सर्वांच्यामध्यें अध्यक्ष **रा० ब० आनंदाचार्लू** यांची लहानशी मूर्ति असून त्यांच्या उजव्या बाजूस व डाव्या बाजूस अनुक्रमें **मि० नारायण स्वामी** व **ह्यूम** हे बसले होते. **ह्यूम** साहेबांच्या डाव्या बाजूस **पंडित अयोध्यानाथ** हे असून त्यांच्या जवळच **डब्ल्यू. सी. बानर्जी** व **रा० सा० देवराव विनायक** व त्यांच्या सन्निध **जे. घोसल** हे बसले होते. **नारायण स्वामींच्या** उजव्या बाजूस **फेरोजशाहा मेथा, वाचा, रा० मुधोळकर, सुरेंद्रनाथ बानर्जी** व **कालिचरण बानर्जी** हे बसले होते. तात्पर्य, हा राष्ट्रीयसभेच्या प्रमुख भक्तांचा सुंदर समूह जो तो प्रमाणें अवलोकन करीत आहे तोंच, **मि० अबदुल आझिज** नामक

**मुसलमान** गृहस्थ व्याख्यानपीठावर जाऊन उभे राहिले, आणि त्यांनीं आपल्या गंभीर वाणीनें अध्यक्षांच्या भाषणांचा सारांश **उर्दु** भाषेमध्यें निवेदन केला.

**मि० आझिज** हे व्याख्यानपीठावरून स्वस्थानीं आले नाहींत तोंच अध्यक्षांच्या जवळच प्रसिद्ध वाचस्पति **बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी** हे उठून उभे राहिले. त्यांची प्रसन्न मूर्ति दृष्टीस पडतांच सर्व सभामंडप आनंदप्रदर्शक टाळ्यांच्या गुरु गर्जनेनें अगदीं दणाणून गेला. **बाबू सुरेंद्रनाथ** ह्यांचें भाषण ऐकण्यास प्रत्येक गृहस्थ अगदीं उत्सुक झाला होता. ह्याचें कारण, त्यांची वाणी रसाळ, आणि भाषणशैली अप्रतिम हें तर खरेंच, पण मध्यंतरीच हे कोणत्या विषयावर भाषण करणार हें जाणण्याची प्रत्येकास विशेष उत्कंठा झाली. कारण, प्रथम दिवशीं फक्त स्वागतमंडळींचे अध्यक्ष व राष्ट्रीय-सभेचे अध्यक्ष यांचींच भाषणें होतात, व नंतर विषय नेमण्याकरितां एक मंडळी नेमून पहिल्या दिवसाचें काम समाप्त होतें. पण ज्या अर्थी **बाबू सुरेंद्रनाथ** हे भाषण करावयास उठले आहेत, त्या अर्थीं चालू वर्षाच्या सभेमध्यें कांहीं तरी नवीन व अति महत्वाचा विषय आला आहे कीं काय ? असें प्रत्येकास वाटूं लागलें. तो विषयही पण अत्यंत महत्वाचा किंबहुना सर्व विषयांचा जनक असा असल्यामुळें त्यावर भाषण करण्यास **सुरेंद्रनाथा**सारखे वाग्विशारद गृहस्थच अवश्य व योग्य होते. तेव्हां, असा महत्वाचा विषय कोणता, हें समजण्याची आमच्या वाचकांस देखील उत्कंठा झाली असेल, मग प्रतिनिधींची गोष्ट तर सांगावयासच नको ! तो विषय

## राष्ट्रीयसभा कायम ठेवावी कीं नाहीं ?

हा होय. ह्या विषयाचा विचार करण्याकरितां एक मंडळी नेमावी, ही सूचना करण्याकरितां **बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी** हे उठले होते. ह्यांचा चेहरा त्या वेळीं मोठा चिंताग्रस्त झाला आहे, असें वाटत होतें, आणि एकसमयावच्छेदेंकरून त्यावर नैराश्य आणि औत्सुक्य ह्या दोन विकारांची लीला चालली आहे, असें भासत होतें.

**सुरेंद्रनाथ** हे मोठ्या आवेशयुक्त, सप्रेम आणि जोरदार वाणीनें म्हणाले:— " स्वदेशबांधवहो, अध्यक्ष साहेबांच्या सूचनेवरून आपल्यापुढें मी असा एक ठराव विचार करण्याकरितां आणला आहे कीं, **इंग्लंड** येथें राष्ट्रीयसभा होईपर्यंत **हिंदुस्थाना**मध्यें राष्ट्रीयसभा भरवावी कीं नाहीं ? ह्या गोष्टीचा निर्णय करण्याकरितां एक मंडळी नेमावी, व त्या मंडळीनें ह्या गोष्टीचा निकाल ता० ३० पर्यंत सभेस सादर करावा. हा ठराव जरी दिसण्यांत विशेष नाहीं तरी विचारांतीं तो अत्यंत महत्वाचा आहे. ह्यामध्यें आह्मी राष्ट्रीयसभा बंद ठेवितों किंवा नाहीं असा कोणत्याही प्रकारें निश्चय झाला नाहीं, तरी आमचे शत्रु आनंदानें राष्ट्रीयसभा बंद होणार ह्मणून थै थै नाचूं लागले आहेत. ( टाळ्या. ) आमची राष्ट्रीयसभा सतत चालणार किंवा आजच निजधामास जाणार ह्या गोष्टीचा

निकाल करणें जरी माझ्याकडे नाहीं, तरी त्याबद्दल दोन शब्द आपल्यापुढें ठेवणें हें माझें कर्तव्य आहे. मित्रहो, राष्ट्रीयसभा कांहीं दिवस बंद ठेवावी अशी सूचना मात्र बाहेर पडली, तों आमच्या शत्रूंच्या गोटामध्यें जयजयकार होऊं लागला! राष्ट्रीयसभेच्या समाप्तीस प्रारंभ झाला म्हणून ते अत्यानंदानें टाळ्या वाजवूं लागले, आणि राष्ट्रीयसभेची इतिश्री होणार म्हणून एकच कोलाहल करूं लागले! ( टाळ्या. ) काय ! आमच्या राष्ट्रीयसभेच्या समाप्तीचा प्रारंभ आणि राष्ट्रीयसभेचा परित्याग! (The begining of the end, the abandonment of the Congress!) छे! अशी गोष्ट कालत्रयीं होणार नाहीं ! आह्मी आपले प्राणाचा त्याग करूं, पण राष्ट्रीयसभेस कधींही सोडणार नाहीं ! ! ( टाळ्यांचा फार मोठा गजर. ) ईश्वरीहक्कानें आह्मांस जें काय प्राप्त करून घ्यावयाचें आहे, तें मिळे तोंपर्यंत आह्मी राष्ट्रीयसभेचें निशाण कधींही खालीं ठेवणार नाहीं! असो. आपला असा दृढ निश्चय असतां आपणांवर असा प्रसंग कां आला? याही गोष्टीचा विचार आपणांस केला पाहिजे. मित्रहो, मोठ्या दुःखाची गोष्ट ही कीं, राष्ट्रीयसभेच्या खजिन्याची स्थिति फार शोचनीय आहे. राष्ट्रीयसभा बंद ठेवावी ही गोष्ट बाहेर पडण्यास तिचा खर्च निभत नाहीं, हें कारण मुख्य आहे. पण ह्यांत मुळींच अर्थ नाहीं असें मी समजतों. मला मुंबईच्या राष्ट्रीयसभेचें अद्यापि चांगलें स्मरण होत आहे. त्या वेळीं आपण सभेच्या मंडपामध्यें, जागच्या जागीं ६३.००० पेक्षां ज्यास्त रुपये वर्गणी देण्याचें कबूल केलें होतें. त्या वेळीं राष्ट्रीयसभेसंबंधीं आपण जो उत्साह आणि जें प्रेम दाखविलें, तें आतां नाहींसें झालें, असें समजावयाचें काय ? सन १८८९ सालीं जे राष्ट्रीयसभेचे अभिमानी पुरुष होते, ते सन १८९१ सालीं आतां येथें जमलेले नव्हेत काय? ( "नाहीं! नाहीं!! १८८९ सालचेच सर्व प्रतिनिधी आह्मी आहोंत!" असे सर्व सभामंडपांतून शब्द निघाले.) मित्र हो, आपण हेंच उत्तर देणार ही माझी पक्की खात्री होती. आपल्याकडून असें उत्साहभरित उत्तर मिळावें म्हणूनच मी आपणास त्या गोष्टीचें स्मरण दिलें ! ( टाळ्या. ) लंडन येथील राष्ट्रीयसभा ही आमच्या सर्व आशांचा आणि सर्व उमेदीचा बीजांकुर आहे. त्या अंकुरास पल्लव फुटून तो फलद्रुप होईपर्यंत आपण आपला उत्साह, आपली कळकळ, आणि आपला प्रयत्न जो एकदां सुरू केला आहे, तो शेवटपर्यंत सारखा कायम ठेवला पाहिजे. राष्ट्रीयसभेच्या चिरायुत्वासंबंधानें जर कोणी विवाद करूं लागलें, तर आपण सर्व राष्ट्रीयसभा कधींही बंद करावयाची नाहीं, म्हणून आपलें जोरदार मत यालच द्याल; एवढेंच नव्हे पण तिच्याप्रीत्यर्थ आपल्या पैशाच्या पिशव्या खुल्या करून कायावाचामनेंकरून झटाल. आणि ह्या राष्ट्रीयसभेपासून आपल्या पुत्रपौत्रांस अलभ्य लाभ करून द्याल, अशी माझी पूर्ण आशा व खात्री आहे." ( टाळ्यांचा गजर. )

**बाबु सुरेंद्रनाथ बानर्जी** यांचें जें आवेशयुक्त व अप्रतिम भाषण झालें त्याचा सारांश वर दिग्दर्शित केलाच आहे. त्यांच्या मुखांतून जो एक एक शब्द बाहेर

पडला तो केवळ मौक्तिकतुल्य होता. त्यांनीं जेव्हां ' Abandon life, abandon Congress, ' म्हणून शब्द उच्चारिले, त्या वेळीं सर्व श्रोत्यांचीं अंतःकरणें अगदीं द्रवून गेलीं. व त्यांनीं; जरी राष्ट्रीयसभा बंद ठेवावयाची कीं काय ह्याबद्दल विचार करण्याकरितां एक २० गृहस्थांची कमेटी नेमण्याबद्दल सूचना केली, तथापि त्यांच्या भाषणानें सर्वांच्या मनावर जो ठसा उमटविला होता त्या योगानें सर्वांस ही कमिटी काय निर्णय करणार हें अगोदरच समजलें ! आणि सर्वांच्या मुखांतून " राष्ट्रीयसभा बंद होत नाहीं " असे आनंदोद्गार निघूं लागले.

**बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी** स्वस्थानापन्न झाल्यानंतर **पंडित प्राणनाथ सरस्वती** ह्यांनीं **सुरेंद्रनाथांच्या** सूचनेस अनुमोदन दिलें. नंतर, **मि. ए. ओ. ह्यूम** ह्यानीं राष्ट्रीयसभेपुढें जे विषय आणावयाचे, त्यांचा विचार करण्याकरितां जी ४० गृहस्थांची मंडळी नेमावयाची, त्यांचीं नांवें वाचून दाखविलीं. व ती सर्वानुमतें पसंत झाल्यानंतर अध्यक्षांनीं सर्व प्रतिनिधिमंडळास दुसरे दिवशीं मंडपामध्यें ११॥ वाजतां येण्याबद्दल सूचना केली, व प्रथम दिवसाचें काम संपविलें. ह्याच वेळीं **मि० सी० नारायण स्वामी नायडू** यांनीं सर्व प्रतिनिधींस रात्रीच्या ९ वाजतां मंडपामध्यें मेजवानीस येण्याबद्दल मोठ्या प्रेमभावानें पाचारण केलें. नंतर सर्व मंडळी उठून ४ वाजतां सभा बरखास्त झाली.

## प्रतिनिधींस मेजवानी.

रात्रीचे नऊ वाजून गेले. राष्ट्रीयसभेच्या मंडपासभोंवतीं लावलेले दीपस्तंभ प्रकाशित झाले. त्यामुळें त्यांची अप्रतिम शोभा दिसूं लागली. सभामंडपामध्यें तर फारच सुरेख रोषनाई केली होती. हंड्या व झुंबरें, ह्यांमधील विविध रंगांच्या प्रकाशलहरी मंडपासभोंवतीं असलेल्या तोयजडित झालरींवर व सुवर्णपत्रजडित कमानींवर परावर्तन पावून प्रेक्षकांचे नेत्र दिपवूं लागल्या. ह्या प्रकाशाच्या अंदोलनानें सभास्तंभांच्या शिरोभागीं विराजित केलेल्या तसबिरी विशेष तेजस्वी दिसून आपलें प्रसन्नमुख डोलवीत आहेत, असें वाटूं लागलें. आणि खरोखर **महाराणी चक्रवर्तिनी व्हिक्टोरिया सार्वभौमिणी** ह्यांची तसबीर तर फारच शोभिवंत दिसूं लागून त्यांचें सुहास्य मुख **हिंदु**-प्रजेची राजनिष्ठा पाहून संतुष्ट झाल्यासारखें हुबेहुब दिसूं लागलें ! असो. अशा समयीं **हिंदुस्थानांतील** सर्व प्रकारचे मुखत्यार मंडपामध्यें येऊन दाखल झाले. त्यांच्या अनंतविध पोषाखांची शोभा दीपप्रकाशानें ह्या वेळीं फारच रमणीय दिसूं लागली. सर्व मंडळी एकत्र जमून, स्वागतमंडळींच्या व्यवस्थेप्रमाणें फलाहार करण्यांत व प्रेमळ चित्तानें सर्व देशबंधूंशीं मधुर भाषणें करण्यांत अगदीं गढून गेली !! ह्या वेळचा देखावा जर राष्ट्रीयसभेच्या अरिगणानें पाहिला असता तर त्यांच्याही अंतःकरणांत प्रेमाचे

पाझर सुटले असते ! हजारों कोसांवरील स्वदेशभक्त आपल्या देशबांधवांशीं सहोदर नात्यापेक्षांही मोठ्या प्रेमानें बोलत आहेत, हें पाहून शत्रूंचीं अंतःकरणें थिजून गेलीं असतीं ! ! कोठें **मद्रासचे वीरराघव चारियर पुण्याच्या टिळकाबरोबर** बोलत आहेत; कोठें **पंडित मदनमोहन मालवीय, सभापती मुदलीयार** यांच्या बरोबर बोलत आहेत; कोठें **पंजाबचे लाला मुरलीधर,** **मध्य प्रांतांतील जबलपुरच्या नंदी** ब्यारिस्टराशीं बोलत आहेत; कोठें **पंडित अयोध्यानाथ, नारायण स्वामी**शीं बोलत आहेत; कोठें **कलकत्याचे घोसल, लखनौचे पंडित गंगाप्रसाद वर्मा** यांच्या बरोबर बोलत आहेत, असा कांहीं सर्व मंडपभर अलौकिक देखावा दृष्टीस पडत असे. तो पाहून शत्रुमंडळी खचितखचित राष्ट्रीयसभेचे मित्र झाले असते यांत शंका नाहीं ! तेव्हां, अशा अपूर्व समारंभाचें वर्णन करण्यासही कोण समर्थ आहे ! रात्रीचे ११ वाजून गेले तरी तो अप्रतिम देखावा सोडण्याची कोणासही इच्छा होईना ! त्या वेळीं सर्वांची वृत्ति कशी झाली होती, हें आम्ही **श्रीधर** कवीच्या उक्तीनें खालीं दाखल करून प्रथम दिवसाची हकीकत संपवितों:--

### ओंवी.

**सभा पाहतां संपूर्ण। विसरले अवघे भूकतहान ॥**
**मन न निघे तेथून। वर्षानुवर्षें पाहतां ॥ १ ॥**

---

## दिवस २ रा.

### (मंगळवार, ता० २९ वी डिसेंबर १८९१.)

सकाळचे ११ वाजून गेले. सर्व मंडप प्रतिनिधिमंडळ व प्रचंड प्रेक्षकसमूह यांहीं गजबजून गेला. राष्ट्रीयसभेचे प्रमुख गृहस्थ अध्यक्षासनासमीप चमकूं लागले. त्यांच्या दर्शनानें प्रमुदित होऊन सर्व सभाजन टाळ्यांच्या गजरानें स्वानंद प्रदर्शित करूं लागले. इतक्यांत, अध्यक्ष स्वस्थानापन्न होऊन सभेच्या कामास सुरुवात झाली. प्रथमतः अध्यक्षसाहेब उठून उभे राहिले, व सप्रेम शब्दांनीं म्हणाले कीं, "**इंग्लंडचे प्रधान मि. डब्ल्यु. ई. ग्लाड्स्टन** यांना आज परमेश्वरकृपेनें ८२ वें वर्ष संपून ८३ वे वर्ष लागलें आहे, तेव्हां आपण त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्त जन्मोत्सवानंद प्रदर्शित करण्याकरितां तीनदां जयजयकार करावा." हे शब्द अध्यक्षांच्या मुखांतून उद्गत होतांच सर्व प्रतिनिधिमंडळीच्या अंतःकरणांतील आनंदरसास भर येऊन तो टाळ्यांच्या घोषानें जिकडे तिकडे गच्च भरून गेला. त्या वेळीं,

ग्लाड्स्टनसाहेब हिंदुस्थानच्या लोकांचें आपल्या विषयीचें प्रेम प्रत्यक्ष अवलोकन करण्यास समर्थ झाले असते, तर खरोखर त्यांना आपण इहलोकीं कृतकृत्य झालों, असें खचित वाटलें असतें ! व राष्ट्रीयसभेच्या मंडपांतील आनंदाच्या टाळ्यांचा गुरु घोष त्यांच्या श्रवणेंद्रियांतून आजन्म दूर झाला नसता. फार काय सांगावें ? पण त्यांना दुप्पट आयुष्य प्राप्त होऊन आपण स्वर्गसुखाचा ह्या मृत्युलोकींच अनुभव घेत आहों कीं काय? असा भास झाला असता !! अमो. ग्लाड्स्टनसाहेबांच्या नांवाचा जयघोष संपला नाहीं तोंच वाग्देवतेचे कंठमणी बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी हे भाषण करण्यास उभे राहिले. त्यांनीं सभेपुढें असा ठराव आणिला कीं:–" राष्ट्रीयसभेमध्यें आजपर्यंत जे ठराव झाले आहेत, त्यांअन्वयें ह्या सभेचें असें मत आहे कीं, जोंपर्यंत हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद घेऊन त्यांना प्रत्यक्ष मत देण्याचा अधिकार देण्यांत येणार नाहीं, तोंपर्यंत हिंदुस्थानचा राज्यकारभार कधींही न्यायानें व चांगल्या रीतीनें चालणार नाहीं, व हिंदुस्थानचे लोक सुखी व संतुष्ट होणार नाहींत. ह्या करितां ग्रेट ब्रिटन व आयर्लंडच्या लोकांस, आजपर्यंत त्यांनीं हिंदुस्थानाविषयीं दाखविलेल्या सदिच्छेबद्दल प्रथम त्यांचे आभार मानून, त्यांस सविनय अशी विनंति करावी कीं, आह्मांस ह्या न्याय्य व अवश्यक हक्क देण्याचे कामीं अगदीं विलंब लावूं नये." हा ठराव वाचून दाखवून बाबू सुरेंद्रनाथ म्हणाले:—"मद्देशबांधवहो, यंदाच्या वर्षाच्या राष्ट्रीयसभेचें महत्व कांहीं विशेष प्रकारचें आहे. आपल्या राष्ट्रीयपरिषदेच्या प्रतिवार्षिक सभा कमीअधिक प्रमाणानें महत्वाच्याच असतात. परंतु, आजच्या प्रसंगाचें सभागांभीर्य, आजपर्यंत कोणत्याही प्रसंगीं दृष्ट झालें नाहीं, असें आहे. आज आपला समूह जो येथें जमला आहे, तो एका मोठ्या गृहस्थाच्या निमंत्रणावरून जमला आहे. तो गृहस्थ कोणी राजा, धर्माध्यक्ष, अथवा भविष्यवादी आहे, म्हणून त्याच्या आमंत्रणास आपण मान देऊन येथें आलों आहों, असें मुळींच नाहीं. आज आपण फक्त एका देशहितचिंतक महात्म्याच्या निमंत्रणानें येथें आलों आहों. त्या महोदार पुरुषानें आपल्या आयुष्याचा शेवटला भाग आपल्या मानलेल्या मातृभूमीस समर्पण करण्याचा निश्चय केला आहे. ( टाळ्या. ) असा सत्पुरुष कोण, हें सांगावयास नकोच. तो महात्मा हिंदुस्थानचा मित्र मि० ए. ओ. ह्यूम हा होय. ( टाळ्या. ) त्यांच्या सूचनेवरून दूरचा प्रवास करून आपण सर्व येथें जमलों आहों. आपल्या अंतःकरणांत स्वदेशहितैषिता पूर्ण वास करीत असल्यामुळें, आपल्या स्वदेशाभिमानास स्फूर्ति येऊन आजच्या प्रचंड सभेस विशेष गंभीर स्वरूप प्राप्त झालें आहे. आज आपणांस पूर्वीच्या सभांनीं पसंत केलेले ठराव सर्वांच्या संमतीनें पुनः मुक्रर करावयाचे आहेत. आपण राष्ट्रीयसभेच्या

कामाचा मागील इतिहास पाहूं गेलों तर, आपणांस असें कळून येईल कीं, राष्ट्रीयसभेनें जे जे प्रश्न हातीं घेतले, त्या योगानें सरकारच्या कृतींत बराच फेर पडत चालला आहे. म्हणजे त्या वरून राष्ट्रीयसभेनें जें काम केलें तें निष्फळ होत नसून त्यास कांहीं यशस्वी फळें येण्याचा हंगाम आला आहे, असें मानून आपण आपलें काम उत्साहानें व उमेदीनें चालविण्यास कांहीं हरकत नाहीं. पहा, आपल्या राष्ट्रीयसभेच्या प्रत्येक मागणीचा काहीं तरी विचार कसा होत आहे तो? उदाहरणार्थ, पोलीस खात्याच्या सुधारणेची गोष्ट घ्या! तो प्रश्न आमच्या राष्ट्रीयसभेनें हातीं घेऊन जेव्हां त्याची भवतिनभवति केली, तेव्हां आतां कोठेंसें सरकारचें लक्ष त्याकडे जाऊन तें त्याचा विचार करूं लागलें आहे. आपण प्राप्तीवरील करासंबंधानें तक्रार केली, त्याकडेही सरकारचें लक्ष जाऊन तो प्रश्न सध्या सरकारापुढें घाटत आहे असें मानण्यास पुष्कळ सबळ कारणें आहेत. आपण सुचविल्याप्रमाणें १,००० रुपयांखालीं ज्याची प्राप्ति असेल त्याजवळून कर घेऊं नये, असा सरकारचा रंग दिसत आहे. ( टाळ्या. ) मिठाच्या करासंबंधानेंही तीच गोष्ट! **व्हाइसराय** साहेबांनीं **कलकत्ता** येथें परवां **सेंट अन्ड्र्यू**च्या भोजनसमारंभाच्या वेळीं असें बोलून दाखविलें कीं, कर कमी करण्याचा जेव्हां प्रसंग येईल तेव्हां प्रथम मिठावरचा कर कमी करण्याचा विचार होईल. पण त्या सर्वांपेक्षां अत्यंत महत्वाचा—किंबहुना राष्ट्रीयसभावृक्षाचें मूळ असा जो कायदेकौन्सिलांतील निवडणुकीच्या तत्वाचा—प्रश्न आहे, त्यासंबंधानें कितपत यश आलें हें आपणांस सांगावयाचें अद्यापि राहिलें आहे. तथापि, त्यासही बऱ्याच अंशीं यश येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. प्रथमतः ज्या वेळीं हा कायदेकौन्सिलाच्या शुद्ध लोकनियुक्त तत्वाचा प्रश्न आम्हीं हातीं घेतला, त्या वेळीं कांहीं लोकांनीं ( अर्थात् राजपक्षीय ) आमची हंसून टर उडविली होती. परंतु, आतां तेच लोक राष्ट्रीयसभेचें म्हणणें ऐकून घेऊं लागले आहेत. **लॉर्ड डफरीन** हे एतद्वर्गीय आहेत, हें आपणास माहीत असेलच. ते राष्ट्रीयसभेचे हितचिंतक नव्हते, पण त्यांनींदेखील कांग्रेसच्या मागण्याप्रमाणें **हिंदुस्थानास** थोडेसें तरी लोकनियुक्त कायदेकौन्सिल द्यावें असें मत दिलें आहे. तेंही एक असो, पण त्यापेक्षांही आश्चर्याची गोष्ट ही कीं, **इंग्लंडांतील** ज्या कान्सरवेटीव ( राजपक्ष ) पक्षाच्या प्रधानमंडळीच्या हातांत सर्व राजसत्ता आहे, ज्यांना 'काळ्या मनुष्या' ची थट्टा करण्यांत भूषण वाटत आहे, ज्यांना बुद्धिवान् माणसांचा तिरस्कार आहे, अशांपैकीं एका बड्या गृहस्थानें, राष्ट्रीयसभेच्या मागण्यांचा ध्वनितार्थ घ्यानीं घेऊन कायदेकौन्सिलासंबंधीं एक मसुदा पार्लमेन्ट सभेपुढें आणला होता! तात्पर्य, या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे आपण आजपर्यंत जो प्रयत्न केला आहे, तो अंशतः फलद्रूप होत आहे असें समजून आनंद मानण्यास कांहीं हरकत नाहीं. ( टाळ्या. ) दिवसेंदिवस आपली चांगली सुधारणा होत चालली आहे, व राष्ट्रीयसभेच्या मागण्या सर्वमान्य होत चालल्या आहेत.

गेल्या बुधवारीं, **बंगाल** इलाख्याच्या **लेफटेनंट-गव्हरनरांनीं** असा एक ठराव प्रसिद्ध केला आहे कीं, **बंगाल** इलाख्यांतील सर्व म्युनिसिपालिट्या आपापलीं कामें चांगल्या रीतीनें बजावितात, हें पाहून सरकारास फार समाधान वाटत आहे. (टाळ्या.) प्रस्तुतचे गव्हरनर-**सर चार्लस एलियट**-ह्यांचें **बंगाल** म्युनिसिपालिट्यांसंबंधानें चांगलें मत आहे, एवढेंच नव्हे पण त्यांच्या अगोदरच्या **गव्हरनरांचें** देखील **असेंच** मत होतें. असो. ह्यावरून असें खचित सिद्ध होतें कीं, **इंग्रज** सरकारानें **हिंदुस्थानच्या** लोकांस स्थानिक स्वराज्याचा जो हक्क दिला आहे, तो ते चांगल्या रीतीनें बजावीत असून, त्यापेक्षांही जास्त महत्वाचा व न्याय्य असा जो कायदे कौन्सिलाचा हक्क तो उपभोगण्यास ते सर्वथैव पात्र झाले आहेत.

आपणांसर्वांस माहित असेल कीं, गेल्या विजयादशमीस **हिंदुस्थानच्या** दक्षिण प्रांतांत एक प्रतिनिधिमंडळ जमलें होतें. तें कोठें म्हणाल तर एका **नेटिव्ह** संस्थानांत! **ब्रिटिश** सरकारच्या अमलांतील मुलखांत नव्हे, हें लक्षांत ठेवा!! हें संस्थान **म्हैसूर** होय. आणि त्या ठिकाणीं जमलेल्या मंडळाचें नांव "**म्हैसूर** रप्रेझेंटिव असेंब्ली" हें होय. ही **म्हैसूरची** प्रजानियुक्त प्रतिनिधींची सभा उगीच कांहीं तरी चळवळ किंवा अतृप्त लोकांची उठाठेव अशापैकीं मुळींच नसून, ती एका चतुर मुत्सद्याच्या शहाणपणाचें फल आहे! खरोखर, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे कीं, **म्हैसूर** संस्थान विद्येच्या व राज्यव्यवस्थेच्या कामीं **ब्रिटिश** सरकाराप्रमाणें सुधारलेलें नसून त्याला प्रतिनिधिमंडळ असावें? राज्यव्यवस्थेमध्यें प्रत्यक्ष कसें वागावें हें सुधारलेल्या **ब्रिटिश** सरकारास शिकविण्याचा व स्वतःच्या उदाहरणानें त्यास कित्ता घालून देण्याचा प्रसंग एका **नेटिव्ह** संस्थानास यावा, हा अद्भूत चमत्कार होय"!(टाळ्या.) ह्यानंतर **बाबू सुरेंद्रनाथ** ह्यांनीं राष्ट्रीयसभेच्या मंडळींचे **विलायतेंत** काय काय प्रयत्न चालले आहेत, आणि त्यांना कितपत यश मिळण्याचा संभव आहे, ह्याचें विवेचन केलें. ते म्हणाले:- "कायदेकौन्सिलाच्या बिलासंबंधाने प्रस्तुतचें राजपक्षीय प्रधानमंडळ आमच्यांशीं लपंडावीचा खेळ खेळत आहे! ह्याचें कारण आपल्या लक्षांत आलें काय? नसल्यास मी सांगतों. सन१८९०सालीं ज्या वेळीं मी आणखी **मि. मुधोळकर विलायतेंत** गेलों होतों. त्या वेळीं **मि. ग्लाड्स्टन** ह्यांनीं असें अश्वासन दिलें होतें कीं, मी **ब्राडला** साहेबांच्या बिलाला संमति देईन. आणि जेव्हां हे शब्द त्या प्रधानमंडळींच्या कर्णीं पडले, त्या वेळीं त्यांस मोठी धास्ती पडून त्यांनीं आपण होऊन एक बिल पार्लमेन्ट सभेपुढें आणिलें! परंतु, काम झाल्याबरोबर तें बिल जसें आणलें तसेंच त्यांनीं माघारें काढून घेतलें! असा क्रम आज दोन तीन वर्षें चालला आहे!! आपण आजच्या ठरावामध्यें असें म्हटलें आहे कीं, कायदेकौन्सिलाचा अधिकार मिळाल्यावांचून **हिंदुस्थानाचा**

राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालणार नाहीं. पण मी असें विचारितों कीं, सांप्रत आपल्या देशाचा राज्यकारभार चांगला चालत आहे काय? छे! मी तर एकदम असें खात्रीनें सांगेन कीं, आपल्या देशाचा राज्यकारभार चांगल्या रीतीनें चालावा तसा मुळींच चालत नाहीं! ('सत्य' 'सत्य' हे उद्गार व टाळ्या.) ह्यावरून तुम्हीं असें समजूं नका कीं, मी सरकारी कामदारांस दोष देत आहें! त्यांच्याकडे ह्याचा कांहीं दोष नाहीं. हा सर्व त्या राज्यपद्धतीचा दोष आहे. खरोखर, ह्या असल्या वाईट राज्यपद्धतीनें इतपत तरी राज्यकारभार चांगल्या रीतीनें कसा चालला आहे? ह्याचें मला वारंवार आश्चर्य वाटतें! परंतु, त्यास एक दोन कारणें आहेत. तीं, वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्यप्रिय उदार **आंग्ल**बांधवांचा धाक हीं होत." असो. नंतर **सुरेंद्रनाथ** ह्यांनीं **हिंदुस्थाना**च्या जमाखर्चासंबंधीं कांहीं गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले, "आपल्या देशाच्या खजिन्याची स्थिति चांगली नाहीं. आपणांसर्वांस **जॉन** साहेबांची ही म्हण माहित असेल कीं, "देशाच्या उत्पन्नाची स्थिति मला सांगा म्हणजे मी लोकांची स्थिति कशी काय आहे ती सांगेन". (Tell me the state of the finances of a country, and I will tell you the state of the people.) ह्या म्हणीप्रमाणें **हिंदुस्थान**देशासंबंधानें तुम्ही काय बरें सांगाल?" इतकें बोलून **बाबू** मजकुरांनीं **हिंदुस्थान**ची उत्तरोत्तर होत असलेली निकृष्टावस्था फार शोचनीय आहे, हें मोठ्या करुण स्वरानें व्यक्त केलें; आणि **मद्रास** इलाख्यांतील दुष्काळाचें स्वरूप सांगून व **लॉर्ड वेनलॉक** ह्यांच्या 'डेव्हिल डान्स' नामक आनंदोत्सवाचा नामनिर्देश करून, दीन प्रजेच्या दुर्धर स्थितीचा व त्याबरोबर सरकारी चैनी कामदारांच्या रंगेलपणाचा देखावा थोडक्या शब्दांत श्रोत्यांच्या हृत्पटावर पूर्ण बिंबित केला, नंतर, त्यांनीं हत्यारांच्या कायद्याचा व लष्करी खात्याचा उल्लेख करून असें सिद्ध करून दाखविलें कीं, सरहद्दीच्या संरक्षणार्थ सरकारानें कोट्यावधि रुपये खर्च करून कितीही बंदोबस्त केला, तरी प्रजेस सुख देऊन त्यांचीं अंतःकरणें प्रसन्न केलीं असतां जो पक्का बंदोबस्त होईल, तसा दुसरा कशानेंही होणार नाहीं; परंतु सरकार **हिंदु**प्रजेस 'व्हॉलंटियर' सारखे योग्य हक्क देऊन संतुष्ट करीत नाहीं, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे! तथापि, **इंग्लिश**लोकांप्रमाणें, कायद्यानें व नीतीनें योग्य असें हक्क संपादण्याबद्दल आपण प्रयत्न करावा. तसा प्रयत्न करण्यास खुद्द **लंडन** येथें सभा भरविण्याचा विचार आपणांस प्रथम सिद्धीस नेला पाहिजे. त्याबद्दल आपण आपलें वचन गुंतवून बसलों आहों. तें प्रयेत्नानें परिपूर्ण करावें म्हणजे आपण यशस्वी होऊं. **बाबू सुरेंद्रनाथांची** विषयप्रतिपादनशैली अगोदर उत्तम, त्यांतून वाणी अमृत स्रवणारी, आणि सर्व श्रोतृवृंद सावधान चित्त असल्यामुळें, त्यांच्या भाषणसमाप्तीच्या वेळीं आनंदाच्या टाळ्यांचा एवढा मोठा गजर झाला कीं, त्या नादानें सर्व सभामंडप दणाणून गेला एवढेंच नव्हें, पण त्याचा

नाद तेथें व आसमंतांत बराच वेळपर्यंत दुमदुमत राहून अभ्यंतरीं कोंदून गेला, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं! **बाबू सुरेंद्रनाथ** ह्यांचें भाषण झाल्यानंतर **बंगाल्यांतील रेव्हरंड रामचंद्र बोस** नामक एक गृहस्थ त्यांच्या ठरावास अनुमोदन देण्यास उठले, व त्यांनीं आपल्या गंभीर व मधुर वाणीनें त्या ठरावाच्या समर्थनार्थ चांगलें भाषण केलें. त्यांत त्यानीं असें सांगितलें कीं, सामाजिक सुधारणेवाचून राजकीय सुधारणा अडते, असें जें कोणीं म्हणतात तें सर्वथा खरें नाहीं. मुख्यतः आपणांस राजकीय सुधारणेची विशेष अवश्यकता आहे. ती सुधारणा नसल्यामुळें आपला **हिंदुस्थान**देश अनंत संकटांचें आणि दुःखाचें वस्तिस्थान होऊन बसला आहे. ह्याकरितां राजकीय सुधारणेंतील मुख्य गोष्ट जी कायदेकौन्सिलाची सुधारणा, ती अवश्य झाली पाहिजे, म्हणजे इच्छित फल प्राप्त होईल. **बाबू रामचंद्र बोस** ह्यांच्या भाषणांत नेमस्तपणा विशेष असतो अशी ख्याति आहे. त्याप्रमाणें त्यांचें भाषण फारच नियमित व शांत विचारपरिप्लुत होतें ह्यांत शंका नाहीं. असो.

**रामचंद्र बोस** ह्यांचें भाषण झाल्यानंतर तो ठराव सर्वानुमतें कायम झाला. इतक्यांत, **कलकत्याचे मि. प्रिंगल केनेडी** हे तिसरा ठराव घेऊन सभेपुढें त्याचें विवेचन करण्याकरितां व्याख्यानपीठावर येऊन दाखल झाले. त्यांच्या भाषणाचा व तिसऱ्या ठरावाचा सारांश येणेंप्रमाणें:—"**हिंदुस्थानां**तील पांच कोटी प्रजा दिवसेंदिवस कंगाल होत जाऊन अन्नावाचून मृत्युमुखांत पडत आहे, व दिवसेंदिवस ही संख्याही वाढत चालली आहे. ही दुर्धर स्थिति प्राप्त होण्यास पुढील गोष्टी कारणीभूत होत. (अ) **हिंदुस्थाना**च्या लोकांचें राज्यकारभारांत मुळींच अंग नसणें आणि देशाच्या जमाखर्चावर एतद्देशीयांचा कांहींच दाब नसणें. (ह्याबद्दलचा उपाय दुसऱ्या ठरावांत उघड करून सांगितलाच आहे.) (ब.) लष्करी व सिव्हिल खात्यांचा व विशेषेंकरून लष्करी खात्याचा अतिजाही खर्च. (क.) आणि ज्या देशांत $\frac{9}{10}$ लोकांचा शेतकीवर चरितार्थ चालतो तेथील शेतसारा वसूल करण्याची अल्प दृष्टीची पद्धति, कीं जिच्या योगानें शेतकीस उत्तेजन न येतां निकृष्ट स्थिति मात्र प्राप्त झाली आहे. तेव्हां इतक्या गोष्टींचा बंदोबस्त करण्यास प्रथम राज्यकारभारांतील अवाढव्य खर्चाचीं सदरें रद्द केलीं पाहिजेत. प्रथमतः लष्करी खात्याचा खर्च पुष्कळ कमी करण्यास कांहीं हरकत नाहीं. 'इंपीरियल' सेनेमध्यें प्रस्तुत जे अल्प मुदतीनें **युरोपियन** शिपाई आणले जातात, त्यांची मुदत वाढवून हल्लींच्या सैन्यापैकीं कमींत कमी २०,००० शिपायांना रजा यावी, म्हणजे द्रव्याचा व्यर्थ लोट जो तिकडे वाहत चालला आहे, तो बंद होईल. त्याचप्रमाणें कमिसारियट व स्टोअर खात्यांचाही होतां होईल तितका खर्च कमी करावा. त्याचप्रमाणें ३० वर्षांपूर्वीं **ब्रिटिश** सरकारानें जमिनीचा सारा कायम करण्याबद्दल जें वचन दिलें होतें, तें पूर्ण करावें. व शेतकऱ्यांकरितां

पेढ्या स्थापन कराव्यात, म्हणजे शेतकरीवर्गाला उत्तेजन येऊन **हिंदुस्थानाची** शेतकी चांगली सुधारेल. प्रस्तुत कोठें कोठें १० किंवा १२ वर्षांची मुदत आहे, पण ती पुरेशी नाहीं ! ह्याकरितां, ह्या राष्ट्रीयसभेच्याद्वारें **ग्रेट ब्रिटन**च्या लोकांस आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं, आह्मी मागतों त्या सुधारणा अवश्य करण्याची मेहेरबानी करून हजारों हिंदुलोक मृत्युमुखीं पडत आहेत, तें बंद करावें ! " ( टाळ्यांचा गजर. )

**प्रिंगल केनेडी** ह्यांचें मनोहर भाषण झाल्यानंतर **वऱ्हाड प्रांतां**तील सुप्रसिद्ध वकील व राष्ट्रीयसभेचे निस्सीम भक्त **रा. मुधोळकर** हे तिसऱ्या ठरावास अनुमोदन देण्याकरितां व्याख्यानस्थलीं येऊन उभे राहिले. ते दृष्टीस पडतांच चोहोंकडून आनंदप्रदर्शक टाळ्यांचा गजर होऊं लागला. **मुधोळकरांनीं** प्रतिनिधींचा प्रेमपूर्वक गौरव करून फार चांगल्या रीतीन ठरावास अनुमोदन दिलें. त्यांनीं **हिंदुस्थाना**च्या गरीबीबद्दल **डा० हंटर** साहेबांच्या वचनाधारें जी माहिती सांगितली, ती ऐकून स्वदेशाच्या दुर्दैवाबद्दल प्रत्येकाचें अंतःकरण द्रवून गेलें ! **रा. मुधोळकरांचें** भाषण झाल्यानंतर **अंबाला** येथील प्रसिद्ध गृहस्थ **लाला मुरलीधर** हे भाषण करण्याकरितां आसनावर येऊन उभे राहिले. **लाला मुरलीधर** ह्यांची शुभ्र दाढी व भव्य आणि स्वाभिमानयुक्त सतेज मूर्ति अवलोकन करितांच टाळ्यांचा एकसारखा गजर सुरूं झाला. **लाला मुरलीधर** हे सामान्य गृहस्थ नसून **पंजाब** इलाख्यांतील एक अद्वितीय पुरुष आहेत. ह्यांनीं स्वदेशबांधवांकरितां अनेक वेळां सरकारी कामदारांची कानउघाडणी करण्याचा प्रयत्न करून स्वतः अनेक संकटें सोशिलीं आहेत. त्यामुळें राष्ट्रहितचिंतकांत त्यांचें नांव बरेंच वर असून तें सर्व प्रसिद्ध झालें आहे. त्यांचें भाषण **इंग्रजी**मध्यें होईल अशी पुष्कळांस आशा होती, पण त्यांचें **हिंदुस्थानी**मध्यें भाषण झाल्या कारणानें बऱ्याच—अर्थात ती भाषा न जाणणाऱ्या—लोकांचा आशाभंग झाला ! **लाला मुरलीधर** हे फार विनोदी गृहस्थ असून त्यांचें भाषण नेहमीं खुबीदार व मार्मिकतेचें असतें, अशी सर्वत्र ख्याति आहे. ते **हिंदुस्थानी**मध्यें जरी बोलले तरी सर्वांचीं मनें त्यांच्या शब्दलालित्यानें अगदीं आनंदित होऊन गेलीं. त्यांनीं विशेषतः शेतकऱ्यांच्या दारिद्र्यावस्थेचें व **हिंदुस्थाना**च्या राज्यकारभारांतील बेबंदशाही खर्चाचें जें वर्णन केलें तें इतकें चटकदार होतें कीं, त्यांच्या प्रत्येक वाक्यास सर्व श्रोतृवृंदांकडून आनंदप्रदर्शक टाळ्यांची संमति मिळत असे !

**लाला मुरलीधर** ह्यांचें भाषण समाप्त झाल्यानंतर **मुंबईचे पार्शी** गृहस्थ **मि० दिनशा एदलजी वाचा** हे त्या ठरावास अनुमोदन देण्याकरितां स्वस्थानीं उठून उभे राहिले. **मि० वाचा** हे **मुंबई**च्या पांचव्या राष्ट्रियसभेपासून सर्वप्रसिद्ध झाल्यामुळें त्यांच्या भाषणाची लालसा पुष्कळ प्रतिनिधींच्या मनांत उत्पन्न झाली होती.

त्यांचें अध्यक्षांच्या शेजारींच भाषण झालें. तें अत्यंत सुश्राव्य व साधार असें होतें. त्याचा सारांश असा होता कीं:—"हिंदुप्रजेच्या दारिद्र्याविषयीं **मि० मुधोळकर** वगैरेंनीं पुष्कळ विवेचन केलें आहे, तेव्हां त्या संबधानें मला कांहीं विशेष सांगावयाचें राहिलें आहे असें नाहीं. तथापि, ह्या सर्व दारिद्र्यावस्थेचें मुख्य कारण जमिनीवरचा सारा आणि जमिनीसंबंधीं सरकारचे कायदे हेच होत. ह्या योगानें आमची स्थिति दिवसेंदिवस निकृष्ट होत चालली आहे. पूर्वीं, शेतकऱ्यांकडून वसूल घेण्याची पद्धति धान्याच्या रूपानें होती, आणि आतां आमच्या सरकारानें रोख पैशाच्या रूपानें वसूल घेण्याची रीत काढली आहे. त्या योगानें शेतकऱ्यांस फारच त्रास होतो! जमिनीचे कायदे तर फारच जुलुमाचे आहेत, त्या योगानें शेतकरी लोक ठार होत चालले आहेत, असें **सर जेम्स केर्ड** यांचें मत आहे. अर्थात्, देशाचा मुख्य आधार जे शेतकरी लोक त्यांची अशी स्थिति झाल्यावर देश ऊर्जितावस्थेप्रत कसा पोंहचणार ? शिवाय, आपल्या देशाची दुर्धर स्थिति होण्यास लष्करी खात्यांतील अफाट खर्च हें दुसरें कारण आहे. ह्या खर्चासंबंधानें मागील सभेच्या वेळीं मी सांगितलें होतें कीं, लष्करी खर्च फारच वाढत चालला आहे. सन १८८४ सालीं जो १२ कोटी रुपये होता तो सन १८८५ सालीं १७ कोट रुपये वाढला! सन १८८५ सालीं १७ कोट होता तो आतां २२ कोटी रुपये झाला आहे!! ह्या अवाढव्य खर्चाशिवाय पुन्हां सरहद्द प्रकरणाचा खर्च, रेलवेचा खर्च, वगैरे वेगळेच! पुनः आणखी ब्रह्मदेश खालसा केला त्याचा खर्च **डफरीन** साहेबांनीं **हिंदुस्थाना**च्या डोक्यावर लादला आहेच ! तात्पर्य, खर्चाची जों जों बेरीज करावी तों तों हृदय फाटून जातें ! ! हा अवाढव्य खर्च कांहीं कमी होईल तर **हिंदुस्थाना**ची धडगत राहून राज्यकारभार सुरळीत चालेल. हा खर्च कमी करण्यास सरकारानें आपली लष्करी राजनीति थोडी एकीकडे ठेविली पाहिजे. सरकारानें सरहद्द पुढेंपुढें सारण्याचा जो क्रम मांडिला आहे तो बंद ठेवला पाहिजे. कित्येक म्हणतात कीं, सरहद्द पुढें सारणें हें देशाच्या रक्षणास अत्यंत अवश्य आहे. पण, स्वतःचें घर सोडून मुद्दाम शत्रूच्या द्वारांत कां जावें ? सरहद्दीच्या संबंधानें सरकारचें वर्तन वेडेपणाचें ( mad ) आहे, असें **मि० स्ल्याग्ज** यांनीं म्हटलें होतें. पण, मी तर असें म्हणतों कीं, ती शुद्ध वेडेपणाची सांथ (Epidemic of Lunacy) आहे ! ! ( टाळ्या. ) **प्रो० सिली** ह्यांनीं म्हटलें आहे कीं, ह्या बाबतींत सरकारचें नेहमीं असें म्हणणें पडतें कीं, " दिवाणी खात्यांतील लोकांनीं ह्या बाबतींत कांहीं बोलूं नये. " परंतु, लष्करी खात्यांतील चतुर पुरुषांनीं देखील सरहद्द प्रकरणांत सरकारास दूषणच दिलें आहे. **कर्नल मॉरिस** आणि **कर्नल ह्यूम** ह्यांनीं तर हें सरहद्द संरक्षण म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे असें म्हटलें आहे !" इतकें भाषण झाल्यानंतर **मि० वाचा** ह्यांनीं सरहद्द संरक्षणाचे जे कोट्यावधि रुपये खर्च होतात ते निव्वळ पाण्यांत टाकल्याप्रमाणें होत! अशा आशयाचीं कांहीं वजनदार लोकांचीं ब्ल्यू बुकांतील वचनें वाचून दाख-

विलीं, व शेवटीं असें सांगितलें कीं, लष्करी खात्याकडे जे ५४ कोट रुपये खर्च झाले ते जर देशाच्या खऱ्या सुधारणेच्या कामीं लागले असते, तर फार चांगलें झालें असतें! बरें, इतका खर्च करून **रशियाची** भीति न बाळगण्यासारखी सरहद्द तरी खंबीर झाली म्हणावी तर तसें कांहींच नाहीं. तेव्हां आतां ह्या गोष्टीस मुख्य उपाय लष्करी खर्च कमी करून **हिंदुलोकांच्या** संतुष्ट अंतःकरणाची खंबिरी मिळवावी हाच होय. ह्या उपायानें **इंग्लंडची** कीर्ति चिरकाल राहील व **हिंदुस्थानांतील इंग्रजी** राज्यास यावच्चंद्र दिवाकरौ स्थिरता प्राप्त होईल. ( टाळ्यांचा गजर. ) इतकें भाषण केल्यानंतर **मि० वाचा** यांनीं, **डा० पोलन** नामक एका गृहस्थानें '**रशिया** संबंधानें **इंग्लडास*** उपदेश' म्हणून जी एक सुंदर कविता केली आहे, ती वाचून दाखविली, व नंतर ते स्वस्थानीं स्थित झाले.

* ही कविता फारच उत्तम असल्यामुळें ती येथें दाखल केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं :–

Then, England pause! no friend from foe!
When, when, has Russia crossed thy path?
That She doth ever greater grow
Is this the only fault She hath?
Then callest her " a Giant Liar."
Did Briton never stoop to lie?
Is Prussia's moral standard higher?
Did Austria ever range so high?
Nay! Diplomatic lies have streamed
Since first the Tower of Babel fell,
That Diploma the best is deemed
Who dexterous falsehoods best can tell.
In truth, the " Teuton " is thy foe!
Thy rival he in every field;
His power thy court, thy councils know:
Thy commerce nought from him can shield
His Princes lead thy Daughter forth,
Dowered deep in dowers of English gold;
His merchant vessels sweep thy North;
Thy " silver streak " his worships hold.
He threatens thee on every side,
While thou dost cringe to him and yield
Surrendering to his armed pride.

**मि॰ वाचा** यांचें भाषण झाल्यानंतर **अलहाबादे**चे प्रसिद्ध राष्ट्रसभाभक्त **पंडित मदन मोहन मालवीय** हे तिसऱ्या ठरावास संमति देण्याकरितां भाषण करण्यास येऊनें उभे राहिले. त्यांचा तो शुभ्र पोषाख त्यांच्या राजनिष्ठ शुद्धांतःकरणाची जणूं साक्ष देत आहे असें प्रत्येकास वाटे. त्यांच्या स्कंधप्रदेशावर व कंठस्थानीं रुळत असलेलें उत्तरीय वस्त्र जणूं काय स्वदेशप्रेमातिशयानें उचंबळूं पाहणाऱ्या त्यांच्या शुद्ध विचारास गच्च धरून ' शांतपणानें श्रोतृवृंदाच्या सावधान चित्ताची भेट घेण्यास जा ' म्हणून प्रोत्साहन देत आहे, असें वाटे. त्यांच्या मस्तकावरील शुभ्र फेंटा राष्ट्रीयसभेच्या शुद्ध यशाची जोड करणार म्हणून आश्वासन देत आहे असाच प्रत्येकास भास होई. तेव्हां अशा पुरुषाची मूर्ति सभास्थानीं दृष्टीस पडतांच तद्दर्शनानें प्रतिनिधींचीं अंतःकरणें आनंदभरित झालीं असतील, ह्यांत आश्चर्य तें काय? खरेंच, **मदना**लाही मोहून टाकणाऱ्या मूर्तीनें सभाजनांचीं अंतःकरणें मोहून गेलीं, हें रसिकांस सांगण्याचें प्रयोजन नाहीं! असो. **पंडित मदन मोहन** यांनीं अत्यंत मनोरम भाषण करून आपल्या मधुर शब्दामृतानें सर्वांस तृप्त केलें.

---

The best of thy Colonial field ,
He stirs the Russ against thy power
Pointing to plains of Hindustan
Hoping to say the dreaded hour.
Where France well meet him, man to man,
But why should England cross to Russ ?
We both have kindred work to do !
Asia is wide ; for him , for us
There's space to spare and high aims too .
Redeem the cradle of our race ,
Let commerce cricle every where ,
Let Love regain its pride of place
Let Eden once more blossom there !
Let " Great White Tsar, " let " Great White Queen, "
Stretch forth o'er Asia's healing hands.
Touching the sere leaf into green ,
Blessing with bloom the barren lands .
England and Russia, friendly powers ;
India secure , and strong and free ,
Over the West no war cloud lowers
The East regain its Liberty.

**पंडित मदन मोहन** ह्यांचे भाषण झाल्यानंतर **नागपूर** येथील **रा० देशपांडे** व **रा० गोपाळराव भिडे** ह्या दोघां सन्मान्य गृहस्थांचीं भाषणें झालीं. **रा० देशपांडे** यांनीं जमिनीचा धारा कायम नसल्यामुळें प्रजेची कशी दीन स्थिति झाली आहे, **मध्य प्रांतांत** नवीन पहाणी होऊन जमिनीचे धारे कसकसे वाढविले आहेत, त्या योगानें **मध्य प्रांतां**मध्यें लोक कसे हवालदील होऊन गेले आहेत वगैरेबद्दल चांगलें विवेचन केलें, व विशेषतः त्यांनीं त्या संबंधानें फार महत्वाची माहिती सभेस वाचून दाखविली. **रा० गोपाळराव भिडे** यांनींही **मध्य प्रांतां**तील जमाबंदी-संबंधा थोडक्यांत सुरस भाषण केल. नंतर **मद्रासचे सभापति मुदलियार** ह्यांनीं शेतकऱ्यांच्या पेढ्यासंबंधानें वगैरे अल्प भाषण करून सभेच्या ठरावास आपलें अनुमोदन दिलें. त्यानंतर **बंगाल्यां**तील प्रसिद्ध वक्ते **रेव्हरंड कालीचरण बानर्जी** यांनीं स्वस्थानींच उभें राहून फार चटकदार भाषण केलें. त्यांनीं आपल्या भाषणांचा सारांश चार शब्दांतच सांगितला. ते शब्द ' मरण टाळून जगावें कसें ? '( From death unto life ) हे होत. हे खुबीदार शब्द ऐकतांक्षणींच सर्वांनीं आनंदयुक्त टाळ्यांचा फार मोठा गजर केला. त्यांनीं असें सांगितलें कीं, " आम्हांस जगण्याची इच्छा आहे ह्मणून आह्मी ती इच्छा शेवटास नेण्याकरितां कृपाळु **आंग्ल** सरकारची विनंति करीत आहों. आम्ही आपल्या परम प्रिय सरकारास आमचें सर्वस्व वाहून चुकलों आहों, त्याअर्थी सरकारानें आमच्या सर्वस्वाचा योग्य उपयोग करावा. अर्थात्, **हिंदु**प्रजेच्या सेवेची सरकारानें मान्यता केली म्हणजे राज्य-कारभारांतील पुष्कळ खर्च कमी होईल. खर्च कमी झाला म्हणजे प्रजा सुखी होऊन जगण्याच्या पंथास लागेल. करितां आमच्या सरकारानें राष्ट्रीयसभेनें मागित-लेल्या सर्व गोष्टी मान्य करून **हिंदु**प्रजेस जीवदान द्यावें. "

**कालीचरण बानर्जी** ह्यांचे वर सांगितलेल्या आशयाचें भाषण झाल्यानंतर तिसरा ठराव सर्वानुमतें पसंत होऊन सभेच्या चवथ्या ठरावास प्रारंभ झाला. तो ठराव घेऊन **पुण्याचे** प्रतिनिधि व कट्टे स्वदेशभक्त **रा. रा. बाळ गंगाधर टिळक** हे भाषण करण्याकरितां व्यासपीठावर येऊन दाखल झाले. स्वधर्माभिमान व स्वदेशाभिमान मिश्रित स्वातंत्र्यप्रियतेचें व राजनिष्ठेचें अपूर्व तेज एक समयावच्छेदें-करून व्यक्त करणारी ती **टिळकांची** सांवळी मूर्ति दृष्टीस पडतांच सर्व सभा-जनांनीं आनंदप्रदर्शक टाळ्यांच्या योगानें तिचें अभिनंदन केलें, असें दाखविलें.

**रा. टिळक** यांनीं जो ठराव सभेपुढें आणला, तो येणेंप्रमाणें :—" मागील राष्टसभांनीं केलेल्या ठरावाप्रमाणें ह्या सभेचें असें मत आहे कीं, देशाचें एकें संरक्षण होण्यास सरकारानें प्रथम **हिंदुस्थानां**तील लोकमतास मान देऊन **हिंदु**प्रजेस आत्मसंरक्षण आणि स्वराज्यसंरक्षण करण्यास उत्तेजन द्यावें व पात्र करावें. असें करण्यास पुढील गोष्टी सरकारानें केल्या पाहिजेत :—( अ ) **हिंदुस्थानां**-

तलि सर्व जातीच्या लोकांस हत्यारें वापरण्याकरितां कायमचे परवाने देण्याबद्दल कायद्यांत फेरफार करावा. व मनुष्यांची, जनावरांची व शेतांची नासाडी करणाऱ्या हिंस्र जनावरांना मारण्याबद्दल सढळ हातानें परवाने द्यावेत. आणि जर कोणी हत्यारांचा दुरुपयोग करील असें दिसून आल्यास त्याचा परवाना रद्द करावा. (ब) **हिंदुस्थानां**तील लोकांस लष्करी शिक्षण देण्याकरितां लष्करी शाळा स्थापन कराव्यात. आणि त्यांत कमिशण्ड व नॉनकमिशण्ड असे दोन वर्ग करून योग्यतेप्रमाणें शिक्षण द्यावें. (क) **हिंदुस्थानां**तील शूर जातीस मिलिशिया सर्व्हिस ( ह्मणजे लढाईच्या वेळेपुरती फौज ) मध्यें घ्यावें. (ड) **ग्रेट ब्रिटन**प्रमाणें सर्व **हिंदुस्थान**भर व्हालंटियर लोक तयार करण्याची पद्धति सुरू करावी. " ही सूचना करतांना **टिळ-कांनीं** आवेशयुक्त सुरस भाषण केलें. त्या भाषणामध्यें त्यांनीं **हिंदुस्थान**चे लोक शूर व इमानी आहेत, असें सिद्ध करून दाखवून त्यांना लष्करी शिक्षण देणें अति अवश्य आहे, असें प्रतिपादन केलें. शिवाय **ड्यूक ऑफ कानाट, सर जार्ज ग्रीव्हज** व **लार्ड रे**प्रभृति अनेक मोठमोठ्या लोकांचेंही मत **हिंदुस्थाना**मध्यें लष्करी कॉलेजें स्थापण्याचे कामीं अनुकूल आहे. तेव्हां सरकारानें **हिंदु**लोकांस लष्करी शिक्षण देऊन हत्यारें वापरण्याची परवानगी अत्यावश्य दिली पाहिजे, असें **रा० टिळक** ह्यांनीं अंतःकरणपूर्वक सभाजनांच्या मनावर ठसविलें. त्यामुळें प्रत्येकांस—व विशेषतः हिंस्र जनावरांचा जेथें जास्त उपद्रव आहे अशा प्रांतांतील प्रतिनिधींस—ही राष्ट्रीयसभेची विनंति कृपाळु सरकारानें अवश्य मान्य केली तर दीन प्रजेवर फार उपकार होतील, असें वाटूं लागलें.

**रा० टिळक** ह्यांचे भाषण संपल्यानंतर **मुंबईचे मुसलमान** गृहस्थ **अली महमद भिमजी** ह्यांनीं त्या ठरावास आपलें अनुमोदन दिलें व **रामचंद्र पिल्ले, सी. व्ही. नायडू** वगैरेनीं आपली अनुकूलता प्रदर्शित केली. नंतर तो ठराव सर्वानुमतें पसंत झाला.

नंतर **कलकत्याचे** प्रतिनिधि **पंडित प्राणनाथ सरस्वती** ह्यांनीं सभेपुढें पांचव्या ठरावाची सूचना आणली:—तिचा सारांश असा होता कीं, " **हिंदुस्थान**च्या लोकांचा राज्यकारभारामध्यें अवश्य शिरकाव व्हावा म्हणून व त्यांना योग्य न्याय मिळावा म्हणून सिव्हिल सर्व्हिसच्या सर्व परीक्षा **विलायतें**त होतात त्या **हिंदुस्था-ना**मध्यें घेण्याची सरकारानें मेहेरबानी करावी." **पंडित प्राणनाथ सरस्वती** हे चांगल्यापैकीं वक्ते असून त्यांनीं आपल्या भाषणाची छाप सभाजनांच्या अंतःकरणावर चांगल्या प्रकारें बसविली. त्यांनीं आपल्या अल्प भाषणांत **ईस्ट इंडिया कंपनी-**पासून तों **महाराणी साहेबां**च्या जाहिरनाम्यापर्यंत **हिंदुस्थान**च्या लोकांस समान रीतीनें वागविण्याबद्दल पुष्कळ वचनें दिलीं असून त्यांची परिपूर्णता **ब्रिटिशसर-कारा**कडून व्हावी तशी झाली नाहीं, ही गोष्ट मुख्यतः स्पष्ट करून सांगितली, व त्यांच्या

ठरावास **मि० एस्. सुबराव** यांनीं अनुमोदन दिल्यामुळें तो सर्वानुमतें पसंत करण्यांत आला.

पांचवा ठराव पसंत झाल्यानंतर अध्यक्षस्थानाजवळ नामदार **पंडित अयोध्यानाथ** हे उठून उभे राहिले. सभेच्या साहाव्या ठरावाची सूचना करण्याचें काम त्यांच्यावर सोंपविलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या आवेशयुक्त रसाळ वाणीनें साहावा ठराव सभेपुढें सादर केला. त्यामध्यें मिठावरील कर कमी करण्याबद्दल, प्राप्तीवरील कर निदान रु० १,००० उत्पन्नापर्यंत न घेण्याबद्दल, आणि सन १८९० च्या **हिंदुस्थान** सरकारचा अपकारी ठराव स्थानिक सरकारांनीं अवश्य अमलांत आणण्याबद्दल वगैरे योग्य सूचना केल्या होत्या. ह्या ठरावासंबंधानें **पंडित अयोध्यानाथ** यांनीं फारच सुरस भाषण केलें. त्यांत त्यांनीं असें सांगितलें कीं, "मिठावरील कर लहान थोरास द्यावा लागत असल्यामुळें, कोणावर त्याचें फारसें ओझें पडत नाहीं, म्हणून जी सरकारची कल्पना आहे ती अगदीं असत्य आहे. कोट्यावधि **हिंदुलोक** अन्नावांचून आपलें आयुष्याचे दिवस मोठ्या दुःखद स्थितीमध्यें कंठीत आहेत, आणि त्यांचें मुख्य जीवन जें मीठ, तेंही महाग केल्यामुळें तर त्यांचे अतिशय हाल होत आहेत. ही गोष्ट सरकारच्या लक्षांत येत नाहीं, हें मोठें दुर्दैव होय. त्याचप्रमाणें प्राप्तीवरील कराची गोष्ट. ह्या करासंबंधानें तर फार शोचनीय प्रकार घडत आहेत. जो अधिकारी, प्राप्तीवरील कराची रक्कम आपल्या जिल्ह्यांतून जास्त उत्पन्न करून देईल त्यास सरकाराकडून बढती मिळते, आणि जो तें उत्पन्न कमी करील त्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें नागदुऱ्या काढण्याची पाळी येत आहे! **मि० उइलसन** यांच्या कारकीर्दीमध्यें तर एका डेप्युटी कलेक्टरानें ह्या कराच्या बाबतींत त्यानें सरकाराचा खूप फायदा केला, म्हणून त्याची बढती करण्याबद्दल खरोखर शिफारस झाली होती!!" (**पंडितजींचे** हे निर्भीडपणाचे शब्द ऐकतांक्षणीं सर्व मंडपभर "हें सरकारास अत्यंत लांछनास्पद आहे, लांछनास्पद आहे" असा एकच शब्द होऊं लागला. व टाळ्यांचा एकसारखा गजर सुरू झाला.) नंतर **पंडितजींनीं** सभेच्या ठरावांतील शेवटला भाग गरीब लोकांच्या अत्यंत कल्याणाचा आहे, परंतु त्याबद्दल **वायव्य प्रांताच्या** सरकारानें तिकडे अगदीं दुर्लक्ष केलें आहे, असें सांगितलें. **पंडित अयोध्यानाथ** यांचें हें भाषण इतकें आवेशयुक्त, मनोहर, आणि मुद्देसूद होतें कीं, त्या योगानें सर्व प्रतिनिधीमंडळांचें व प्रेक्षकगणाचें चित्त आकर्षित होऊन तो कांहीं वेळ चित्राप्रमाणें स्तब्ध झाला. व भाषण परिसमाप्तीनंतर सर्वांच्या मुखांतून "वाहवा, वाहवा" हे आनंदोद्गार पडून टाळ्यांचा फारच मोठा गजर झाला.

**पंडित अयोध्यानाथ** यांचें भाषण झाल्यानंतर **उमरावतीचे** प्रसिद्ध वकील **रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी** यांनीं **पंडितजींच्या** ठरावास आपलें अनु-

मोदन दिलें, आणि **मुनशी शेखहुसेन वल्लद शेख चांद** ह्यांनीं उर्दु भाषेमध्यें आपली संमति दिली. **मुनशी शेख चांद** हे गृहस्थ नावाजलेले वक्ते असून त्यांचा आवाज अत्यंत मोठा आहे. त्यामुळें राष्ट्रीयसभेमारख्या मोठ्या जनसमुदायांत त्यांच्या भाषणाची फारच चहा होते. खरोखर, **शेख चांद** हे ज्या वेळीं भाषण करूं लागले, त्या वेळीं क्रुद्ध झालेल्या भयंकर व्याघ्राच्या प्रचंड गर्जनेप्रमाणे सर्व सभामंडप दणाणून गेला. त्यांचें **उर्दु** भाषेंतील अल्प भाषण फार मजेदार होऊन तज्ञ जनांचीं मनें मोहून गेलीं. नंतर तो ठराव सर्वानुमतें पसंत झाला.

नंतर **मि० पूर्णेंदु नारायणसिंग** हे राष्ट्रीयसभेपुढें सातवा ठराव घेऊन भाषण करण्यास आले. त्या ठरावाचा सारांश असा आहे कीं, "न्यायखातें व मुलकी खातें वेगळें करून दोन्हीं कामें एकाच अधिकाऱ्याकडे असूं नयेत; ज्यूरीची पद्धति चोहोंकडे सुरू करावी; ज्यूरीनें केलेला ठराव रद्द करण्याबद्दल सन १८७२ सालीं हायकोर्टास जो अधिकार मिळाला आहे तो रद्द करावा; वारंटाचे खटले आरोपीच्या इच्छेप्रमाणें म्याजिस्ट्रेटपुढें न चालतां एकदम सेशनजजाकडे चालतील असा क्रिमिनल प्रोसीजर कोड मध्यें फेरफार करावा; पोलिस खात्याची सुधारणा करून त्यांतील पुष्कळ संख्या कमी करावी व पगाराचें मान वाढवावें; चांगले लोकांची त्या खात्यांत योजना करावी, आणि डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल, सुपरिंटेंडंट आणि असिस्टंट सुपरिंटेंडंट ऑफ् पोलिस ह्या हुद्याच्या जागेवर नेटिवांशीं विशेष संबध असणाऱ्या योग्य गृहस्थांची निवड व्हावी" ह्या ठरावावर **मि०पूर्णेंदु नारायणसिंग** ह्यांचें चांगलें भाषण झालें, आणि त्यास **मि० आख्य ( अक्षय ? ) चंद्रदास** ह्यांची संमति मिळाली. **मि० अक्षय चंद्रदास** ह्यांनीं आपल्या भाषणांत पोलिसखातें बहुतकरून अशिक्षित व अयोग्य अशा **आंग्लोइंडियन** मंडळीनें भरलें आहे, व त्यांत दुसरीकडे कोठें चाकरी न मिळणाऱ्या शुद्ध उनाड लोकांचा सर्व भरणा आहे वगैरे गोष्टी अगदीं उघड करून सांगितल्या, त्यामुळें त्यांच्या सत्य भाषणाची व निर्भिडतेची सभाजनांमध्यें बरीच प्रशंसा झाली. नंतर ह्या ठरावावर अध्यक्ष **रायबहादूर आनंदाचार्लू** यांचें थोडें भाषण होऊन तो सर्वानुमतें पसंत झाला.

इतक्यांत अध्यक्षांच्या आसनापुढें उजव्या बाजूस **बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी** ह्यांच्या सारखेच वाग्देवतेचे प्रिय भक्त **बाबू हेरंबचंद्रमित्र** नामक एक **बंगाली** गृहस्थ भाषण करण्यास उठून उभे राहिले. त्यांची मूर्ति सतेज, भव्य आणि काळीसांवळी असून वाणी 'खंबीर-गंभीर' आणि बाणेदार अशी होती. त्यांनीं राष्ट्रीयसभेच्या आठव्या ठरावावर भाषण केलें. त्या ठरावाचें व त्यांच्या भाषणाचें सार असें होतें कीं, "पूर्वीच्या राष्ट्रीयसभेंतील ठरावाप्रमाणें सातव्या राष्ट्रीयसभेचे असें मत आहे कीं, विद्याखात्याचा खर्च कमी करण्याचा जो सरकारचा प्रस्तुत विचार चालला आहे तो त्यांनीं सोडून देऊन, उलट सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्थांकडे जास्त खर्च करावा, आणि

विशेषतः धंदेशिक्षणास चांगले उत्तेजन देऊन **हिंदुस्थानां**तील प्रस्तुतच्या औद्योगिक स्थितीची चवकशी करण्याकरितां एक कमिशन नेमावें" **हेरंबचंद्रमित्र** ह्यांनीं ह्या ठरावावर फारच सुरस भाषण केलें. ते म्हणाले कीं, मी आपल्या भाषणाचा सारांश चारच शब्दांत सांगतों. ते शब्द 'अज्ञानरूपी अंधःकारांतून ज्ञानरूपी प्रकाशांत येणें' हे होत ( From darkness unto light). हे त्यांचे खुबीचे चार शब्द ऐकतांक्षणींच सर्व रसिक सभाजनांस फार आनंद झाला. नंतर **हेरंबचंद्रमित्र** ह्यांनीं **हिंदुस्थानांत** लोकशिक्षणाची किती अवश्यकता आहे व त्याची सरकार कशी टाळाटाळ करीत आहे, ह्याचें थोडक्यांत उत्तम प्रतिपादन करून असें सिद्ध करून दाखविलें कीं, देशामध्यें सुशिक्षणाचा अत्यंत प्रसार करणें हेंच राज्याच्या चिरस्थायित्वाचें मुख्य साधन आहे, व **इंग्रज** सरकाराला जर आपलें राज्य चिरकालिक करावयाचें असेल तर त्यांनीं शिक्षणप्रसाराकडे विशेष लक्ष देऊन प्रजेला सज्ञान करावें आणि त्या प्रजेतून नियुक्त झालेले असे चांगले सभासद कायदेकौन्सिलांत घेण्याची तजवीज करावी, म्हणजे **इंग्रज** सरकारचें राज्य **हिंदुस्थाना**मध्यें अविचल राहून त्यांच्या सुकीर्तीचा डंका सर्व जगभर यावच्चंद्रदिवाकरौ गाजेल.

**बाबू हेरंबचंद्रमित्र** ह्यांचें भाषण झाल्यानंतर **पुणें** येथील प्रतिनिधि **प्रो० गोपाळ कृष्ण गोखले** ह्यांनीं त्या ठरावास आपलें अनुमोदन दिलें, व नंतर सर्वानुमतें तो ठराव पसंत करण्यांत आला.

ह्या समयीं ५ वाजून गेले असल्यामुळें सभेचें दुसऱ्या दिवसाचें काम समाप्त करण्यांत आलें.

---

# दिवस ३ रा.

## ( बुधवार, ता. ३० वी डिसेंबर १८९१. )

बरोबर ११ वाजून गेले व राष्ट्रीयसभेचा सर्व मंडप प्रतिनिधी व प्रेक्षक ह्यांच्या प्रचंड समुहानें भरून गेला. ह्या दिवशीं सभेमध्यें पहिल्या दोन दिवसांपेक्षां विशेष चळवळ दृष्टीस पडूं लागली. तिचीं मुख्य दोन कारणें होतीं:— पहिलें कारण, 'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती' ह्या कोटींतले परम दयाळु परोपकाररत सत्पुरुष **ह्यूम**-साहेब आपल्या सप्तसंवत्सरात्मक प्रिय कन्येला आज सोडून जाणार कीं काय? आणि दुसरें कारण, **ह्यूम**साहेबांच्या वियोगामुळें राष्ट्रीयसभारूप बाला आजच आपल्या जीविताचा त्याग करणार कीं काय ? ह्या दोन कारणांच्या योगानें सर्वांचीं मनें चिंतातुर होऊन जो तो त्यासंबंधानें आपले प्रेमळ हृदयोद्गार व्यक्त करूं लागला. **ह्यूम**साहेब आम्हांस सोडून गेले म्हणजे, त्यांची ती रमणीय मूर्ति आपणांस पुनः कशानें

दृष्टीस पडेल असें वाटून जो तो त्यांचे गुणानुवाद गाऊं लागला. ह्यूमसाहेबांची मूर्ति नेहमीं नेत्रांसमोर असावी म्हणूनच कीं काय न कळे! **बंगाल्या**कडील एका **राधारमण** नामक प्रसिद्ध देशभक्तानें त्यांच्या तसबिरीच्या हजारों प्रती सर्व राष्ट्रसभा-भक्तांस प्रेमाची नजर म्हणून समर्पण केल्या! **ह्यूम**साहेबांची तसवीर हातांत पडल्याबरोबर त्यांच्याविषयीं प्रतिनिधींची पूज्य बुद्धि प्रज्वलित होऊन प्रत्येकास ह्या महोदार पुरुषाच्या गमनाचें दुःख अत्यंत त्रास देऊं लागलें ! खरोखर, कित्येक सहृदय जनांचे नेत्र दुःखाश्रूंनीं भरून गेले !! आणि कित्येकांना आपलें निधान आज जाणार, असें वाटून त्यांच्या मुखावर निस्तेजता वास करूं लागली !! इतक्यांत, 'राष्ट्रीय-सभेच्या जनकास आशिर्वाद'(Farewell to the Father of the Congress) म्हणून कांहीं **संस्कृत** कवितांचे एक छापील पत्रक प्रतिनिधींना वाटण्यांत आलें. तें वाचून **संस्कृत** भाषाभिज्ञ जनांचीं अंतःकरणें अगदीं द्रवून गेलीं. त्या पत्रकामध्यें ज्या प्रेमळ कविता मुद्रित केल्या होत्या, त्या येणेंप्रमाणें :—

निरीक्ष्यास्मान्दूराद्धिपदुदधिपूराकुलतनून् ।  
धनैर्हीनान्दीनान् चिरमसुखलीनान्जडमतीन् ।  
स्वयं योऽभूत्तूर्णं तरुणकरुणापूर्णहृदयः ।  
चिरंजीव्याद्ह्यूमो भरतधरणीमोदजनकः ॥ १ ॥  
परित्यक्तस्वार्थोऽनवरतपरार्थोद्यमरुचिः ।  
प्रतीच्याब्धेःपाराज्झषमकरघोराकृतिमतः ।  
समागत्यात्रार्यानकृत निजकार्यैकरसिकान् ।  
चिरंजीव्याद्ह्यूमो भरतधरणीमोदजनकः ॥ २ ॥  
धियोत्तुंगान् वंगानमृतरुचिगंगातटगतान् ।  
तथा मद्रान् भद्रान् झटितिगतनिद्रान् मरहठान् ।  
व्यधात्सर्वान्योऽन्यानपिविबुधमान्यामितगुणः ।  
चिरंजीव्याद्ह्यूमो भरतधरणीमोदजनकः ॥ ३ ॥  
यदालोकादेकाद् भवति गतशोकापतिमति ।  
गुणैर्युक्ता मुक्तावलिरिव समाल्हादजननी ।  
दिवंयाता भार्याऽकुरुत न च यं कार्यविमुखम् ।  
चिरंजीव्याद्ह्यूमो भरतधरणीमोदजनकः ॥ ४ ॥  
अहो साधोर्यस्य श्रुतिसुखमगाधोदधिदृशः ।  
मुहुः स्मारं स्मारं विपुलगुणभारं निरुपमम् ।  
मनः सांद्रानंदाद् भवति गुणसंदानितामिव ।  
चिरंजीव्याद्ह्यूमो भरतधरणीमोदजनकः ॥ ५ ॥

जराधीनोऽपीनो बलविभवहीनोऽपिसततम् ।
रतस्त्यक्ताशंको विनतजनपंकोध्दंतिविधौ ।
निरातंको यंकोऽपि न भवति नालोक्यकृतिनम् ।
चिरंजीव्याद्ह्यूमो भरतधरणीमोदजनकः ॥ ६ ॥
सभांराष्ट्रीयाव्हांबहुजनसमाव्हानकुशलाम् ।
विनिर्मायाथास्या अवनमकरोत्सप्तशरदः ॥
इदानींतांकृत्वापरकरगतांयातिविषयम् ।
स्वकीयंसोजीव्या च्चिरमखिलभव्याहृतपदः ॥ ७ ॥
बुधास्त्वायंहृद्यंरुचिरमनवद्याक्षरयुतम् ।
इदंपद्यंसद्यः स्फुरितनिरवद्याखिलगुणम् ।
निधायाग्रेह्यूमं विपदटविधूमांकमकरो ।
न्महादेवःकश्चिद्भवतुनितरांतद्बुधमुदे ॥ ८ ॥

असो, अशा प्रकारें सर्व सभाजन, 'ह्यूम साहेब आणि राष्ट्रीयसभा' ह्या दोन पवित्र विषयांवरील नानाप्रकारचे कल्पनातरंग अंतःकरणांत उत्पन्न होत असल्यामुळे अस्वस्थचित्त व उत्साहरहित दिसूं लागले. इतक्यांत, सभेच्या कामास सुरवात झाली.

प्रथमतः **ह्यूम** साहेबांनीं, मुक्तिफौजेचे कमांडर जनरल **बूथ** ह्यांच्याकडून, **हिंदुस्थान**वासी गरीब लोकांच्या संबंधानें राष्ट्रीयसभा जो प्रयत्न करीत आहे, त्याच्या अभिनंदनपर अशी एक तार आली होती, ती वाचून दाखविली. ह्या तारेमध्यें जनरल **बूथ** ह्यांनीं, राष्ट्रीयसभेनें गरीब प्रजाजनांकरितां विशेष खटपट करावी, अशी अंतःकरणपूर्वक विनंतिही केली होती. त्या तारेचा जनरल **बूथ** ह्यांना तावडतोब जबाब पाठविण्यांत आला. त्यामध्यें त्यांच्या ह्या दयाभूत सूचनेबद्दल राष्ट्रीयसभा फार आभारी आहे वगैरे आशयाचा मजकूर लिहिला होता.

नंतर **कलकत्याचे** प्रसिद्ध राष्ट्रभक्त **मि० डब्ल्यू. सी. बानर्जी** हे भाषण करण्यास उठून उभे राहिले. त्यांची मूर्ति अवलोकन करितांच सर्व सभाजनांस अत्यंत हर्ष झाला. **बानर्जीं**च्या मुखावर त्या वेळीं असें कांहीं चमत्कारिक तेज दिसत होतें कीं, त्या योगानें ते कांहींतरी आनंदवृत्त सांगणार आहेत, असें वाटूं लागलें, आणि बरोबर ते आनंदवृत्तच सांगण्याकरितां उठून उभे राहिले होते. तें वृत्त हेंच कीं, सभेच्या पहिल्या दिवशीं 'राष्ट्रीयसभा बंद ठेवावी कीं काय' म्हणून विचार करण्याकरितां जी एक कमिटी नेमिली होती तिनें, **हिंदुस्थानां**तील राष्ट्रीयसभा, तिची **विलायतें**तील बैठक होई तोंपर्यंत तरी भरवीत जावी, असा ठराव केला आहे. हा ठराव **मि० डब्ल्यू. सी. बानर्जी** ह्यांनीं आपल्या अस्खलित व मधुर वाणीनें सभेस सादर केला. तो ऐकतांक्षणींच सर्व प्रतिनिधींचीं मुखकमलें प्रफुल्लित दिसूं लागलीं. व सर्वांनीं आनंद प्रदर्शनार्थ टाळ्यांचा फार मोठा गजर केला. **डब्ल्यू. सी. बानर्जीं**चें भाषण झाल्या-

नंतर **पंडित अयोध्यानाथ** यांनीं त्यांच्या सूचनेस अनुमोदन दिलें व सर्वानुमतें राष्ट्रीयसभा प्रतिवर्षी **हिंदुस्थाना**मध्यें भरवीत जावी, असा ठराव पसंत झाला. *

ह्या महत्वाच्या कामाचा निकाल झाल्यानंतर **टिनवेली**चे मुखत्यार **मि० पिटर पाल पिळे** यांनीं सभेच्या नवव्या ठरावाची अशी सूचना आणली कीं, "**दक्षिण हिंदुस्थाना**मध्यें जंगलाच्या कायद्याची अंमलबजावणी फार कडक होत असल्यामळें लोक अत्यंत ग्रस्त झाले आहेत. ह्याकरितां **हिंदुस्थान**सरकारास आमची अशी सविनय विनंति आहे कीं, त्यांनीं ह्या गोष्टीची चौकशी करून लोकांचा त्रास कमी होईल अशी व्यवस्था करावी !" ( ही सूचना सभेपुढें आणण्याचेपूर्वी अध्यक्षांनीं असें बोलून दाखविलें कीं, जंगलच्या कायद्यासंबंधानें सभेची अनुकूलता असून फक्त त्याच्या अंमलबजावणीसंबंधानें तक्रार आहे, असें मात्र कोणीं समजूं नये ) **पिटर पाल पिळे** यांनीं नववा ठराव पुढें आणतांना जंगलाच्या त्रासामुळें **मद्रास** इलाख्यांतील शेतकऱ्यांचे अत्यंत हाल होत आहेत, गुरांना चारा मिळत नाहीं, त्यामुळें तीं पटापट मृत्युमुखीं पडत आहेत वगैरे हृदयद्रावक हकीकत सांगितली. त्यांचें भाषण झाल्यानंतर **सातार**चे प्रतिनिधि **रा० सा० रघुनाथ पांडुरंग करंदीकर** हे त्या ठरावास आपलें अनुमोदन देण्याकरितां व्याख्यानपीठावर जाऊन उभे राहिले. त्यांनीं **दक्षिण**प्रांतामध्यें जंगलच्या कायद्यामुळें प्रजेवर कसकसे अनर्थ गुदरत आहेत, ह्याचें फार चित्तवेधक दिग्दर्शन करून, त्या योगानें प्रजेची कशी स्थिति झाली आहे, हें प्रत्यक्ष दाखविण्याकरितां त्यांनीं जंगलच्या कायद्यामुळें घरादारास मुकून अगदीं त्रासून गेलेल्या अशा ९ शेतकऱ्यांची हुबेहुब तसबीर सभेस सादर केली. ती अवलोकन करितांच सभाजनांस अत्यंत वाईट वाटून प्रत्येकाच्या मुखांतून दुःखप्रदर्शक उद्गार निघूं लागले ! **रा० सा० करंदीकर** यांनीं **सर थिओडोर होप** यांचे जंगलच्या कायद्यासंबंधाचे अत्यंत महत्वाचे शब्द सभाजनांस सादर केले. त्यांत **होप** साहेबांनीं स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, जंगलाचा कायदा हा, शेतकीस पुरून राहणाऱ्या ज्या जमिनी आहेत, त्या व्यवस्थेनें राखण्याकरितां आहे. परंतु, प्रस्तुत त्या कायद्याची ज्या दिशेनें अंमलबजावणी होत आहे, तिचा विचार केला तर परमावधीचें दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं !! त्यांनीं **कारवार**जिल्ह्यांतील जंगलच्या जुलमाचें विवरण करून **मद्रास**इलाख्यांतील **सालेम** जिल्ह्यांत जंगलच्या जळाऊ लांकडांवर देखील जो कर बसविला आहे, तोसुद्धां त्यांच्या अन्नावर कर बसविल्याप्रमाणें दुःसह होत आहे, वगैरेचें अल्प शब्दांत मोठें सयुक्तिक वर्णन केलें व सरकारानें आपल्या वचनान्वयें प्रजेस जंगलच्या त्रासापासून लौकर मुक्त

---

* हा सभेचा पहिला ठराव होय.

करावें अशी मोठ्या कळकळीनें सूचना केली.* **रा० सा० करंदीकर** ह्यांचें भाषण झाल्यानंतर टाळ्यांचा मोठा गजर झाला, व **मद्रासचे** प्रतिनिधि **मि० वीरराघव चारियर** हे ह्या विषयावर भाषण करण्याकरितां व्याख्यानपीठावर येऊन दाखल झाले. **वीरराघव चारियर** हे राष्ट्रीयसभेचे निस्सीमभक्त असून **मद्रास**च्या स्टॉडिंग कांग्रेस कमेटीचे सेक्रेटरी आहेत. त्यांनीं जंगलच्या कायद्यासंबंधानें फार सुरस भाषण केलें त्यांत त्यांनीं असें सांगितलें कीं, सन १८७९ सालीं ज्या वेळीं हा कायदा सुरू झाला त्यावेळीं सरकारानें असें स्पष्ट सांगितलें होतें कीं, जंगलापासून देशाचें कल्याण व्हावें एवढाच त्याचा उद्देश आहे. त्यापासून खजिन्यांत भर घालावी, असा सरकारचा मुळींच हेतु नाहीं ! परंतु हें सरकारचें अभिवचन जागच्या जागींच राहून जंगलच्या कायद्यानें सरकारानें आपल्या खजिन्याची भर करण्याचा सारखा सपाटा चालविला आहे ! ( 'फार लांच्छनास्पद ' असे दुःखोद्गार ! )

**मि० वीरराघव चारियर** ह्यांनीं फक्त **मद्रास**इलाख्यामध्येंच कसें जंगलचें उत्पन्न वाढत चाललें आहे, हे आंकड्यांनीं सिद्ध करून दाखविलें. त्यांनीं असें सांगितलें कीं, सन १८७८ सालीं जें उत्पन्न ६।।। लक्ष रुपये होतें, तें सन १८८८ सालीं १३ लक्षांपर्यंत वाढलें आहे! **मि० वीरराघव चारियर** यांचें सप्रमाण व मधुर भाषण समाप्त होतांच **बेळगांवचे मि० भाटे** वकील ह्यांचें अल्प भाषण झालें, व त्यानंतर **नासिकचे** वकील **रा० रा० निंबकर** यांचें मराठीमध्य भाषण झालें. **रा० सा० निंबकर** हे ज्या वेळीं **मराठी**मध्यें बोलूं लागले, त्यावेळीं त्यांच्या गंभीर वाणीनें सर्व सभामंडप दणाणून गेला. त्यांच्या भाषणामध्यें विशेषतः जंगलाच्या दुःखद स्थितीचें फार चांगलें दिग्दर्शन होतें. त्यांनीं असें सांगितलें कीं, " सरकारानें जो जंगलचा कायदा केला आहे, तो प्रजेस मुळींच हितावह नाहीं. त्या योगानें ' भीक नको पण कुत्रा आवर ' अशी आमची स्थिति झाली आहे; ह्या कायद्यामुळें किती दुःख होतें हें श्रीमंत लोकांना कळत नाहीं, पण ज्यांना जंगलामध्यें जाऊन फॉरेस्ट यमदूतांच्या तडाख्यांतून मोळ्या आणाव्या लागतात, त्यांसच माहित ! ! जंगलांशीं हिंदुमनुष्याचा संबंध जन्मापासून मृत्युपर्यंत आहे. परंतु त्या जंगलावर कायद्याचा अंमल बसल्यामुळें आतां आमची सर्व विकतची स्थिति झाली आहे. जन्म पावल्याबरोबर मध लागतो तोही आम्हांस विकतच घ्यावा लागतो ! आणि अखेर आम्हांस विकतचेंच मरावें लागतें ! ( टाळ्यांचा गजर. ) तात्पर्य. ह्या कायद्यापासून गरीब प्रजेवर जो जुलूम होत आहे, तो मायबाप सरकारानें नाहींसा करावा. असें आमचें मागणें आहे. " ( टाळ्या. )

---

* **रा० सा० करंदीकर** ह्यांचें भाषण झाल्यानंतर **बंगाल्यांतील के० वी० मालिक** ह्यांनीं जंगलच्या ठरावांत कांहीं फेरफार सुचविला होता; पण त्याची अवश्यकता नसल्यामुळें त्यांनीं आपली सूचना परत घेतली.

ह्यानंतर **पुण्याचे** वकील **रा० सा० काशीनाथपंत नातु** ह्यांनीं दहावा ठराव-सभेपुढें आणला. त्याचा सारांश असा होता कीं, "गेल्या वर्षी विलायतेंतील कांग्रेस कमिटीनें व **सर. डब्ल्यू. वेडरबर्न** साहेबांनीं **हिंदुस्थानास** जी मदत केली तीबद्दल राष्ट्रीयसभा त्यांची अत्यंत आभारी आहे व ह्यापुढेंही त्यांनीं **हिंदुस्थानास** अशीच मदत करावी, अशी राष्ट्रीयसभेची सविनय विनंति आहे. ह्या ठरावावर **रा० सा० नातु** ह्यांनीं थोडक्यांत सुरस भाषण केलें, व त्यास **राय जोत्येंद्र चौधरी** ह्यांनीं आपलें अनुमोदन दिलें.

नंतर **मुंबईचे** ब्यारिस्टर **मि० फेरोजशहा मेथा** व्यासपीठावर जाऊन उभे राहिले. त्यांची मूर्ति दृष्टीस पडतांच टाळ्यांचा मोठा गजर झाला. **मि० फेरोजशहा** ह्यांची मुद्रा ह्या वेळीं दुःखित दिसत होती व त्यावरून त्यांचें अंतःकरण कोणत्या तरी महद्दुःखानें व्याकुळ झालें आहे, असें व्यक्त होत होतें. खरोखर, त्यांच्याकडे ज्या ठरावावर भाषण करावयाचें काम आलें होतें तो ठराव प्रत्येकाच्या हृदयांत शोक उत्पन्न करण्यासारखाच होता. अर्थात्, तो **ब्राडला**साहेबांच्या मृत्युसंबंधानें होय, हें निराळें सांगावयास नकोच ! ह्या महात्म्यानें **हिंदुस्थाना**करितां केवळ परोपकार बुद्धीनें जे परिश्रम केले त्यांजबद्दल कृतज्ञतापूर्वक त्यांचे अनंत उपकार प्रदर्शित करून, **ब्राडला** साहेबांच्या मृत्यूनें सर्व **हिंदुस्थान** दुःखसागरांत बुडून गेलें आहे, हें राष्ट्रीयसभेच्या मार्फत, त्यांच्या **मिसेस ब्राडला बोनर** नामक मुलीस पत्र पाठवून कळवावें, असा ह्या अकराव्या ठरावाचा सारांश होता. हा ठराव सभेपुढें ठेवतांना **फेरोजशहा मेथा** ह्यांनीं फार गंभीर व सुरस भाषण केलें. त्यांच्या भाषणामध्यें करुणरस इतका ओतप्रोत भरला होता कीं, त्या योगानें श्रोत्यांचीं अंतःकरणें **ब्राडला**साहेबांच्या दुःखानें अत्यंत विव्हल होऊन त्यांच्या नेत्रांतून अश्रुपरिपात होऊं लागला. **फेरोजशहा** ह्यांचें शांत, गंभीर व करुणरस परिप्लुत असें भाषण होत असतांना सर्व सभा चित्रा-प्रमाणें तटस्थ झाली होती. त्यांचें हृदयद्रावक व विद्वत्ताप्रचुर भाषण संपल्यानंतर **पंडित काव्य विशारद** व **मुनशी सदरुद्दीन** ह्यांनीं त्या ठरावास आपलें अनुमोदन दिलें. नंतर सर्व सभा दुःखितांतःकरणानें उठून उभी राहून पूज्यबुद्धिपुरःसर तिनें ह्या ठरावास आपलें संमत दर्शविलें व नंतर तो ठराव कायम करण्यांत आला.

ह्यानंतर सभेचा बारावा ठराव हातीं घेऊन **डब्ल्यू० सी० बानर्जी** हे भाषण करण्याकरितां उठून उभे राहिले. **बानर्जी** ह्यांनीं रसाळ वाणीनें **दादाभाई नवरोजी** ह्यांचे गुणानुवाद गाऊन त्यांनीं **हिंदुस्थान**च्या हिताकरितां अंतःकरण-पूर्वक कसकसे प्रयत्न केले, ह्याचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें, आणि त्यांच्या ह्या निष्ठावंत प्रयत्नाबद्दल राष्ट्रीयसभा फार आभारी आहे, व जर ते **सेंट्रल फिन्स-बरीच्या** तर्फे पार्लमेंट सभेचे सभासद निवडले गेले तर तेथील लोकांशीं राष्ट्रीय-

सभा अत्यंत ऋणी होईल असा ठराव सभेपुढें सादर केला. त्यास सर्वांनीं संमति दर्शविल्यावरून तो पसंत करण्यात आला.

नंतर **नागपूरचे सी० नारायण स्वामी नायडू** यांणीं सभेपुढें तेरावा ठराव आणला. त्याचा सारांश असा होता कीं, **इंग्लंडा**मध्यें पुढील वर्षी जनरल इलेक्शनची गडबड असल्यामुळें सन १८९० सालीं **कलकत्त्याच्या** सभेंत ठर- ल्याप्रमाणें १०० प्रतिनिधींची राष्ट्रीयसभा **विलायते**मध्यें तें इलेक्शन संपेपर्यंत भर- विण्यांत येऊं नये. ह्या ठरावावर भाषण करितांना **मि० नायडू** यांनीं समुद्रपर्य- टणास स्वदेशहिताच्या कृत्यांत कोणत्याही प्रकारें अडचण नसावी असें मत प्रदर्शित केलें, व असें सांगितलें कीं **बंगाल**च्या पंडित लोकांनीं, स्वदेशसेवेकरितां समुद्रपर्यटण करण्यास शास्त्राचा कोणत्याही प्रकारें अडथळा नाहीं, असें ठरवून त्यांनीं **विलायते**मध्यें कोण कोण प्रतिनिधि पाठवावयाचे तें ठरविलें आहे. त्याप्रमाणें इतर प्रांतांतील लोकां- नींही शास्त्राची कोणतीही अडचण काढून देशहिताच्या कृत्यास अडथळा आणूं नये. **मि० नायडू** यांचें हें भाषण फार सयुक्तिक असून तें सर्वांस पसंत पडलें, असें त्यांच्या भाषण समाप्तीनंतर झालेल्या आनंदप्रदर्शक टाळ्यांच्या गजरावरून व्यक्त झालें. नंतर त्यास **मि० पार्थसारथी नायडू** ह्यांनीं अनुमोदन दिलें व थोडक्यांत असें सांगितलें कीं, **डुम्रूर**च्या महाराजांनीं आपल्या राज्यांतील व **काशी** येथील पंडितांस समुद्रपर्यटणास शास्त्राधार आहे, असें सिद्ध करून दाखविण्याबद्दल सांगितलें आहे व तें बहुतकरून सिद्ध झाल्यासारखें आहे. हें ऐकतांक्षणीं सर्व प्रतिनिधींनीं अभिनंदन- पूर्वक टाळ्यांचा गजर केला, व सर्वानुमतें तो ठराव पसंत झाला.

नंतर **कलकत्त्या**चे श्रीमान् गृहस्थ व कट्टे राष्ट्रसभासद **मि० जे० घोसल** ह्यांनीं सभेपुढें चौदावा ठराव आणिला; तो येणेंप्रमाणें:—"**इंग्लंडा**मध्यें राष्ट्रीय- सभेचें जें काम करावयाचें आहे, त्याच्या खर्चासाठीं ४०,००० रुपयांची रक्कम जमा करावी, व **लंडन** येथें राष्ट्रीयसभेची जी एजन्सी आहे, तिच्या खर्चासाठीं ६,००० रुपयांची रक्कम जमा करावी." ह्या ठरावास **मद्रासचे मि० वीरराघव चारियर** ह्यांनीं अनुमोदन दिलें. नंतर तो ठराव सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

नंतर **डब्ल्यू० सी० बानर्जी** हे पुनः उठून उभे राहिले व त्यांनीं मधुर शब्दांत **मि० ए० ओ० ह्यूम** व ऑनरेबल **पंडित अयोध्यानाथ** हे पुढील वर्षाकरितां राष्ट्रीयसभेचे अनुक्रमें जनरल सेक्रेटरी व जाइन्ट जनरल सेक्रेटरी नेमण्यांत यावेत, अशी प्रेमभावानें सूचना केली. ती सूचना श्रवण करितांच सर्व श्रोतृवृंदास अत्यंत आनंद झाला, व सर्वांच्या अनुमोदनानें ती सूचना मान्य झाली. ह्या वेळीं सर्व सभाजनांच्या मनोवृत्ति आनंदरसानें उल्लसित होऊन त्यांच्या मुखांतून जे धन्यवाद निघूं लागले, ते येथें सादर करणें अगदीं अशक्य आहे. **ह्यूम** साहेब व **पंडित अयोध्यानाथ** ह्या दोघांनीं कांहीं कारणामुळें राष्ट्रीयसभेची जबाबदारी सोडण्याचा विचार केला

होता; पण डब्ल्यू० सी० बानर्जी ह्यानीं जी प्रेमळ विनंति केली व सर्व प्रतिनिधींनीं जी अंतःकरणपूर्वक आग्रहाची संमति दर्शविली त्या योगानें उभय गृहस्थांच्या हृदयांत अनावर प्रेमपाझर उत्पन्न होऊन त्यांना स्वपदत्याग करण्याचा निष्ठुर विचार रहित करणेंच भाग पडलें !! त्या वेळीं ' उदार चरितानांतु वसुधैव कुटुंबकम् ' ही उक्ति यथार्थ पालन करणारे महोदार ह्यूमसाहेब व त्यांचे जोडीदार पंडित अयोध्यानाथ हे आनंदानें गहिंवरून गेले. त्यांच्या दयार्द्र अंतःकरणांत सर्व प्रतिनिधींच्या सप्रेमतेबद्दल अनंत विचार घोळूं लागून त्यांची चतुर रसना देखील गांधळून गेली ! त्यांतल्यात्यांत मोठ्या कष्टानें ह्यूमसाहेब उठून उभे राहिले, आणि त्यांनीं आपल्याविषयींच्या पूज्य बुद्धिबद्दल प्रतिनिधींचे आभार मानण्याचा प्रयत्न केला ! ! पण प्रेमातिशयानें उचंबळून गेलेल्या त्यांच्या हृदयांतून एक शब्दही मोठ्यानें उमटेना ! हा अप्रतिम व अलौकिक देखावा पाहून कोणाचें हृदय लोल होऊन जाणार नाहीं बरें ? ह्या वेळीं प्रतिनिधीमंडळीस जें कौतुक वाटलें तें प्रदर्शित करण्यास महाराष्ट्रभाषादेवी आह्मांस मुळींच प्रसन्न होत नाहीं ! असो, ह्यूमसाहेब भाषण करण्याकरितां उठून उभे राहिले, हें पहाताक्षणींच सर्व प्रतिनिधीजनानीं टाळयांचा एकसारखा जयघोष चालविला. सर्व सभाजन ह्यूम साहेबांचें स्वागत करण्याकरितां कांहीं वेळ उठून उभे राहिले. अहाहा ! ह्या वेळीं जणूंकाय प्रत्यक्ष आनंदश्रीचाच लग्नसमारंभ आहे कीं काय, असा भास होऊं लागला ह्यूम साहेबांवर पुष्पवृष्टि सुरू झाली. पुराणकथांतरीं आनंदप्रसंगीं देवादिकांनीं स्वर्गांतून केलेल्या पुष्पवृष्टीची जीं मनोहर वर्णनें कविजनांच्या मधुर वाणीनें ग्रथित झालीं आहेत, त्यांचा प्रत्यक्ष देखावा येथें दृष्टीस पडूं लागला ! गंधर्वकिन्नरांचें नृत्यगायन ह्या वेळीं प्रत्यक्ष दृष्टीस पडूं लागलें. अध्यक्षांच्यासमोर बसलेल्या प्रतिनिधींमध्यें मद्रासचे कांहीं गृहस्थ आनंदभरानें खरोखर नाचूं लागले. बंगालचे बाबू आपल्या हातरुमालाच्या योगानें ह्यूम साहेबांचे जयजयकारार्थ आनंदध्वजा फडकावीत आहेत, असें वाटूं लागलें. आंग्लभाषानभिज्ञ मुसलमान प्रतिनिधी प्रेमभावानें " कांग्रेसजीका जय, ह्यूम साहेबजीका जय ! ! " म्हणून सुस्वर जयघोष करूं लागले. त्यापुढें स्वर्गलोकांतील गंधर्वांचे मधुरालाप तुच्छ वाटूं लागले. असो, ह्या मंगल प्रसंगाचें वर्णन जेवढें करावें तेवढें थोडेंच आहे. ह्यूम साहेबांचा असा जयजयकार चालला असतांना त्यांनीं अल्प शब्दांत असें सांगितलें कीं, "मीं हिंदुस्थानची जी अल्पसेवा केली, तिच्याबद्दल आपण माझें हें अति प्रेमगौरव करीत आहां; तितक्या योग्यतेस मी मुळींच पात्र नाहीं !(ह्यूम साहेबांचे हे सौजन्यदर्शक शब्द ऐकून सर्वांनीं 'तसें कांहीं नाहीं' ह्मणून उद्गार काढिले!) तथापि आपण दिलेल्या ह्या सन्मानाबद्दल मी अंतःकरणपूर्वक आपले फारफार आभार मानितों. (टाळ्या.) कांहीं कारणामुळें सभेच्या चिटणिसीची जागा सोडून देण्याचा मीं विचार केला होता परंतु माझ्या श्रेष्ठ व सन्मान्य मित्रांच्या आग्रहामुळें माझ्यानें ती सोडून देववत नाहीं ! (टाळ्या. )आतां पुढील वर्षाच्या राष्ट्रीयसभे-

करितां मला **हिंदुस्थानांत** येतां येणार नाहीं, तरी **इंग्लंड** येथें राहून तिच्याप्रीत्यर्थ माझ्या हातून होईल तितकी खटपट करण्याबद्दल सदासर्वकाळ मी काळजी घेईन. (टाळ्या.) पुढील वर्षाच्या सभेस मी आलों नाहीं तर तुम्ही तिचा सभारंभ अशा रीतीनें शेवटास न्या कीं, '**ह्यूम** म्हणजे राष्ट्रीयसभा' व 'राष्ट्रीयसभा म्हणजे **ह्यूम**' असा जो कित्येकांचा दृढ समज झाला आहे, तो दूर होईल. ( टाळ्या. ) **लंडन** येथें राष्ट्रीयसभेची जी एजन्सी आहे, तिच्या पैशाचा हिशोब वगैरे नीट रीतीनें ठेवला असून त्याचा व्यय योग्य होतो, हें लक्षांत असूं द्या. ते सर्व हिशोब वेळोवेळीं छापून प्रसिद्ध केले आहेतच. आतां माझी आपणांस सविनय अशी विनंति आहे कीं, **लंडन** येथें राष्ट्रीयसभेच्या हिताकरितां 'इंडिया' म्हणून जें वर्तमानपत्र निघतें तें सभेच्या मालकीचें आहे. त्यास अद्यापि मिळावा तसा लोकाश्रय मिळाला नाहीं, ह्याकरितां प्रत्येकानें ह्या पत्रास अवश्य आश्रय द्यावा ह्मणजे राष्ट्रीयसभेस चांगली मदत होईल. ( टाळ्या. ) अशा रीतीनें राष्ट्रीयसभेस प्रत्येकानें साह्य केलें ह्मणजे मग तिच्या मागण्या परमेश्वरकृपेनें फलप्रद होतील, अशी माझी पूर्ण आशा आहे." ( टाळ्या. ) **ह्यूम**साहेबांचें वरील आशयाचें भाषण झाल्यानंतर ऑनरेबल **पंडित अयोध्यानाथ** ह्यांनीं अत्यंत प्रेमानें सर्व प्रतिनिधींस पुढील वर्षाच्या सभेकरितां **अलहाबादेस** येण्याबद्दल निमंत्रण केलें व सर्वांनीं त्यास टाळ्यांचा गजर करून आपली मान्यता प्रदर्शित केली. नंतर **डब्ल्यू० सी० बानर्जी** ह्यांनीं मोठ्या मधुर शब्दांत सातव्या राष्ट्रीयसभेचे अध्यक्ष **राय बहादूर पी० आनंदाचार्लू** ह्यांचे सर्वांच्या वतीनें आभार मानिले, नंतर अध्यक्षांनींही सर्व सभेचें सावधान चित्त व शांत वर्तन ह्यांबद्दल बहुत आभार मानून सातव्या राष्ट्रीयसभेच्या कार्याची समाप्ति झाली, असें सांगितलें. नंतर सर्व सभाजन मोठ्या राजनिष्ठेनें उभे राहून सर्वांनीं अत्यंत प्रेमभावानें **राजराजेश्वरी महाराणी व्हिक्तोरिया** ह्यांच्या पवित्र नांवाचा त्रिवार जयजयकार केला. त्या वेळीं सर्व राजनिष्ठ राष्ट्रसभाभक्तांचीं अंतःकरणें राज्ञीचरणीं लीन होऊन त्यांमध्यें अभिष्टचिंतनपर अशी पुढील सुवर्णाक्षरें दृष्टीस पडत होतीं:—

**श्लोक.**

**असो कुशल आमुची विभवशालिनी स्वामिनी।**
**सदैव फडको ध्वजा विमल कीर्तिची या जनीं॥**
**तिचा विजयमंगल ध्वनि भरो सदा अंबरीं।**
**[1]वरोनि उधळो फुलें [2]सुनयदेव राज्ञीवरी॥ १॥**

**समाप्त.**

---

१ स्वर्गा न. २ न्यायदेवता. । ( राष्ट्रीयसभेच्या योग्य व न्याय्य अशा मागण्या सरकारनें मान्य केल्या ह्मणजे न्यायदेवता महाराणीसाहेबांवर पुष्पवृष्टि करील. हें साहजिकच आहे. )

# मागील ६ राष्ट्रीयसभांची संक्षिप्त माहिती.

**हिंदुस्थाना**मध्यें राष्ट्रीयसभा ही संस्था सन १८८५ सालीं **मुंबई** येथें संस्थापित झाली. त्या वेळीं सभेचें अध्यक्षस्थान **बाबू डब्ल्यू. सी. बानर्जी** ह्यांनीं स्वीकारिलें असून त्या सभेस निरनिराळ्या प्रांतांतून सुमारें ७४ प्रतिनिधी आले होते. दुसरी सभा **कलकत्ता** येथें सन १८८६ सालीं भरली होती. त्या वेळीं सभेचें अध्यक्षस्थान **नामदार दादाभाई नौरोजी** ह्यांनीं स्वीकारिलें असून त्या सभेस **हिंदुस्थानां**तील सर्व प्रांतातून ४३६ प्रतिनिधी आले होते. तिसरी राष्ट्रीयसभा **मद्रास** येथें सन १८८७ सालीं भरली होती. तिचें अध्यक्षस्थान **मि० बद्रुद्दीन तय्यबजी** ह्या **मुसलमान** गृहस्थांनीं स्वीकारिलें होतें. ह्या सभेस ६०७ प्रतिनिधी हजर होते. चवथी राष्ट्रीयसभा **अलहाबाद** येथें सन १८८८ सालीं भरली होती. तिचें अध्यक्षस्थान **मि० जॉर्ज यूल** ह्यांनीं विराजीत केलें असून प्रतिनिधींची संख्या १,२४८ होती. पांचवी राष्ट्रीयसभा पुनः **मुंबई** येथें सन १८८९ सालीं भरली होती. त्या वेळीं सभेचें अध्यक्षपद **मि० डब्ल्यू. डब्ल्यू. वेडरबर्न** ह्यांच्याकडे दिलें होतें. ह्या वर्षी प्रतिनिधींची संख्या १,८८९ होती. सहावी राष्ट्रीयसभा पुनः **कलकत्ता** येथें १८९० सालीं भरली होती. ह्या सभेस ६७७ प्रतिनिधी आले होते. **मि० फेरोजशाहा मेथा** हे तिचे अध्यक्ष होते.

ह्या सर्व सभांमध्यें सर्व प्रकारचे व सर्व जातींचे असे मोठमोठे विद्वान, सन्मान्य व अधिकारसंपन्न महाजन आले असून त्यांनीं फार शांतपणानें, पोक्त विचारानें व राजनिष्ठापूर्वक पुष्कळ राजकीय गोष्टींचें साधार विवेचन केलें. त्याचा सारांश येणेंप्रमाणें:—

१ **हिंदुस्थानां**तला राज्यकारभार कसा काय चालला आहे हें पाहण्याकरितां **विलायत** सरकारानें एक राजकीय मंडळी नेमावी. तींत **हिंदुस्थान**च्या तर्फेचे योग्य गृहस्थही असावेत.

२ **इंग्लंडा**मध्यें सेक्रेटरी ऑफ् स्टेट फॉर इंडिया म्हणून जें एक व्यर्थ खर्चाचें खातें आहे, व त्यापासून **हिंदुस्थाना**ला कांहीं उपयोग नाहीं, तें कमी करून टाकावें.

३ कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद पुष्कळ घेतले जाऊन त्यांच्या संमत्तीनें **हिंदुस्थान**च्या जमाखर्चाचीं व इतर महत्वाचीं सर्व कामें होत जावींत. **वायव्य प्रांत** व **पंजाब** ह्यांना स्वतंत्र कौन्सिलें असावींत.

४ सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा **इंग्लंडा**प्रमाणें **हिंदुस्थानां**त घेण्याची व्यवस्था करावी, व तिच्या उमेदवारांच्या वयाची इयत्ता २३ वर्षांच्या खालीं असूं नये.

५ लष्करी खर्च कमी करण्याचा प्रयत्न करावा. त्या खर्चास आणखी पैसा लागेल तर त्याबद्दल परदेशांतून येणाऱ्या मालावर जकात बसवावी. **हिंदुस्थान**च्या कर्जाबद्दल **इंग्लंड**नेंही जबाबदारी घेतली पाहिजे.

६ अपराध्यांची चौकशी करण्याकरितां ज्यूरी नेमण्याची पद्धति सर्वत्र सुरू करून ज्यूरीचा ठराव हायकोर्टासही रद्द करण्याचा अधिकार नसावा.

७ आरोपी मनुष्यास आपली चौकशी माजिस्ट्रेट पुढें न होतां सेशन जजापुढें व्हावी, असें वाटत असल्यास त्याप्रमाणें करण्याबद्दल कायद्यांत सवड असावी.

८ न्यायाचें काम व वजावणीचें काम एकाच अधिकाऱ्याकडे असूं नये.

९ **हिंदुस्थानां**तील लोकांस आपखुषीनें पलटणींत घेण्याची मोकळीक असावी, व त्यांना लष्करी शिक्षण द्यावें, व त्यांकरितां लष्करी शाळा स्थापन कराव्यात.

१० **महाराणी साहेबांच्या** जाहिरनाम्याप्रमाणें एतद्देशीय लोकांस लष्करी खात्यामध्यें मोठमोठ्या हुद्यांच्या जागा द्याव्या.

११ प्राप्तीवरील कर एक हजार रुपये उत्पन्नापर्यंत घेऊं नये.

१२ **हिंदुस्थानां**तील कलाकौशल्याची वृद्धि करण्याकरितां सरकारानें धंदे शिक्षणास उत्तेजन द्यावें, व **हिंदुस्थानां**त तयार झालेला माल सरकारी कामांस घेत जावा, म्हणजे एतद्देशीय कारखान्यांस चांगली मदत होईल.

१३ हत्यारांच्या कायद्यामुळें प्रजाजन, वनपशूपासून आपलें संरक्षण करण्यास अगदीं असमर्थ झाले आहेत, व त्यामुळें कित्येक वेळीं त्यांना मृत्युपंथ सुधारावा लागतो. ह्याकरितां **हिंदुस्थानां**तील प्रजेची राजनिष्ठा ध्यानीं घेऊन तिला हत्यारें बाळगण्याची परवानगी द्यावी.

१४ पोलीस खात्याची स्थिति असमाधानकारक असल्यामुळें त्याच्या चौकशीकरितां एक मंडळी नेमावी.

१५ अपकारी खातें वाढल्यामुळें लोकांचें फार नुकसान होत आहे, ह्याकडे लक्ष देऊन त्यांत सुधारणा करावी.

१६ **हिंदुस्थान** देशामध्यें शिक्षणप्रसार करण्याकडे विशेष लक्ष पुरवून तदर्थ होणारा खर्च कमी न करितां उलट तो जास्त वाढवावा, व सरकारानें शिक्षणाच्या सर्व संस्था आपल्या ताब्याखालीं ठेवाव्या.

१७ **मुंबई** व **मद्रास** इलाख्यांमध्यें व इतर प्रांतांमध्यें कायम धाऱ्याची पद्धति चालू करावी.

१८ सर्वांचें जीवन जें मीठ त्यावरील अत्यंत त्रासदायक कर माफ करावा.

१९ हौस ऑफ कॉमन्स सभेच्या सभासदांना, पूर्वी ज्याप्रमाणें अध्यक्ष उठून जाण्याचे अगोदर **हिंदुस्थानां**तील लोकांच्या जुलुमासंबंधानें प्रश्न विचारण्याचा अधिकार होता, त्याप्रमाणें तो पुन: मिळावा; व त्या सभेमध्यें **हिंदुस्थान**च्या वार्षिक जमाखर्चाच्या अंदाजपत्रकाचा योग्य विचार, शांत वेळीं, सविस्तर होत जावा.

२० राष्ट्रीयसभेची माहिती **विलायते**तील लोकांस देण्याकरितां खुद्द तेथेच १०० प्रतिनिधींची सभा भरवावी.

ह्या ठरावांखेरीज राष्ट्रीयसभेच्या कामासंबंधानें वगैरे आणखीही ठराव झालेले आहेत. तथापि, राष्ट्रीयसभेच्या **इंग्रज**सरकारापाशीं ज्या नम्र मागण्या आहेत त्यांचा सारांश वर दिलेल्या ठरावांत पूर्णपणें आला आहे. परमेश्वर करो आणि ह्या मागण्या सफल होवोत.

# सुगंधिक पद्यकुसुमें.

[आमचे परमप्रिय मित्र रा० रा० एकनाथपंत भांडारे ह्यांनीं ' राष्ट्रीय बाल-सभा' नामक राष्ट्रीयसभेवर एक सुंदर काव्य लिहिलें आहे. तें ह्या पुस्तकांत समग्र छापण्याचा आह्मी विचार केला होता, परंतु पुस्तकांतील गद्य मजकूर अजमासापेक्षां जास्त झाल्यामुळें, निरुपायास्तव त्या काव्यांतील कांहीं पद्यें वाचकांस सादर करणें भाग पडलें आहे! पुढील पद्यांमध्यें राष्ट्रीयसभेची राजनिष्ठा, तत्संबंधीं राष्ट्रसभाभक्तांचा दृढ निश्चय सुहेतु, उत्साह, आणि अभिमान इत्यादिकांचे सुरस वर्णन केलें आहे. ह्या पद्यकुसुमांचा सुगंध वाचकांस आनंदप्रद होईल अशी आशा आहे. ]

### श्लोक.

" जे गेले तरवार गाजवुनियां स्वातंत्र्यसंरक्षणीं ।
ते झाले प्रिय आर्यपुत्र अपुल्या शौर्येंकरूनी जनीं ॥
तत्कीर्ति कविराज थोर अजुनी गाती पुराणांतरीं ।
कां हो कां मग खड्ग आपण अतां घेऊं नये ह्या करीं? " ॥ १ ॥
छे! छे! काळ परंतु जेंवि बदले तेवीं फिरे स्वस्थिती।
कायेचें कळलें अमोलपण हें निःशंक सर्वांप्रती ॥
विद्वत्संमत युक्तिवाद करुनी भूपासवें यामुळें ।
स्वातंत्र्यार्जन घ्या करून सगळे त्यापासुनी धीबळें! ॥ २ ॥
ज्यांनीं राष्ट्रसभा असे रुचिर या तत्वावरीं स्थापिली ।
ते सर्वोत्तम आर्यपुत्र असती देशाभिमानी बली ॥
' ओंवाळूं निजकाय दिव्य अपुल्या देशावरूनी ' तयां— ।
वाटे ' आपण आपलेंपण पुन्हां संपादुनी घेउं या! ' ॥ ३ ॥
जो राजा करितो प्रजेस असल्या स्वातंत्र्यदानाप्रती ।
धर्माचा अवतार कोण न तया मानील दुजा धीमती? ॥
ऐशा त्या उपकारकारि विभुच्या निर्दालनीं कोणता— ।
दुर्वृत्ता अधमाधमाहुनि दुजा दावील उद्युक्तता? ॥ ४ ॥
आह्मी आर्य, अनार्यता प्रकट या लोकीं कशी हो करूं? ।
दुश्चेष्टीं अनुदारतेस धरुनी दुष्कीर्ति कैंवी वरूं? ॥
नाहीं या जगिं राजभक्त दुसरे आम्हांहुनी वाटतें ।
आत्मस्तौत्य असेल नीच; परि तें वस्तुस्थिती दावितें! ॥ ५ ॥

शिष्टाई करण्यास अंगद जसा लंकेप्रती धाडिला ।
किंवा कौरवसंसदेप्रति असे श्रीकृष्ण तो प्रेरिला ! ॥
अस्मद्राष्ट्रसभा प्रवेशुनि तशी राज्ञीसुमंत्र्यांतरीं ।
वेधी तन्मन आणि लक्ष्य सगळें आह्मांकडे सुंदरी ! ॥ ६ ॥
वर्षे जाहलिं आज सात पुरतीं जन्मूनियां तीप्रती ।
कार्ये आजवरीं अनेक कृतिनें झालीं तिच्या सिद्ध तीं ! ॥
नाहीं दाद परंतु लागत हवी तैशी ह्मणूनी तिला ।
धाडूं लंडनराजधानिस अम्ही राज्ञीपुढें कोमला ! ॥ ७ ॥
जेव्हां जन्म तिचा सुखप्रद असे मुंबापुरीं जाहला ।
तज्जन्मोत्सव अल्पही न करुनी तेव्हां कुणी दाविला ! ॥
दुर्दैवें पडली अमोल असली पंकांत कस्तूरिका ।
तत्गंध प्रिय चारु मंद नव तो तेथेंच थांबेल कां ! ॥ ८ ॥
ह्या न्यायें कळतां खरोखर तिची सर्वांप्रती योग्यता ।
तत्सत्कीर्तिसुगंध दिव्य पसरे दाही दिशा कोंदितां ! ॥
स्वातंत्र्यप्रियमूर्ति नागपुरिं ती मद्रासिं, मुंबापुरीं- ।
कलकत्तीं, रुचिरा प्रयागिं दिसली सौदामिनीच्यापरी ! ॥ ९ ॥
जेव्हां आगमनार्थ मंडप तिच्या होऊं मुदें लागतीं ।
तेव्हां वाटतसे दुजी मयसभा होई जणों भारतीं ! ॥
नाना सुंदरशा ध्वजा फडकती स्वातंत्र्यमंदानिलीं ।
स्वर्गाहूनिच ये अहा ! उतरुनी वैकुंठ तें भूतलीं ! ॥ १० ॥
भेदाभेद नसे, दया वसतसे, मैत्री तिथें नांदते ।
वाग्देवी रमते, बृहस्पति जणों प्रत्यक्ष येती तिथें ! ॥
वक्तृत्वोदधिसुंदरप्रमथनीं रत्नें निघूं लागतीं ।
स्वातंत्र्योत्सुकता, स्वदेशममता, इत्यादि तीं लाधतीं ॥ ११ ॥
चंद्राच्या किरणांतुनी नवसुधाधारा स्रवूं लागतां ।
थाटे त्या मकरंदपूर्ण कमलीं प्रेमाभरें आर्द्रता ! ॥
तेवी राष्ट्रसभेकडूनि सुकृती जेव्हां घडूं लागल्या ।
तेव्हां एकवटून वृत्ति अमुच्या साल्हादशा जाहल्या ! ॥ १२ ॥
स्वातंत्र्यादि सुखें अह्मां जर कधीं आहेत तीं लाधणें ।
तीं ह्या राष्ट्रसभेकडूनि सकलां आहेत संपादणें ! ॥
आह्मां हिंदुजनां ह्मणूनि गमतें प्राणाहुनी ती प्रिय ।
धीरोदात्तपणें खरोखर तिला ठेवूं अह्मी निर्भय ! ॥ १३ ॥


HEALTH, WEALTH & PROSPERITY.

## जी. बी. नाईक कंपनीच्या

# विजेच्या आंगठ्या, पुतळ्या, कडीं, लेखण्या व गळपट्टे.

**प्रत्येक वस्तूवर G. B. N. मार्क पाहून घेत जा.**

७५,००० वर विकल्या. व रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले व नित्य मिळतात.

**रक्त हें मनुष्याचें जीवित्व आहे व विद्युलता रक्ताचें जीवन आहे.**

रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, फेफरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे, काळजाचें दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूळ, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें, गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मूळव्याधी, पाठींतील अशक्तपणा, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हें वापरल्यानें बरे होतात हें **जगप्रसिद्ध** आहे. **गळपट्टा**—लहान मुलांचे दंतउत्पत्ति समयीं होणारे रोग शमन होऊन मुलें निर्विघ्नपणानें निघतात. **लेखणी**—हातास कांपरे व स्मरणशक्तीकरितां. अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

**किंमत.**

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस रु. १॥ | पि. पुतळीस रु. १। | धातूचे कड्यास रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस रु. ३ | चां. पुतळीस रु. २ | धातूचे लेखणीस रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस रु. २० | सो. पुतळीस रु. २२ | रेशमी गळपट्यास रु. १॥ |

एकदम १२ नग घेणारास १ नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलने मागविल्यास पाठवूं. आंगठीकरितां बोटाचे माप पाठवावें. पत्ता स्पष्ट असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचें, विशेष माहितीचें व एजंट व्यापारी दराचें. पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा मालाबरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ख ६ आणे. बंगी करणावळ माफ.

**जी. बी. नाईक आणि कंपनी,**

भायखळा, जुन्या दावणीसमोर, **मुंबई**; आणि बुधवार पेठ, **पुणें.**

**बक्षिस.**—घोरपडे यांची ब्ल्यू ब्लॅक, लाल, व इतर रंगांची लिहिण्याची शाई वर्षाचे काठीं निदान ८१२ आणे किंमतीची घेणारास वर्षअखेर पुष्कळ सुधारणा केलेली, भरपूर माहितीची, सेक्शन बाइंडिंगची, उत्तम कागदावर छापलेली, सुमारें ४२५ पृष्ठाची, प्रत्येक तारखेस १ पान व शेवटीं कोरीं पानें सोडलेली अशी पॉकेट साइझची सुंदर **रोजनिशी बक्षिस देण्यांत येईल.** बाहेर गांवीं बाटल्यापेक्षां पुड्या मागविणें सोईवार पडेल. बाटल्यांतील व पुड्यांतील शाई एकाच प्रकारची असते. पार्सल बद्दल ८४ आणे व व्ही. पी. बद्दल ८२ आणे मिळून एकंदर ८६ आणे खर्चात खाली लिहिलेल्या पुड्या टपालांतून पाठवितां येतातः—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रत्येक पुडींत २६ औंस शाई होणाऱ्या | अशा | प्रत्येकी | ५ आणे | दराच्या | ४ पुड्या. |
| ,, ५ | ,, | ,, | १ आणा | ,, | १२ ,, |
| १ पासून २ दौती | ,, | ,, | पाव आणा | ,, | ५० ,, |

**नकली शाई निघाली आहे सावध असावें.**

प्रत्येक पुडीवर व बाटलीच्या लेबलवर आमची सही पाहून घेणें. **नांव व पत्ता स्पष्ट लिहावा.**

## सदाशिव कृष्णराव घोरपडे, शाईचे कारखानदार,

### घर नं. २५, सोमवार पेठ, पुणें.

---

आबाल वृद्धांस } **लोकमित्र.** { फारच उपयोगी.

हें बालबोध सांच्याचें रंगीत कव्हरासह २० पृष्ठी मासिक पुस्तक गेल्या जुलैपासून दरमहा नियमीत निघत आहे. याच्या चांगुलपणाबद्दल मोठमोठ्या पत्रकारांचे व गृहस्थांचे अनेक अभिप्राय आले आहेत. आंतील विषय उपयुक्त असून अनेक रंगांत गुंग करणारे असतात. श्री० होळकर सरकारांसारखे यास ग्राहक आहेत. आज ९–१० महिन्यांत दोन हजारांवर खपतें. त्वरा करा आणि मित्राचें दर्शन घ्या. वर्षाची वर्गणी चार आणे ट. ख. तीन आणे निराळा. एकाच नांवावर दोन प्रती मागविल्यास ट. ख. सह वर्षास अकरा आणे.

**अनंतरंग.**—हें पुस्तक पूर्ण शृंगारिक असून वाजीकरणादि औषधांनीं युक्त आहे. कामी लोकांनीं अवश्य लाभ घ्यावा. कि. दहा आणे.

**सर्वसंग्रह.**—विस्तार भयास्तव यांतील विषयांची अनुक्रमणिका येथें देत नाहीं. पृष्टें ३०० आहेत. बाइंडिंग सुरेख असून कि. अवघी बारा आणे. ट. ख. एक आणा.

**पत्ता—'लोकमित्र' कचेरी, खानापूर, जि० बेळगांव.**

## वीर्यस्तंभक, रक्तशोधक, पौष्टिक, व अत्यंत कामोत्तेजक, सुवर्ण, मौक्तिक व कस्तुरीमिश्र अपूर्व गुटिका.

ह्या सेवन केल्यानें थोड्याच दिवसांत कांहीं कारणांनीं आलेलें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, अति श्रमांनीं किंवा कितीएक कारणांनीं झालेली क्षीणता, नेत्र, हात, पाय, मूत्रमार्ग, यांचा दाह, शरीराची पांडुरता, पांडुरोग, क्षय, बाळंतरोग, जीर्णज्वर, खोकला, अतिसार या रोगांनीं झालेली क्षीणता, व्रणरोग, कटिशूळ, कटिवात, छातींतील रोग, निद्रानाश, भ्रम, वातरोग, स्वप्नावस्थेनें किंवा मूत्रमार्गानें धातुपात, अम्लपित्त, मूळव्याधी, नेत्ररोग, गर्मी, रोगानें झालेली क्षीणता, व इतर विकार त्वरित नाहींसे होऊन धातु व रक्त यांची शुद्धि आणि वृद्धि होते. वीर्याचें स्तंभन होतें. दृष्टि तीव्र होते. अग्नि प्रदीप्त होतो. शक्ति वाढते. कामोद्दीपन होतें. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें निवारण होऊन शरीरकांति उत्तम होते. स्मरण शक्ति वाढते. या अप्रतिम गुटिका सतत सात आठ वर्षें अत्यंत नाजूक व उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल बहुत पत्रें आहेत. सबब आम्हीं जास्त वर्णन येथें करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकुल नसून, स्त्रिया, पुरुष व मुलें यांस ह्या देण्यास फारच उपयोगी आहेत. वरील सर्व रोग नाहींसे होऊन सर्व गुण उत्पन्न होण्यास या गुटिकासारखें दुसरें अप्रतिम औषध नाहींच असें आम्ही स्पष्ट सांगतों. पथ्य नाहींच.

एका रुपयाच्या आंत गोळ्या मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या घेणारांस बंगी खर्च माफ. बाकीच्यांस वेगळा पडेल. अनुपानखर्डा सोबत मिळेल.

१६ गोळ्यांस १ रु०, ३६ गोळ्यांस २ रु०,
८० गोळ्यांस ४ रु०, १३० गोळ्यांस ६ रु०.

## कर्णस्रावनाशक अप्रतिम तेल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पूं वाहणें व तत्संबंधीं ठणका, कंडू, दाह, रक्तस्राव इ० विकार तात्काल बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचें साधारण व्रण तर तात्कालच, परंतु, कानांचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकूल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात. एका बाटलीस कि. रु० १ शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हा. पे. पार्सलनें मागविल्यास पाठवूं. अनुपानखर्डा बाटली सोबत.

**औषधें मिळण्याचा पत्ताः— कृष्णशास्त्री विवलकर वैद्य,**
**पत्ता--मु० आंजर्ले, ता० दापोली, जि० रत्नागिरी.**

# अनुभवानें आणि परीक्षेनें खात्री झालेलीं औषधें.

भारी अजब वस्तु ! ! !

## मदनसंजीवनी गोळ्या.

### सुवर्ण भस्माच्या ( सोन्याच्या ) मिश्रणानें बनविलेल्या.

ईश्वरनिर्मित इंद्रियाची शिथिलता, निर्बलता, नपुंसकत्वासारखी क्षीणता, आणि स्वप्नावस्था, इत्यादि सर्व दोष ह्या उत्तम गोळ्यांनीं दुरुस्त होऊन कोणत्याही वयाच्या कामीजनांस धातुपौष्टिक, वीर्यस्तंभक, कामोत्तेजक, मनोत्साहवर्धक इत्यादि विषयोपभोगाचे सर्व गुण अति त्वरेनें प्राप्त होतात. ह्याच गोळ्यांनीं गर्मी ( उपदंश ) पासून स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या जननेंद्रियावरील नवीन आणि जुनाट चट्टे, व्रण, आणि शरीराच्या कोणत्याही भागावरील गर्मीचे सर्व प्रकारचे विकार, व अजीर्णाचे, पित्ताचे, कटिशूलादि वाताचे आणि अशक्तीचे सर्व विकार, मग ते कितीही जुनाट असले तरी अति सत्वर दुरुस्त होऊन रतिसुखास संपूर्ण आणि कायमची शक्ति प्राप्त होऊन प्रकृति सदृढ आणि निरोगी ठेविते. एका मनुष्यास २० पासून ५० गोळ्यांपर्यंत घ्याव्या लागतील. किंमत दर आठ गोळ्यांस १ रुपयाप्रमाणें. व्हा. पे. नें. १००गोळ्यांपर्यंत टपाल खर्च १० आणे. गोळ्या घेणारांची प्रकृति कळवा. पत्ता बालबोध लिहावा.

अद्भुत चमत्कार ! ! !

## मदनसंजीवनी तेल.

### अगदीं खात्रीचें आहे.

[ २,००० वर कुप्या खपल्या. ]

ईश्वरनिर्मित इंद्रियाची शिथिलता, निर्बलता, नपुसकत्वासारखी क्षीणता. आणि स्वप्नावस्था, इत्यादि सर्व दोष ह्या चमत्कारिक तैलमर्दनानें दुरुस्त होऊन कामीपुरुषांस धातुपौष्टिक. कामोद्दीपक, वीर्यस्तंभक. मनोत्साहवर्धक इत्यादि विषयोपभोगाचे सर्व गुण प्राप्त होतात. मग ते दोष कोणत्याही वयाच्या मनुष्यास कितीही दिवसांचे आणि कशाही कारणानें प्राप्त झालेले असोत, ते सर्व ह्या तैलमर्दनाच्या बाह्योपचारानेंच पथ्य नसतां बरे होतात. ह्या गुप्त रोगाच्या शेंकडों मनुष्यांस आज आठ वर्षांपासून बराच गुण आल्याकारणानें हें औषध लोकोपयोगास ठेविलें आहे. किंमत अर्ध्या औंसाच्या बाटलीस सव्वादोन रुपये. बंगी नाटपेड. व्हाल्युपेएबलनें किंमत आणि खर्च मिळून २ रुपये १० आणे.

**सूचना**—वरील दोन औषधें प्रत्येकीं निरनिराळींच आहेत. तरी दोन्हीं औषधें एकाच वेळीं उपयोगांत आणल्यास फारच बरें आहे.

### विद्वान् डाक्तरांच्या सर्टिफिकिटा.

१ मदनसंजीवनी गोळ्या आणि तेल ह्यांतील कृति आणि जिनसा मजला कळविल्यावरून समजतें कीं, ह्यांतील पुष्कळ औषधें विद्वान् पंडितांच्या वापरण्यांतीलच असून त्यांच्या जाहिरातींतल्या रोगांवर उत्तम गुणकारक आणि निर्धोक आहेत.

( डाक्टर ) **के. वी. बुलेल, एम्. डी.**

२ ह्या औषधांचा फार्म उपयोगी सांईस्कर आहे.

( डाक्टर ) **के. आर. विकाजी, एम्.डी.**

३ मदनसंजीवनी गोळ्या आणि तेल मीं काळजीपूर्वक तपासून पाहिल्यावरून माझें मत असें होत आहे कीं, हीं औषधें यथायोग्य वापरलीं म्हणजे अपकार न होतां सदर्हू विकारांवर फार गुणकारक आहेत.

( डाक्टर ) **जे. जे. ग्रीवल्,**

कें. कं. कर्डाल अनलीटीकल व कनसलटिंग केमिस्ट, प्राइझ् मेडालिस्ट, इत्यादि.

या औषधांनीं गुण झालेल्या अनेक सद्गृहस्थांचे दाखले औषधासोबत पाठवूं.

वरील औषधांसोबत अनुपान पत्र येईलच.

पत्ता सुवाच्य बालबोध लिहावा.

**रामकृष्ण पांडुरंग, माजी स्कूलमास्तर,**

बिळगी, तालुका सिदापूर, जिल्हा उत्तर कानडा.

पुणें प्रदर्शनांत औषधांचे गुणाबद्दल सर्टिफिकेट मिळालें आहे.

## गोपिनाथ कृष्णाजींचीं गुणकारी, स्वस्त व जगजाहिर औषधें.

आजपर्यंत निघालेल्या बहुतेक सर्व औषधांत हींच उत्तम गुणकारी आहेत अशाबद्दल **हिंदुस्थानांतील** बहुतेक सर्व **खेड्यांत** व **शहरांत** खात्री झालेली आहेच.

---

**ज्वरांकुश** (तापावर रामबाण) ३ दिवसांत हटकून ताप जातोच. किं० ।। व ... ... ... ... रु. १

**ज्वरबिंदु** (चवथारे हिंव व जंगली ताप ह्यांवर) किं० ।। व ......... १

**हिंवतापावर सरबत** (५ मिनिटांत विलक्षण गुण) ...................२

**जुलाब, पोटदुखी व पटकी** (कॉलेरा) ह्यांवर वस्ताद...... ... ... ... ।।।.

**रक्तपित्तीवर औषध** (लावण्याचें व पोटांत घेण्याचें (ह्यांत इंग्रजी औषधांचा लवलेश मुद्रां नाहीं)... ......६

**कोडावर पूड** (लावण्याची व पोटांत घेण्याची) ......... ... ... १।।.

**सरबताची भुकणी,** उन्हाळ्याकरितां. १

**बालसंजीवन,** मुलांच्या सर्व रोगांवर. १

**बालभक्षपाचक** (मुलें व अशक्त मनुष्यें ह्यांकरितां) ... ... ... ... १

**अन्नपाचक गोळया,** २५ स किं० -।- व १०० स ... ... ... ... ... १।.

**शक्तीवरच्या गोळया नं. १** (नपुंसकत्व व वंध्यत्व घालविणाऱ्या) २० स किं. ।।।≈ व १०० स .........३।।.

**शक्तीवरच्या गोळया नं. २ लोहभस्म मिश्रित** (धातुपात बंद करणाऱ्या व सुस्ती घालविणाऱ्या). पाणथर व मुलांचे डबे ह्यांवर वस्ताद कायत्या ह्याच गोळ्या आहेत ... ... ... ... ...१

**वायुनाशक तेल** (संधिवायु इ. वर) किं. -।- व ... ... ... ... २

**गजकर्ण व खरूज ह्यांवर मलम** ।≈

**केश काळे भोर होण्याचा कलप** (हस्तीदंती ब्रशासह).........१८≈

**कॉड लिव्हर ऑइलचें इमलशन** (हायपोफासफाइट मॉल्ट बरोबर)..१।।.

**सॉर्सोडाईन,** सर्व प्रकारचे गर्मीवर १

**मस्तकशुळ व अर्धशिशी ह्यांवर औषध** (५ मिनिटांत गुण)... ...१।।.

**रुप्याचा मुलामा (गिलिट) करण्याचें पाणी**...................।।.

| | | |
|---|---|---|
| **खोकल्यावर गोळया** रु।।। | **पूपरम्यावर गोळया** रु१ | **सार्वजनिक मलम** रु-।। |
| **खोकल्यावर सरबत** (दम्यावर फारच वस्ताद) १ | **पूपरम्यावर वस्ताद** (३ दिवसांत हटकून गुण) १ | **मूळव्याधीवर मलम** २ |
| | | **मूळव्याधीवर चूर्ण** २ |
| **जुलाबाच्या गोळया** -।≈ | **नेत्रसंजीवनी थेंब**... १ | **दांतांचें सुगंधी मंजन** -।- |
| **स्त्रीवटी** ...........-।।।- | **कर्णरोगावर थेंब**..-।।। | **केशवर्धक तेल**... १ |

**पाक व दुसरीं नवीन औषधें ह्यांच्या नवीन निघणाऱ्या जाहिराती अर्धा आण्याचें टिकिट पाठवून खालील पत्त्यावर लिहून मागवा.**

☞ **ड्रॉइंग शिकणारांस सूचना.**—ड्रॉइंगचें सर्व सामान आह्माकडे मिळेल.

**पत्ता—वैद्य गोपिनाथ कृष्णाजी क्षत्रिय,**
**१ ली सदाशीव गल्ली (ह्या० गिरगांव पोस्ट आफिसच्या समोरील गल्ली), घर नं० ७२, कांदेवाडी, मुंबई.**

## डाक्तर वामन गोपाळ यांचा सार्सापरिला.

ह्या घेतल्यापासून खालीं लिहिलेले रोग बरे होतात. उपदंशजन्य विकार, गरमी व तीजपासून होणारे भयंकर रोग, संधिवात, गंडमाळा, रक्त दूषित झाल्यापासून हातां-पायांवर काळे डाग पडणें, सूज येणें, कळा लागणें, तसेच सर्व त्वचेचे रोग व कच्चा पारा सेवन केल्यामुळें होणारे वाईट परिणाम वगैरेंवर उत्तम गुणास ४ बाटल्या घेतल्या पाहिजेत. एका बाटलीची किंमत १। रुपया. बं० ख० २ आणे. पोस्टेज ४ आणे. बारा बाटल्या एकदम घेतल्यास १२ रु० पोस्टेज शिवाय. परंतु ४ बाटल्या एकदम घेतल्यास पोस्टेज ६ च आणे पडतील.

## अत्यंत पौष्टिक व धातुवर्धक फास्फरसाच्या गोळ्या.

यापासून अतिशय विषयोपभोग, नित्य धातुस्राव यानें झालेली शरिराची क्षीणता जाऊन, अशक्तता, अग्निमांद्य, जीर्णज्वर, नपुंसकत्व इत्यादि विकार तावडतोब नाहींसे होतात. उत्तम गुणास ४ बाटल्या पाहिजेत. किंमत २४ गोळ्यांचे एका बाटलीस १४ आणे. बंगी व पोस्टेज खर्च एकापासून कितीही बाटल्या घेतल्या तरी ६ च आणे.

कि. १ रु.] **पांढरे केंस काळेभोर होण्याचा कल्प.** [पो. ४ आ.

**गौतम केशव, नव्या ठाकूरद्वारासमोर, मार्केट पोस्ट, मुंबई.**

---

## ए. जे. ह्मात्रे आणि सन, सुगंधी.

**पत्ता—पांजरापोळ नाका, चिमणलाल महाराजांचे मंदिर, मुंबई.**

स्पेन देशचें निर्भेळ केशर, काश्मिरची अस्सल कस्तूरी, तऱ्हेतऱ्हेची उंचीं अत्तरें, सुवासिक तेलें, अरगजे, व उटणीं, तसेंच कपड्यांत ठेवण्याचे पडिके, सर्व प्रकारचे मुरांबे, व निरनिराळ्या ऋतूंत पिण्यालायक मधूर सरबतें, केशरी गंधाच्या गोळ्या, महाबळेश्वरी उत्तम मध, निर्भेळ बदामांचें तेल, वगैरे जिन्नस वरील ठिकाणीं मिळतात बाहेरगांवच्या लोकांनीं रोख पैसे पाठवून किंवा व्ह्याल्युपेएबलनें मागवावे.

---

**चित्रें**—वुडकट, स्टिरीओ, कॉपर प्लेटस, रबर-स्टांप, स्टेनासिलप्लेटस, इलेक्ट्रोटाईप वगैरे छापावयाचीं हवीं तीं कोरींवचित्रें आह्माकडे तयार करून विकत व भाड्यानें मिळतील.

**मुद्रणचित्रालय नारायणपेठ पुणें.**

**लोंकरीची खबर.** रंगारंगाची लोकर व विणण्याचे सामानासह तयार असे "सेट" विकत मिळतात. वि. मा. स्तव ८॥ व लोकरीच्या नमुन्यास्तव ८= पाठवा.

**पुणें, गो. ना. पटवर्धन आणि कं०**




## वज्रदंती मंजन.

वरील मंजन महत् प्रयत्नानें तयार केलें असून त्याचा खालील दंत रोगांवर अनेक ठां अनुभव घेतला आहे, सबब सर्वत्र आबालवृद्धांनीं हें अल्प मोली व बहुगुणी मंजन अश्य वापरून पाहावें अशी शिफारस करण्यांत येत आहे. हालणारे दांत, सुजून रक्त-श्र होणाऱ्या हिरड्या, दंतक्रिमी, दंतकंडू, दंतकीट, कीड लागून नासलेले दंत, दंतां-पान उत्पन्न होणारी मुखदुर्गंधी इत्यादि दंत रोगांची दुःसह पीडा हें मंजन लाविलें असतां समूळ नाहींशी होऊन दंतांस मजबुती, मुखास सुगंधी, अन्नाचें रुचीसह यथा-योग्य पाचन, इत्याद्यनेक गुण प्राप्त होतात. ह्या मंजनाची एकच डबी ( जी अदमासें महि-नाभर पुरते ) दंत रोग्यांस गुणानुभवास बस्स आहे. दर डबीची किं. ४ आणे. ३ डब्यांपर्यंत ट. ख. ४ आणे. रोख पैसे पाठवून किंवा व्हाल्युपेएबलने डब्या मागवाव्या.

☞ ह्या मंजनाच्या गुणांबद्दल पुष्कळ सरटिफिकिटें मिळालीं आहेत.

**मा—गोविंद मोतिराम मुंज, नळबाजार, तीन बत्तीजवळ, मुंबई.**

लक्षपूर्वक वाचण्याचीमेहेरबानी कराच !

जुलै १८९१ पासून प्रतिमासीं नियमानें प्रसिद्ध होत असलेलें

मासिक ] **महाराष्ट्रकोकिल.** [ पुस्तक.

(सांचा डेमी अष्टपत्री. दर अंकास पृष्ठें ३२. छपाई सुरेख.)

हें मासिक पुस्तक महाराष्ट्र भाषा वाचतां येणाऱ्या प्रत्येक रसिक गृहस्थास प्रिय होत चाललें आहे, ह्याचें कारण त्यांतील चटकदार विषय हें होय. ह्यांतील प्रसिद्ध पुरुषांचीं सच्चित्र मनोरम चरित्रें, रसिक कविता, आश्चर्यकारक अद्भुत चमत्कार, निरनिराळ्या देशांतील लोकांची चमत्कारिक माहिती, सुंदर स्थलवर्णनें, नीतिपर निबंध, उपयुक्त शास्त्रीय माहिती, मनोरंजक आख्यायिका, नवीन पुस्तकांचें परीक्षण, इत्यादि मनोहर विषय वाचून हिंदुस्थानांतील पूर्वपश्चिम व दक्षिणोत्तर सर्व प्रांतांमध्यें महाराष्ट्र भाषा जाणणारे जेवढे रसिक आहेत तेवढे तल्लीन झाले आहेत. ह्याची उत्तम साक्ष प्रत्येक दिवशीं वाढत चाललेली वर्गणीदारांची संख्याच देईल ! प्रस्तुत, झांशी संस्थानच्या सुप्रसिद्ध व अतूल पराक्रमी महाराणी लक्ष्मीबाई साहेब ह्यांचे दत्तक पुत्र श्रीमंत दामोदररावसाहेब झांशीवाले हे झांशी संस्थानच्या इतिहासाची माहिती कोकिलामध्यें देत असतात. ती इतकी मनोरम आहे कीं, त्यायोगानें सहस्रावधि वाचक कोकिलाची एकसारखी मार्गप्रतीक्षा करीत असतात. एवढेंच नव्हे पण कोकिलांतील एकंदर सुंदर विषयांचा सर्व भारतवासी जनांस लाभ व्हावा ह्मणून त्यांचें हिंदी भाषेमध्यें भाषांतर होत असतें ! ह्यापेक्षां ह्या मासिक पुस्तकाचें जास्ती वर्णन तें काय करावें ?


खरोखर प्रत्येकानें कोकिलाची ट. ह. सह वार्षिक वर्गणी रु. १‖ पाठवून जुलै किंवा जानेवारीपासून मागील अंक मागवून वरील गोष्टींचा अनुभव पहावा अशी आमची प्रार्थना आहे.

☞ ह्या पुस्तकासंबंधीं विशेष माहिती दुसरीकडे दिली आहे.

पत्ता—रा. रा. व्ही. रेळे आणि मंडळी,

'महाराष्ट्रकोकिल' मासिक पुस्तकाचे प्रकाशक.

२ री सुतारगल्ली, खेतवाडी, गिरगांव पोस्ट, मुंबई.



# इंडियन मानिटर वॉच कंपनी,


एजन्ट्स [illegible] डी. कानिटकर आणि कंपनी, गिरगांव, मुंबई, त्यांचा [illegible] ॅटलॉग—इंग्रजी किंवा मराठी—वॉचिस्, क्लॉक्स, टाईम. पीसिस, बाजाच्या [illegible], पेवलचे चष्मे वगैरेचा माग विल्यास विशेष माहिती-करितां मिळेल, व घड्याळें व्हाल्युपेएबलनें पाठविण्यांत येतील.

**किंमत.**

| | |
|---|---|
| ओपन फेस पॉकेट वॉच रु. ५, सुपिरीयर रु. ६ | मानिटर लीव्हर क्यांपेन वॉच रु. १६-१८ |
| मानिटर गार्ड वॉच... ...रु. ८-१० | मानिटर चांदीचें वॉच रु. २५-३० |


**आर. डी. कानिटकर आणि कंपनी,**
शांतारामच्या चाळीसमोर, कांदेवाडी, मुंबई.


---

# एन्. पावेल आणि कंपनी,

**घर नं. ९२, काळकादेवी रस्ता, मुंबई.**





येथें उत्तम **गारेचे चष्मे** व **उष्णतामापक यंत्र** (क्लिनिकल थरमामिटर्स) अति स्वस्त दरानें विकत मिळतील. येथें **डोळयांची चोख परीक्षा** करुन **काळजीनें चष्मे** दिले जातील. व तसेंच डोळ्याच्या इस्पितळांतून अगर दुसऱ्या कोणत्याही नेत्रवैद्यांकडून मिळालेल्या नंबराचे चष्मे तयार करुन मिळतील.

ज्या बहिरगांवच्या लोकांस समक्ष येऊन डोळे तपासून घेण्याची सवड नाहीं अशांच्या सोईकरितां मुद्दाम **परिक्षेसाठीं तयार केलेले चष्मे** (वय व कशा प्रकारच्या उपयोगाकरितां हें कळविल्यास) आमच्या कॅटलॉगांत लिहिलेल्या शर्तीवर पाठविण्यांत येतील.

☞ **हलके व अयोग्य नंबराचे चष्मे वापरल्यानें डोळे बिघडतात व नवीन विकार उत्पन्न होऊन थोड्याच दिवसांत कमी दिसूं लागतें, हें ध्यानांत ठेवा.**

किंमत { खात्रीचीं उष्णतामापक यंत्रें ... रु. २॥ पासून
{ ग्यारंटीसह उत्तम गारेचे चष्मे ... रु. ४ ,,

**रोख पैसे पाठवून किंवा व्हाल्युपेयेबल पार्सलनें माल मागवावा. सचित्र कॅटलॉग मागवा, फुकट पाठवूं.**

# ...ष संग्रहणीय अशा नवीन पुस्तकांची यादी.

...रिया व आडला ...चित्रांसह,
## ...९२ सालचें अनेक ...के माहितीचें पुस्तक.

...१८९२ तील मुख्या, विवाह व ...मुहुर्त, ग्रहणें, संक्रांत, फिर्यादीस व ...जेखतास लागणारे स्टांप, खानेसुमारी, व्याज, इनकम् ट्याक्स व पगार यांचीं कोष्टकें, सरकारी बड्या अधिकाऱ्यांचे पगार, तार, टपाल, व रेलवे वगैरे माहिती दिली आहे. रायल ३२ पेजी सांच्याचीं एकंदर पृष्ठें ४० १ प्रतीस किं. ०।। आ., ट.ख. ०।। आणा. ५ प्रतींस ट.ख.सह किं. ०२।। आ. १० प्रतींस ट.ख. सह किं. ०४ आ. २५ प्रतींस ट. ख. सह किं. ०१० आ.

## हिंद आणि ब्रिटानिया.
### ( एक राजकीय चित्र. )

राजकीय विषयावर ही प्रथमचीच कादंबरी आहे. इंग्रजांच्या अमलाखालीं भरतखंडाची कशी स्थिति झाली व होत आहे त्याचें अति सुरेख दिग्दर्शन ह्या राजनिष्ठ पुस्तकांत फारच मार्मिक व मनोरंजक रीतीनें केलें आहे. इंग्लंडांतील अनेक महत्पुरुषांच्या मतांचा समावेश यांत केला आहे. बहुतेक वर्तमानपत्रकर्त्यांनीं याची वाहवा केली आहे. पुस्तकांत लॉर्ड रिपनची सुंदर तसबीर आहे. सांचा डेमी अष्टपत्री. पृष्ठसंख्या ३२५ छपाई सुरेख व बांधणी ...जबूत. किं. १।। रु. ट. ख. ०३ आणे.

महाराष्ट्रकोकिलांत प्रसिद्ध ...

## पंडित अयोध्यानाथ
### यांचें चरित्र.

१ प्रतीस किं. ०।। आणा. ट.ख. ०।। आ.
५ प्रतीस ट. ख. सह किं. २।। आ.
१० प्रतीस ट. ख. सह किं. ०४ आ...

## ...जकालच्या गोष्टी,
### भाग १—२.

किं. १।।। रु. ट. ०४ आणे.

## कै. चिपळुणकर व रा. दा...
## आरबी भाषेंतील सुर...
## व चमत्कारिक गोष्टी.

सांचा रायल अष्टपत्री. पृष्ठसंख्या १,०... पेक्षां जास्त. आंत चित्रें आहेत. टाईप उ... बाइंडिंग सुरेख व मजबूत. सोनेरी न... किं. ट. ख. सह अवघी रु. ४।.

## प्राकृत पुराणोक्त ग्रंथ.

खालील ग्रंथ जाड कागदावर मोठ्या ठशांनीं छापिलेले तयार आहेत. दरएक अध्यायापूर्वी चित्रें दिलीं आहेत, व पृष्ठाखालीं कठीण शब्दांचे अर्थ दिले आहेत.

| | |
|---|---|
| रामविजय रु० १।≈ | दासबोध... रु० १।।। |
| जैमिनी अश्वमेध ३।। | काशीखंड...... ३। |
| संतलीलामृत... १।।। | हरिविजय...... १।≈ |
| नाथलीलामृत... २ | शिवलीलामृत .. -।।- |
| पांडवप्रताप ... ३ | एकनाथी भागवत ४।। |
| भक्तिविजय ...२।। | कथासारामृत ...३ |

...वगैरे व इतर शालोपयोगी पुस्तकें, मनोरंजक नाटकें, कल्पित कादंबऱ्या, ...वीबद्ध मोठाले ग्रंथ, वगैरे आगाऊ पैसे किंवा पोष्टाच्या टिकिटा पाठविल्यास किंवा ...व्ही. पे. पोष्टनें मागविल्यास खालील पत्त्यावर मिळतील.

**पत्ता—व्ही. रेळे आणि मंडळी**, २ री सुतार गल्ली, गिरगांव पोस्ट, मुंबई.

## महाराष्ट्रकोकिल मासिक पुस्तकाच्या पहि[illegible] अंकांत आलेल्या विषयांची अनुक्रम[illegible]


**[illegible]क १ ला. ( जुलै १८९१ )**—१ [illegible]रप्रार्थना ( काव्य ). २ सुखप्राप्तीचा [illegible] उपाय. ३ दीर्घायुष्य. ४ चंद्रप्का[illegible]तील इंद्रधनुष्य. ५ मुक्या प्राण्यांना [illegible]गांचा लाभ ( गाणारा उंदीर, ). ६ राष्ट्रीय [illegible]सभा ( काव्य ). ७ स्थलनिर्देश [illegible]र ). ८ पुस्तकपरीक्षण.

**[illegible] २ रा ( आग[illegible] १८९१ )**—१ [illegible] २ सुगृहिणी. ३ [illegible] आणि म[illegible] स्फुट ( टिपूची संपत्ति ). ५ [illegible]भा ( काव्य ). ६ पुस्तक[illegible] ७ साबाजी आणि पद्मावति [illegible] ).

**[illegible]क ३ रा ( सप्तेंबर १८९१ )**—१ [illegible]र कॉच ( सचित्र ). २ डा. राजें[illegible] मित्र ( सचित्र ). ३ राष्ट्रीय [illegible]सभा ( काव्य ). ४ गाणारे मासे. ५ [illegible]ट ( जादुगारांचा अद्भुत खेळ ). ६ स्फुट ( आख्यायिका ). ७ पुस्तकपरीक्षण. [illegible] झांशी संस्थानचा इतिहास. ९ नवल[illegible]वर्तमानसार.

**अंक ४ था ( अक्टोबर १८९१ )**—[illegible] कै. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर (काव्य). [illegible] सृष्टचमत्कार ( गिरसप्पा येथील धब[illegible]धबा ).३ विविधजनप्रदर्शन ( कुकी लोक ). ४ स्फुट ( कागद कापणारा हत्ती ). ५ स्फुट ( प्रेमाचा राग ). ६ पुस्तकपरीक्षण. ७ झांशी संस्थानचा इतिहास.

**अंक ५ वा ( नोव्हेंबर १८९१ )**—१ महंत केशव रामराय. २ महाराष्ट्रकोकिलची भेट ( काव्य). ३ सुंदर उपदेश. ४ कलरव. ५ स्फुट ( टिपुच्या जनानखान्याची माहिती ). ६ पुस्तकपरीक्षण. ७ मुंबई इलाख्यांतील लोकसंख्या.

**अंक ६ वा ( डिसें[illegible] )**—१ एम्. वीर राघव चारिया[illegible] २ विविधजनप्रदर्शन ( आफ्रिके[illegible] दुर्दैवी स्त्रिया ). ३ लोकोत्तर [illegible] बहुभाषाभिज्ञ मनुष्य. ५ राष्ट्रीयसभे[illegible]णोद्धार ( काव्य ). ६ कलरव. ७ स्फु[illegible] ( [illegible]ख्यायिका ). ८ स्फुट ( काको येथील मिठाच्या खाणी ). ९ पुस्तकपरीक्षण.

**अंक ७ वा ( जानेवारी १८९२ )**—१ गौरीशंकर उदयशंकर. २ वाचकांस तिळगुळ ( काव्य ). ३ कृत्रिम पर्जन्यवृष्टि. ४ कलरव. ५ पुस्तकपरीक्षण. ६ झांशी संस्थानचा इतिहास.

**अंक ८ वा ( फेब्रुवारी १८९२ )**—१ ऑनरेबल पंडित अयोध्यानाथ. २ नांकीन येथील मनोरा. ३ अल्प वयांत मोठी विद्वत्ता. ४ कलरव. ५ पुस्तकपरीक्षण. ६ नरवीर लक्ष्मी ( काव्य ). ७ झांशी संस्थानचा इतिहास.

**अंक ९ वा ( मार्च १८९२ )**—१ राव बहादूर त्रिमलराव व्यंकटेश. २ आडाम नांवाची टेंकडी व तिची पडछाया. ३ अद्भुत शक्तीच्या दोन स्त्रिया. ४ स्थलवर्णन ( जयपूर ). ५ स्फुट ( प्रचंड घंटा ). ६ स्फुट ( आख्यायिका ). ७ पुस्तकपरीक्षण.

**अंक १० वा ( एप्रिल १८९२ )**—१ मि० सी० नारायणस्वामी नायडू ( सचित्र ). २ अघटित घटना ( जुळीं मनुष्यें ). ३ शहरांतल्या शहरांत आगगाडींतून प्रवास. ४ राष्ट्रीय बालसभा ( काव्य ). ५ विविधजनप्रदर्शन ( काश्मीन लोक ). ६ स्थलवर्णन ( भेडा घाट अथवा मा[illegible] रॉक्स ). ७ पुस्तकपरीक्षण. ८ झांशी संस्थानचा इतिहास.

DURABLE & VERY CHEAP.

# INDIA RUBBER STAMPS.

No. 270 & 69. Rs. 3. Rs. 7.




DR. V.K.KIRLOSKAR.
15 APR 92
SHOLAPUR.

KIRBY & COMPANY
4 JAN 92
CONTRACTORS & ENGINEERS

Rs. 1-4.

*V. M. Gadkari:*

POCKET-STAMPS, WITH PEN AND PENCIL.



# BENDRE & COMPANY.

THAKOORDWAR, MARKET-POST, BOMBAY.

MADE BY

WOOD & METAL ENGRAVERS, ELECTRO & STEREO TYPERS, DIE-SINKERS & COPPER-PLATE PRINTERS.

No. 250. Rs. 3-8.

SUKHIA & CO
BOMBAY.
VETERINARY SURGNS

No. 95. Rs. 3.

BAGANAH RAMIAH TAILOR
BHUSAWAL.

No. 61. Rs. 3.

RAGHOOSHET NARAYAN
COCHIN.
MALABAR COAST

Rs. 4.

FACSIMILES OF SIGNATURES VARY FROM ... 8 Rs.

PRICE LIST SENT FREE ON APPLICATION.